
साप्ताहिक

२२ मार्च ८६/२ रुपये

# माणूस



कठोर वनखातं आणि
असहाय्य वनवासी यांच्या
संघर्षाची कहाणी

## प्रतिकाराचे अंकूर

राजीनामे...
राजीनामे..

साप्ताहिक

# माणूस

□

वर्ष : पंचविसावे

अंक : त्रेचाळिसावा

□

२२ मार्च १९८६

किंमत : दोन रुपये

□

संपादक

श्री. ग. माजगावकर

□

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

□

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

□

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

□

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

□

: पत्ता :


साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

□

मुखपृष्ठ—श्याम देशपांडे

## मुंबापुरी

### □ शंकरराव निवळलेत !

आज शुक्रवार दिनांक चौदा मार्च रोजी ठीक अकरा वाजता शंकरराव चव्हाण मुख्यमंत्रीपदी विराजमान झाले. जयंत साळगावकरांनी शपथविधीचा मुहूर्त काढून दिला होता म्हणतात. आता साळगावकरांना रोज प्रश्नकुंडली मांडावी लागू नये एवढीच अपेक्षा.

मंत्रिमंडळ बनवतेवेळी आपल्याला 'फ्री–हॅण्ड' मिळावा असं शंकररावांनी पक्षश्रेष्ठींना सांगितलं होतं. तसा तो त्यांना मिळालाही असं दिसतंय. तिडके, सुधाकरराव नाईक, दर्डा, भाई सावंत, राममनोहर त्रिपाठी इत्यादी दादा समर्थकांना शंकररावांनी डच्चू दिलाय. हे सगळे दुःखी, कष्टी जीव स्वस्थ बसतील का ?

तिकडे जयपूरच्या राजभवनात दादांना संतापाने तिरीमिरी आली असेल. पक्षश्रेष्ठींनी आपला चांगलाच 'मोरू' केलाय हे धूर्त वसंतदादाच्या ध्यानात आले असेलच. ते आता कोणता नवा डाव रचतात ते पाहायचे.

बाबासाहेब भोसले, बळीराम हिरे, असीर वगैरे मंडळी नव्या मुख्यमंत्र्यांवर खूष आहेत. पण हा 'हनीमून' किती काळ टिकणार ? शंकरराव जरा कुठे मनाप्रमाणे वागले नाहीत की ही मंडळी बिथरलीच म्हणून समजा. मग काय 'रिट्ज' हॉटेल जवळच आहे. बाबासाहेब जेवणावळींचं 'होलसेल' कंत्राट घेतील.

सुशीलकुमार शिंदेंना कॅबिनेटमध्ये मानाचं स्थान आहे. तरीही शिंद्यांनी आपली तलवार म्यान केली आहे असं कुणी मानू नये. त्यांच्यामागे विरोधी पक्षनेते शरद पवार सॉलिड उभे आहेत. किंचितही चलबिचल सुरू झाली की शिंदे रंगमंचावर तलवारबाजी सुरू करतील. सध्या ते विंगेत उभे आहेतच.

शंकररावांना दिल्लीचा भक्कम पाठिंबा आहे असं म्हणतायेत. केंद्रातून महाराष्ट्रात परत यायला चव्हाण फारसे राजी नव्हते. तेव्हा दिल्लीश्वर त्यांना वेळोवेळी सांभाळून घेणार यात आश्चर्य नाही. पण शंकरराव खुद्द किती बदललेत ?

शंकरराव जाम निवळलेत असं मंत्रालयात बोललं जातंय. हा दिल्लीच्या थंड हवेचा परिणाम असावा. महाराष्ट्राच्या तापट झळी लागल्यावर शंकररावांचं काय होणार ? 'मानापमान' 'खडाष्टक' 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' वगैरे थोर परंपरेतले एकेक प्रवेश राजकारणाच्या रंगमंचावर सुरू झाले की शंकरराव आपला तिसरा डोळा उघडणार. तोपर्यंत आमेन !

### □ मिनार एक्सप्रेसमध्ये ....

परवा आम्ही राज्यपाल कोना प्रभाकर राव ह्यांना भेटण्याकरता राजभवनावर गेलो होतो. मुंबापुरीतील पत्रकारांनी आपल्यावर फार अन्याय केला आहे अशी राज्यपालांची धारणा झाली आहे. त्यांचा हा समज दूर व्हावा आणि त्यांची बाजूही जनतेपुढे मांडली जावी ह्या प्रामाणिक हेतूने आम्ही राजभवनावर गेलो. माजी कुलगुरु डॉक्टर गोरे ह्यांनी एका मुलाखतीत, राज्यपालांनी आपल्याला विद्यापीठाचा वकील बदलावा अशी सूचना केली होती, असे सांगितले. गोरे बॉम्बे हॉस्पिटलमध्ये असताना विद्यापीठाने मुख्यमंत्र्यांवर खटला करणाऱ्या डॉक्टर गोसावी ह्यांना पास करावे अशी विनंतीही विद्यापीठाचे वकील राधाकृष्णन ह्यांच्यामार्फत गोरे ह्यांना करण्यात आली होती. ह्या सर्व आरोपांमुळे राज्यपालांवर घोर अन्याय होत आहे असे आमचे ठाम मत झाले. अखेर राज्यपाल हे विद्यापिठाचे कुलपती आहेत. त्यामुळे आम्ही प्रत्यक्ष राजभवनावर त्यांची भेट घेण्याचे

ठरविले. डॉक्टर गोरे ह्याची मुलाखत छापून येण्याच्या एक दिवस आधी त्यानी पत्रकाराना भेटण्याचे कबूलही केले होते

परंतु आम्ही राजभवनावर पोहोचल्यावर तब्बल पचेचाळीस मिनिटे वाट पाहिल्यावर राज्यपालानी आता नुकतीच दाढ काढून घेतली असल्याने त्यांना बोलणे कठीण होत आहे असे आम्हाला सागण्यात आले. नेमकी कोणती दाढ काढण्यात आली हे मात्र सागण्यात आले नाही. दुसरे दिवशी आम्ही पुन्हा फोन करून, राज्यपालाची दाढ बरी असल्यास, आता पत्रकाराना ते भेटतील काय ह्याची चौकशी केली. तेव्हा ह्या विषयावर राज्यपालाना आता बोलावयाचे नाही असे सागण्यात आले. असो.

कोना प्रभाकर राव आता फार काळ ह्या पदावर टिकतील असे लक्षण दिसत नाही. फार मोठ्या पदावर छोट्या माणसाना बसविले की, ती खुर्ची साभाळण्यासाठी ते सर्व तऱ्हेची कसरत करतात, तशी स्थिती आता प्रभाकर रावाची झालेली आहे. त्याच्या दुर्दैवाने राम जोशी उपकुलगुरू पदावर नव्हते. डॉक्टर गोरे ह्यानी तडकाफडकी राजीनामा दिल्याने त्याची फारच पंचाईत झाली आहे.

आता कोना प्रभाकर रावाना मिनार एक्सप्रेसमध्ये बसवून देण्याची जबाबदारी विरोधी पक्षाची आहे. ह्यावेळचे अधिवेशन हे राज्यपालांच्या अभिभाषणाने सुरू होत नसल्याने, विधानसभेत तरी विरोधकाना तोड देण्याचा प्रसग त्याच्यावर ओढवणार नाही.

ह्या सर्व प्रकारात मुबई विद्यापीठाचे मात्र खरे नुकसान झाले. खरे सागायचे तर डॉक्टर गोरे ह्याचो विद्यापिठाच्या प्रशासनावर चागली पकड नव्हती. त्याचा मूळ पिंडच शिक्षकाचा व सशोधकाचा. प्रशासकीय कामाकडे त्याचे फारसे लक्ष नसे सेनेट आणि कार्यकारीमडळ ह्याच्या सभा हाताळताना त्याची फार तारांबळ उडत असे; परतु मुबई विद्यापिठाचे कुलगुरू म्हणून शोभण्याइतकी ज्ञानवृद्धता त्याच्यापाशी होती. त्याच्या पदावर आता डहाणुकर कॉलेजचे पूर्वीचे प्रिन्सिपल लिमये हे तात्पुरते कुलगुरू म्हणून आले आहेत. लिमये ह्याचेही नाव कुलगुरुपदाच्या स्पर्धेत घेतले जाते.

लिमये हे अत्यत हुषार, धोरणी गृहस्थ आहेत. डॉक्टर गोरे आणि प्राध्यापक अरुणाचलम ह्यांनी आपले राजीनामे दिले. त्याचबरोबर प्र–कुलगुरु ह्या नात्याने लिमये ह्यानीही राजीनामा देण्याची आवश्यकता होती. वकील बदलण्याचा निरोप डॉक्टर गोरे याच्या प्रमाणेच त्यानाही देण्यात आला होता. सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वावर त्यानीही राजीनामा देण्याची गरज होती; पण त्यानी मोठ्या धोरणीपणे तात्रिक मुद्यावर स्वतःची सुटका करून घेतली. आता तर स्वतःच्या कुटुंबियाशीही वागू नये इतक्या आत्मियतेने ते पत्रकाराशी वागतात.

डॉक्टर गोरे ह्याना आम्ही त्याच्या घरी भेटलो, तेव्हा त्याना आम्ही एक प्रश्न विचारला. 'राजीनामा देणे हा एकमेव पर्याय होता असे तुम्हाला वाटते का? विद्यापिठाच्या कार्यकारी मडळाच्या सभेत तुम्हाला तुमचा निषेध नोदवता आला नसता का ?'

डॉक्टर गोरे म्हणाले, 'May be there are other ways; but resignation was my way. Temperaments differ. If I feel I am not in agreement with people, I should step out. If I am not useful for the post of vice–chancellor, I should do something else which is more enjoyable. My resignation was only a personal decision; I have no stakes involved.

म्हणून आम्ही म्हणालो गोरे ह्याचा मूळ पिंड शिक्षकाचा आणि सशोधकाचा आहे. त्याच्या राजिनाम्यानतर जे रामायण घडले त्यात त्याना काही रस नव्हता, परतु लिमयाची मात्र तशी स्थिती नाही.

### □ सुंदर मुंबई –महापौरांची

महापौर छगन भुजबळ याची एक वर्षाची मुदत आता संपत आली आहे. एका वर्षात त्यानी जितकी उद्घाटने केली आणि जितक्या समारभात अध्यक्षस्थान भूषविले, तेवढे समारंभ महापालिकेच्या इतिहासात कोणत्याही महापौराच्या वाट्यास आले नसतील असे म्हटले जाते.

जाता जाताही त्यानी हुतात्मा चौक सुदर करण्याचा कार्यक्रम पार पाडला. तुम्ही कधी मुबापुरीस आलात तर फ्लोरा फाउटनला येऊन हे बाधकाम जरूर पहा. कोणत्याही प्रकारे निविदा न मागवता आपल्या खास कत्राटदाराकडून भुजबळानी हे काम चाळीस दिवसात पार पाडून घेतले. महापौरपदाची मुदत मार्चमध्ये सपुष्टात येत असल्याने त्या आधी याचे उद्घाटन होणे आवश्यक होते. सुरुवातीस स्थायी समितीकडून एकोणीस लाखाची परवानगी घेतल्यानंतर ह्या कामाचा एकूण खर्च चौतीस लाखापर्यंत दाखविण्यात आला. त्यातून बांधकामात फार मोठी सौंदर्यदृष्टी दाखविली आहे अशातलाही भाग नाही.

ह्या चौकात उद्घाटन झाल्यावर आपले नाव दिले जावे असा भुजबळाचा आग्रह होता हुतात्मा स्मारकाचे प्रथम उद्घाटन यशवतराव चव्हाण यानी केले होते; परंतु चौकात त्याच्या नावाचा मागमुसही नाही. यशवतरावाची गोष्ट वेगळी होती. मृत्यूनतर स्वतःचेच वेगळे स्मारक व्हावे इतके त्याचे कर्तृत्व होते. भुजबळांची गोष्ट वेगळी आहे. त्यानी ही सधी दवडता कामा नये.

शिवसेनेचे नवे महापौर दत्ता नलवडे आहेत. नलवडे वृत्तीने अभ्यासू आहेत, परतु त्याची भाषणे म्हणजे 'काखेत कळसा आणि गावाला वळसा' अशा पद्धतीची असतात. त्यानी अर्धातास भाषण केले तरी सभागृहाला ते काय बरे बोलले ? असा प्रश्न पडतो. आमचे मित्र जेष्ठ पत्रकार चद्रकात देसाई मात्र त्याच्या भाषणावर खूष असतात. 'भाषण नेहमी असेच असावे' ते म्हणतात. म्हणजे कसे, तर 'उडाला तर कावळा आणि बुडाला तर बेडूक.'

— विष्णु जयदेव

# पुणे वार्ता

## □ शासकीय सोहळा

महाराष्ट्र राज्य साहित्य सस्कृती मडळ ही साहित्यिक कामे करणारी शासकीय संस्था. कै. यशवंतराव चव्हाण याच्या कारकिर्दीत या मडळाची स्थापना झाली म्हणूनच एका अर्थाने या मडळाचे जनकत्व यशवतरावाच्याकडे जाते. १२ मार्च हा यशवतरावाचा वाढदिवस आणि आता स्मृतिदिन. यशवंतरावाच्या संदर्भातील विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या आठवणीचा सकल्पित संग्रह प्रकाशित करून मडळाने हा दिवस साजरा केला.

दि. १२ मार्च १९८६ रोजी राज्य शिक्षण शास्त्र सस्थेच्या सभागृहात झालेल्या या प्रकाशन समारंभात 'मी पाहिलेले यशवतराव' या पुस्तकाबरोबरच लोकसाहित्य समितीने तयार केलेल्या 'छद माझा आगळा' या लोकसाहित्य सग्रहाचेही प्रकाशन झाले. ही दोन्ही पुस्तके सरोजिनी बाबर यानी सपादित केली आहेत यावरोबरच मडळाने या वर्षापासून सुरू केलेल्या कै. यशवतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार योजनेतील या वर्षीच्या पारितोषिक विजेत्या लेखकांना पारितोषिके देण्यात आली समारभाला मधुकरराव चौधरी अध्यक्ष म्हणून तर वि स पागे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

मचावर शासकीय अधिकाऱ्याची गडबड, उपस्थितामध्ये शासकीय अधिकारी असा सारा शासकीय मामला जाणवत होता. त्यामुळेच उपस्थितामध्ये नामवतांची हजेरी असतानाही समारभाचे साहित्यिकपण मात्र हरवले होते. पुस्तक यशवतरावाच्या आठवणीचे, तेव्हा यशवतरावाच्या व्यक्तिमत्त्वावर, त्याच्या गुणावर वक्ते बोलणार हे ओघानेच आले. पण म्हणूनच की काय, वक्ते लोकसाहित्यावर फारच थोडं बोलले.

साहेबावर आमचेही प्रेम आहे. पण मडळाला लोकसाहित्यावर बोलणारा अन्य वक्ता मिळाला नाही काय? यशवंतरावाचे लोकसाहित्यप्रेम सर्वश्रुत आहे तरीही केवळ लोकसाहित्यावर कोणी बोललं असत, तर पुस्तकाला न्याय मिळाला असता असं वाटत

पुरस्काराची मात्र मोठी गमतच झाली. कोण गोघळ आणि कोण घाई! पुरस्कारप्राप्त लेखकाचा परिचय श्रोत्याना करवून देण्याची प्रथा नाही काय? पुरस्कारासाठी पुस्तकं निवडणारे परीक्षक सभागृहात असूनही निवडीमागची त्याची भूमिका माडण्याकरीता त्याना बोलावले नाही. निवडीमागचा त्याचा दृष्टिकोन लोकाना समजणे मंडळाला आवश्यक वाटले नाही काय? आपल्याच पुरस्काराची प्रतिष्ठा मडळाने राखायला हवी होती. एरवी अन्य साध्या बक्षीस वाटपासारखाच हाही प्रकार झाला. पुढील पुरस्काराच्यावेळी तरी योग्य न्याय मिळावा ही अपेक्षा.

## □ कै. स. गो. बर्वे स्मारक

कै. स. गो. बर्व्यांचे नाव पुणेकर अतिशय आदराने घेतात. त्याच्यासारखा अधिकारी मिळण मुश्किल असल्याचं बोलतात. एरवी प्रशासकीय अधिकाऱ्याना नावे ठेवणारे पुणेकर बर्व्यांच्या बाबतीत भावुक होतात. त्याला कारणही तसच आहे. स. गो. बर्वे हे व्यक्तिमत्त्वच तसं होतं. सुदर आणि चागल्या पुण्याच स्वप्न त्यानी पाहिल. आणि नुसतं पाहिलच नाही तर त्यासाठी ते झटले. त्याच्या योजनाचे गुणगान आजही ऐकायला येते.

याहीपेक्षा अधिक, म्हणजे महात्मा गाधीचा खून आणि पानशेतचा पूर यासारख्या अत्यत नाजूक क्षणी त्यानी शहराला सावरले गाधी खुनानतरच्या दगलीत पुण्याची होऊ शकणारी होरपळ त्यानी थोपवली. तर पानशेतच्यावेळी निवृत्त असतानाही त्यानी पुण्याकडे धाव घेतली–शहर परत उभ करण्याचं काम जिद्दीने स्वीकारलं पुणेकराना तो मोठा दिलासा होता. या घटनानी ते लोकप्रिय झाले. पुणेकरांचे मोठे प्रेम त्यानी मिळवले.

पुण्याच्या या व्यवहारदक्ष, कार्यकुशल, गतीमान आणि लोकप्रिय प्रशासकाच्या नावे एकही स्मारक नसावे ही बाब खचितच खटकण्याजोगी! आता बर्वे भगिनीच्या वतीने ही उणीव भरून निघतेय. येसुबाई बर्वे, तारा सप्रे, आणि कमल किरपेकर या त्याच्या भगिनी जगली महाराज रस्त्यावर, बर्वे रहात असलेल्या वास्तूची पुनर्रचना करून 'बर्वे सभागृह' आणि 'बर्वे चॅरिटेबल ट्रस्ट' ची स्थापना त्यानी केली आहे.

हे सभागृह ५०×३५ फूट आकाराचे असून इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे. सभागृहात २५० प्रेक्षक बसू शकतात. हे सभागृह स्वागत समारंभ वा भोजनादी कार्यक्रमाकरिता न देण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. साहित्य, कला, समाजकारण यावर विविध स्वरुपाचे कार्यक्रम येथे व्हावेत अशी अपेक्षा आहे.

पुण्याच्या सास्कृतिक वातावरणात या स्मारकाने नवी भर पडते आहे, ही बाब उत्साहवर्धक आहे.

## □ ब्रेव्हो पुणेकर

दूरदर्शन ही आता नित्याची बाब आहे. त्यातच प्रायोजित कार्यक्रमानी मोठी मजा आणलीय. खर तर दूरदर्शन हा काही या स्तभाचा विषय नाही पुण्याला दूरदर्शन केंद्र व्हावे की नाही, हा कदाचित होऊ शकेल; पण सध्या तरी तो विषय pending आहे सागायच विशेष, म्हणजे गेला रविवार (दि. ९ मार्च) दूरदर्शनवर पुणेकरानी गाजवला.

क्विझटाईम ह्या राष्ट्रीय स्तरावरील बौद्धिक कार्यक्रमात पुण्याच्या आर्मड् फोर्सेस मेडिकल कॉलेजने पश्चिम विभागीय विजेतेपद मिळवले, आणि आता राष्ट्रीय पातळीवरील विजेतेपदाकडे आगेकूच केली आहे. कौशिक चटर्जी आणि आनद सेटवालू या जोडीने प्राथमिक फेरीपासूनच विजयी आघाडी घेतली आहे. आपल्या पहिल्या फेरीत तर त्यानी दणदणीत ८० गुणाची आघाडी घेतली होती उपात्य फेरीत फक्त पाच गुणाच्या फरकाने त्यानी विजय मिळवला आणि आता विभागीय अतिम फेरीत १० गुणाची आघाडी घेऊन त्यानी विभागीय विजेतेपद नोंदवले

ही फेरी मोठी रगतदार झाली. सुरुवातीपासुनच आघाडी घेतल्यानतर शेवटी शेवटी मुबईच्या वैद्यकीय महाविद्यालयाने जोरदार लढत दिली. पाश्चात्य घडामोडीच्या संदर्भात अचूक उत्तरे देणारी ही बुद्धिमान मडळी आपल्या राष्ट्रीय सदर्भातील प्रश्नावर मात्र चकतात. लोकमान्य टिळकाच्या दुसऱ्या वर्तमानपत्राचे नाव पश्चिम विभागातल्या सघांना आणि त्यातही पुण्या–मुबईच्या सघाना सागता येऊ नये ही गोष्ट आमच्या मराठी स्वाभिमानाला खटकलीच! असो. आर्मड् फोर्सेस् टीमला राष्ट्रीय विजेतेपदाकरिता शुभेच्छा!

—मनोहर सोनवणे

## सांस्कृतिक नागपूर

संशोधक म्हटला म्हणजे तो अगदी नीरस, रुक्ष आणि कंटाळवाणा अशी आपली कल्पना असते. परंतु बुधवार दि. १२ रोजी महाराष्ट्रातील भाषाशास्त्रज्ञ श्री देवीसिंह चौहान हे हिंदी भाषा प्रचारिणी सभेच्या कामाकरिता नागपुरला आले असताना, त्यांनी विदर्भ संशोधन मंडळात 'अनातोलियातील ऋग्वेदी' ह्या विषयावर एक लहानसे संशोधनपर भाषण दिले. ते इतके मनोरंजक झाले की, श्रोत्यांना ऋग्वेदकाळात एक फेरफटका मारून आल्यासारखे वाटले. अनातोलिया म्हणजे आजच्या तुर्कस्थानचा एक परगणा आहे पूर्वी तो आशिया मायनरचा भाग होता त्या प्रदेशात नुकतेच जे संशोधन झाले, त्यात याकच्या अनेक प्रतिमा सापडल्या. निष्क ह्या मौल्यवान खड्यासबंधी पुष्कळच उल्लेख सापडलेत. निष्क ह्या मौल्यवान खड्याचा उल्लेख ऋग्वेदात वारवार येतो. याक हा प्राणी ऋग्वेदकाळातच आढळतो. ह्यावरून निष्क ह्या मौल्यवान खड्याचा वापर करण्याकरिता ऋग्वेदकालीन लोक अनातोलियापर्यंत पोहोचले होते, आणि ऋग्वेदकालीन संस्कृतीचा परिणाम अनातोलियावर झालेला आढळून येतो, असा श्री. देवीसिंग चौहान याच्या भाषणाचा मतीतार्थ होता. उत्खनन आणि भाषाशास्त्र ह्यातील अनेक पुरावे देऊन श्री. चौहान यांनी आपले प्रमेय समोर माडले. आर्य हिंदुस्थानात बाहेरून आले ह्यावर श्री. चौहान यांनी वारंवार जोर दिला अनातोलियातील पुरावे लक्षात घेऊन पुढील संशोधन व्हावे असे त्यानी सुचविले. श्री. देवीसिंग चौहान याच्या प्रमेयाचे संशोधक जे काय करावयाचे ते करतीलच; परंतु देवीसिगानी ज्या पद्धतीने हा विषय समोर माडला ती पद्धती सामान्य श्रोत्याचे लक्ष वेधून घेणारी होती. सामान्य श्रोते चौहानांच्या शैलीवर खूष होते.

### □ निलंगेकर यांची पीएचडी

नागपुरात सध्या आणखी एक विषय मोठ्या चवीने चर्चिला जात आहे. तो म्हणजे महाराष्ट्राचे भूतपूर्व मुख्यमंत्री श्री. निलगेकर पाटील यानी नागपूर विद्यापीठाला आपला राज्यशास्त्रातला प्रबंध नुकताच सादर केला त्यासबंधी. विवादाचे अनेक मुद्दे निर्माण झालेले आहेत. प्रबंध सादर करताना मुख्यमंत्र्यानी निलगेकर पाटील ह्याऐवजी 'गायकवाड' हे नाव का घेतले ? त्यांचा प्रबंध त्यानीच लिहिला की आणखी कोणी लिहिला ? प्रबंधाचे परीक्षक निवडताना विद्यापीठातील सिक्स्टी–फोर कमिटीने श्री. मंगुडकरांचेच नाव का सुचविले ? प्रचलित नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरूनी ह्या नावात मागाहून बदल केले का ? ह्यावर प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. पी. एल. जोशी यानी आणि स्वत. निलगेकर पाटील यानी प्रबंधावर श्री. गायकवाड आणि निलगेकर पाटील अशी दोन्हीही नावे आहेत असा खुलासा केला आहे नागपूर विद्यापिठात डॉ. पी. एल. जोशी हे चागले अभ्यासू आणि कष्ट घेणारे मार्गदर्शक समजले जातात. ते कोणत्याही विद्यार्थ्याला सहजासहजी पी. एच. डी. पदवी मिळू देतील अशी त्याची प्रतिमा नाही. तर दुसरा गट म्हणतो की कोणत्याही राज्याच्या मुख्यमंत्र्याला प्रबंध लिहिण्याइतपत सवड मिळू शकते अशी कल्पनाही करणे कठीण आहे. राज्यशास्त्र विभागातले दुसरे प्राध्यापक श्री. देवरस यानी तर एक पत्रक काढून डॉ. प. ल जोशी हे अमक्या अमक्या तारखाना हैद्राबादला मुक्काम ठोकून होते आणि मुख्यमंत्र्याच्या प्रबंधाकरिता साधनसामग्री जमविण्याकरिताच ते गेले होते, असा आरोप केलेला आढळतो आता ह्या सगळ्या विवादाच्या गदारोळात खरे काय आणि खोटे काय हे सांगणे कठीण आहे. परंतु एखाद्याचे ग्रह फिरले म्हणजे सर्वच गोष्टी लोकाना विकृत दिसू लागतात, हाच ह्या प्रकरणाचा निष्कर्ष आहे. विद्यापिठात आपल्या उमेदवाराचा प्रबंध आला म्हणजे प्राध्यापक मडळी त्यातल्या त्यात थोडासा कमी कडक परीक्षक असावा असा प्रयत्न करीत नाहीत का ? तसाच हा प्रकार असावा. परतु उमेदवार त्यावेळी मुख्यमंत्री असल्याने ह्या प्रकरणाला भलतेच महत्त्व चढले महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याना विद्यापीठाची पीएचडी डिग्री मिळविणे सन्मानाचे वाटते हीच माझ्या मते महत्त्वाची गोष्ट आहे. अॅकेडेमिक क्षेत्र सुधारावयाचे असल्यास बहुजन समाजाचा शिक्षणविषयक दृष्टिकोन सुधारावयास हवा आणि म्हणून समाजातल्या सत्ताधीशानी पीएचडी पदवी प्राप्त करण्याची आकाक्षा ठेवल्यास त्याचे स्वागत केले पाहिजे. नागपुरातील शिक्षण क्षेत्रात ह्या प्रकरणामुळे मोठीच खळबळ निर्माण झालेली आहे

□ विदर्भ साहित्य सघाच्या त्रैमासिक निवडणुकाचे निकाल नुकतेच हाती आलेले आहेत. रामभाऊ शेवाळकर आणि त्याच्या पॅनेलला पूर्ण यश मिळालेले आहे. आता विरोध करण्याला कोणीही शिल्लक नाहीत. प्रा. शेवाळकरांना ही दुसरी टर्म मिळालेली आहे. त्याच्या कारकिर्दीत विदर्भ साहित्य सघाला जास्तीत जास्त यश मिळो अशी शुभकामना. ह्याचवेळी सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात देशात स्थापन करावयाच्या सात सांस्कृतिक केंद्रापैकी एक केंद्र नागपुरात स्थापन केले जाईल असे शिक्षण राज्यमंत्री श्रीमती सुशीला रोहतगी यानी नुकतेच लोकसभेत जाहीर केले आहे साहित्य सघाच्या माध्यमामार्फत खरेखुरे साहित्यिक, कलावंत, आणि चित्रकार याना प्रस्तावित सांस्कृतिक केंद्रात कसे ओढता येईल याची योजना प्रा. शेवाळकराना तयार करावी लागेल. परंतु त्यापूर्वी साहित्य संघ हा असाहित्यिकांचा एक गट आहे अशी जी प्रतिमा तयार झालेली आहे, ती कशी नाहीशी करता येईल याचाही प्रा. शेवाळकर विचार करतील अशी अपेक्षा आहे.

— शरच्चंद्र

सांस्कृतिक डोंबिवली

## हुतात्मा भाई कोतवालांच्या वडिलांना, उपजीविकेसाठी

मार्च आणि एप्रिल हे परीक्षाचे दिवस, महिने आहेत. वसंताची चाहूल ह्याच आठवड्यापासून लागयला सुरुवात झाली आहे. आधुनिक पद्धतीचे सिमेंटचे सांगाडे भराभर उभे रहात आहेत. त्यांना जागा करून देण्यासाठी विविध वृक्षांची जोरदार तोड झाली आहे, होत आहे. जी काही

पृष्ठ २९ वर

# अमेरिकेतून ...

## ▢ पोप भेट – पाश्चात्य नजरेतून ..

पोप याना पाश्चात्य राष्ट्रात मानाचे आणि धार्मिकदृष्टचा अधिकाराचे स्थान आहे. सर्व कॅथॉलिक धर्मीय त्याच्याकडे एक पवित्र गुरू म्हणून बघतात आणि त्याचा एक प्रकारचा दबदबा आहे त्यामुळे पोप याच्या भारतभेटीचे सविस्तर वृत्त पाठवण्याकरता इथल्या मोठ्या वृत्तपत्रानी खास वार्ताहर पाठवले होते.

ह्या वार्ताहराच्या मते पोप याची भारत-भेट आगळी ठरली. पोप सर्वसाधारणपणे कॅथॉलिक धर्मीय जास्त सख्येने असलेल्या देशात भेटीसाठी जातात. त्यामुळे पोपना ऐकायला आणि बघायला प्रचड सख्येने लोक जमतात. पण भारतात कॅथॉलिक २ टक्क्या-पेक्षाही कमी आहेत त्यामुळे भारतभेटीत त्याच्या बहुतेक सभाना अल्पसख्येनेच लोक हजर होते. इतर देशामध्ये पोप नेहमी प्राजलपणे आणि बऱ्याच वेळा कठोर शब्दात आपली मते मांडतात. पण भारतामधे ते अतिशय राजकारणी भाषा वापरत होते. उदाहरणार्थ, कॅथॉलिक धर्माला कृत्रिम साधनावर आधारित कुटुबयोजना मान्य नाही, तरी पण पोपनी या मुद्यावर भारतात टीका केली नाही. भारतातल्या वर्णव्यवस्थे-संबधी काहीही भाष्य का केले नाही, असे विचारले असता पोप म्हणाले की भारताच्या सामाजिक व्यवस्थेला 'वर्णव्यवस्था' असे नाव आहे; पण जगातल्या इतर देशातसुद्धा तशीच सामाजिक व्यवस्था, ते नाव असल्या-शिवाय चालूच आहे.

पाश्चात्याना भारत हा अनेक परस्पर विरोधी गोष्टी असलेला देश वाटतो. विविध भाषा, विविध धर्म, विविध भौगोलिक भाग आणि हवामान. आणि समाजाच्या वेग-वेगळचा थरातली अधिक तफावत यामुळे त्यांच्या मते भारतासबधी कोणतेही विधान खरे किंवा खोटे ठरू शकते. इतक्या परस्पर विरोधी गोष्टी आणि असमता असतानासुद्धा भारतीयानी एक खरीखुरी आणि भक्कम लोकसत्ताक राज्यपद्धती पूर्णपणे स्वीकारली आहे, याचे पोपना मनोमन कौतुक वाटते, आणि याबाबतीत काही युरोपीय देशानी भारताकडून धडा शिकावा असे ते एका वार्ताहराशी बोलताना म्हणाले.

हिंदू धर्माचे पोपना फारसे आकलन झाले नाही. (एवढचा छोटचा भेटीत हिंदू धर्माचे आकलन होण्याची अपेक्षा करणे अवास्तवच आहे.) कॅथॉलिक ख्रिश्चन धर्म आणि हिंदू धर्म काही बाबतीत जवळचे आहेत आणि काही बाबतीत एकमेकांपासून खूपच दूर आहेत आणि प्रगत राष्ट्रानी हिंदूधर्मापासून परमार्थनिष्ठा शिकायला हवी असे त्याना वाटले.

पोपसबधी तुम्हाला काय वाटते असे पोप याच्या सभेला आलेल्या एका हिंदूला एका पाश्चात्य वार्ताहराने विचारल्यावर तो म्हणाला की (गौतम बुद्धाला दहावा अवतार समजणाऱ्या) आम्हा हिंदूना कोणताही साधुपुरुष मग तो कोणत्याही धर्माचा असला तरी वद्यच वाटतो. याउलट काही हिंदूना पोप याची भारत भेट पसत नव्हती आणि बऱ्याच हिंदूच्या मनात ख्रिश्चन धर्म म्हणजे वसाहतवाद (colonialisn) असे समीकरण बसलेले असते. तरी त्यामानाने पोप याच्या विरुद्ध फारशी निदर्शने झाली नाहीत. पोप यानी पण भारतीय कॅथॉलिक धर्मगुरूंना राजकारणापासून अलिप्त राहून आपल्या धर्माचे आणि ईश्वरसेवेचे काम करत रहावे असा उपदेश केला.

(न्यूयॉर्क टाइम्समधे प्रसिद्ध झालेल्या पोप याच्या पुणे भेटीच्या वार्तापत्रात पुण्याचा उल्लेख 'एक थड हवेचे सपन्न गाव (a prosperous hilltown) आणि हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवन चळवळीचा बालेकिल्ला असा करण्यात आला.)

## ▢ अमेरिकेतील निरक्षरता : ताजा कलम

गेल्या वार्तापत्रात या प्रश्नासंबधी लिहिले होते. या प्रश्नाची एक वेगळी बाजू मध्यतरी इथल्या दूरदर्शनच्या एका केंद्रावर झालेल्या एका कार्यक्रमात माडण्यात आली आणि ती बाजू म्हणजे वाचता येत असूनसुद्धा ते लोक जवळजवळ काहीच वाचन करत नाहीत त्यांच्यासबधी. अशा लोकाना aliterate किंवा नाक्षर म्हणता येईल. या नाक्षरतेची कारणे आणि वाढत्या नाक्षरतेचे अमेरिकन समाजावर होऊ शकणारे परिणाम यावर काही तज्ज्ञानी या कार्यक्रमात विचार प्रकट केले. एकदर आयुष्याची वाढती गती, दिवसाचा काही अमूल्य वेळ शहरापासून लाब घर घेण्याचे प्रमाण वाढल्यामुळे, कामाला जातायेताना मोटारचालनात घाल-वणे, शारीरिक कृतीवर (व्यायाम, मौजे-खातर पायरपेट इ.) जास्त भर यामुळे वाचनाकरता वेळ कमी मिळू लागला वाचन म्हणजे एक नियमितपणे मन लावून केलेली कृती नसून फावल्या वेळात जमले तर करायची अशी गोष्ट मानली जाऊ लागली. पण सद्य परिस्थितीत सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे दूरदर्शनवर लोकाना आयते डोळ्या-समोर सर्व दिसू लागले. त्यामुळे पुस्तके, वर्तमानपत्रे, साप्ताहिके इ. चे वाचन कमी होऊ लागले किंवा अशा वाचनाची आता गरज नाही अशी भावना बळावू लागली.

दूरदर्शनच्या या वाढत्या प्रभावामुळे मुद्रणकलेवर (typography) आधारीत पाश्चात्य सस्कृती (आणि तसे पाहिले तर जगातली कोणतीही सस्कृती) आता प्रतिमावर (imagery) आधारित होते की काय अशी शका प्रदर्शित करण्यात येत आहे याचे एक उदाहरण म्हणजे सध्याचे इथले बराच खप असलेले राष्ट्रव्यापक नवीन वर्तमानपत्र-USA Today हे रंगीत चित्रानी आणि आराखडचाने भरलेले असते (हे वर्तमानपत्र रस्त्याच्या कोपऱ्याकोपऱ्यावर दूरदर्शन-सारख्या दिसणाऱ्या पेटचामध्ये विकायला ठेवलेले असते) इथल्या राजकारण क्षेत्रातील व्यक्तीचे यशदेखील काही अशी ते दूरदर्शनच्या पडद्यावर कसे दिसतात, वागतात आणि बोलतात यावर अवलबून राहू शकते. राष्ट्राध्यक्ष रेगन हे दूरदर्शन तत्राचा पुरेपूर आणि प्रभावीपणे वापर करतात. दूरदर्शन-मुळे जनतेला जरी खूपच व्यापक (broad) ज्ञान आयते प्राप्त होत असले तरी असे ज्ञान सखोल नव्हे तर उथळ रहाते आणि असे सखोल ज्ञान वाचनानेच मिळू शकते. निदान महत्त्वाच्या प्रश्नाचे तरी नीट ज्ञान असलेल्या जनतेवर मूलत: अवलबून असलेल्या लोक-सत्ताक राज्यपद्धतीला यामुळे धोका पोचेल की काय, अशी भीती व्यक्त करण्यात येत आहे दूरदर्शनचे असख्य फायदे असले आणि

हे माध्यम आजच्या संस्कृतीत कायम रहाणार असले तरी त्याचे धोके लक्षात घ्यायला हवेत. आणि दूरदर्शनवरचे कार्यक्रम जनतेला आणखी जास्त वाचन करायला कसे प्रवृत्त करू शकतील यासंबंधी प्रयत्नशील रहायला हवे. शिवाय दूरदर्शनमुळे माणसाच्या जीवनातल्या जवळजवळ प्रत्येक कृतीला एक मनोरंजनाचे अंग असायला हवे अशी कल्पना होऊन बसली आहे. त्यामुळे सखोल, गंभीर मनापासून केलेल्या वाचनावरचा भर, त्याचे आकर्षण आणि कौतुक कमी होत चालले आहे. त्यामुळे अमेरिकन जनतेची विचारशक्ती खुंटण्याची शक्यता निर्माण होत आहे.

हे वर लिहिलेले प्रश्न सर्व अमेरिकन नागरिकांना लागू आहेत असे अर्थातच म्हणता येणार नाही. बरेचसे अमेरिकन लोक खूप वाचतात, पुस्तकांचा खप वाढत असतो. वाचनालये भरलेली असतात. पण अशा चर्चेतून सुशिक्षित समाज बदलत्या परिस्थितीमुळे आणि माध्यमांच्या प्रभावामुळे कसा अनिष्ट बाजूला कलू शकेल, हे निदर्शनास येते आणि त्याप्रमाणे उपाययोजना करण्यासंबंधी जागरूकता वाढते.

१ मार्च १९८६ □

विजय वि. आणि जयश्री वि. जोशी

वेस्टफिल्ड

## वेशीबाहेरचे एक पान

म्हाराच्या पिराच्या पोरानं पाटलाच्या पोरीशी रजिस्टर लग्न केलं.

तो तिला घेऊन मोटार अड्ड्यावर उतरला. माणसं बाजारासारखी लुटली. पोरीला पाटील वाड्याच्या माणसानी ओढून घेतलं. माझा गुन्हा काय ? अशा चेहऱ्यानं पिराच्या पोरानं पब्लिककडं नजर टाकली.

पाठीमागून एक रट्टा पडला. मागं पाठ फिरवली, पुढनं रट्टं सुरू झालं. पाच एक मिनटात पोर रस्त्यावर आडवं पडलं. अंगावर एक बी जागा शिल्लक नव्हती. पाच–सहा पायताणं तुटली. पडली. तसच पोरगं पडलं. मोटार अड्ड्यावरली गर्दी क्षणार्धात नाहीशी झाली.

पिरा आला, पोराची आई आली.

'पोरा रानातली झाडं तोडून हात सगळं काटचावानी झाल्यात रं, याच हातानं झाडं तोडून तुला वाढवलं, काटं सारून पोट मारलं. मेल्याली गुरं वढून आतडी गोळा झाल्यातरं, पोरा हे काय केलंस ? पोटावर बिब्बा वढून घेतलं होतं र म्या' ऊर बडवून बा बोलत होता. बोलायचा थांबला. निपचित पडल्याल्या पोराला बानं मारायला सुरुवात केली.

पिराच्या बायकोनं पदर पुढं केला. 'मी पोरासाठी गावापुढं पदर पसरलाय, आता तुमच्यापुढं पसरतीया, माझ्या पोराला मारू नगा' असं म्हणून ती पोराच्या अंगावर आडवी झाली.

पिरा ऊसाच्या फडागत पेटत होता.

पोर हालचाल करायला लागलं. आई-बानं त्याला उचलून म्हारवाड्यात आणला. सारा म्हारवाडा जमा झाला. हे एवढंच पोर म्हारवाड्यात कॉलेजला जात असलेलं. सारे तळमळले. शब्द विरले. वेदना पेटल्या; पण आग भडकत कशी ठेवायची ? सारं मुक्यानं सहन केलं. जळत. जळत.

काही दिवसानंतर पोर बरं झालं.

म्हारवाड्याबाहेर यायला त्या पोराला बंदी होती. त्याच्यावर पाळत होती. म्हारवाड्यातल्या समाज मंदिरात तो बसून राहायचा. समोर आंबेडकरांचा फोटो असायचा. फोटोला विचारायचा. 'तुम्हीच घटना लिहली ? कशाला ? वेशी बाहेरच्या गर्भाला वेदना नसतात. त्यांना आतडी नसतात. त्यांना नाळही नसते. आमचा गर्भ म्हणजे वेशीबाहेरच्या मातीत वाढलेली निवडुंगं. आमची जागा गावाबाहेर-वेशीबाहेर. माणसं ती. आम्ही लाकडं. ती मरतात. जळतो आम्ही. बाबा कावळ्यानंसुद्धा आमच्यापेक्षा चांगली जागा मिळवली. आमचं जिणं कुत्र्याचं. पिढ्या–गेल्या. अजून जात आहेत–जातील. मेलेल्या माणसांची कापडं हे आमचं वस्त्र. मृतिकाचा नैवेद्य हे आमचं भोजन- त्याच्या कापडात बांधलेले पैसे ही आमच्या पिढीची बिदागी ?'

तो कोलमडत उभा राहिला.

विचार थांबले नाहीत. म्हारवाडं तसच आहेत. गावाबाहेरची औलाद. शिवाशिव. आम्हाला वेशीच्या आत जागा नाही का ? का ? मिळलं असं वाटत नाही. हे वार आहेत. पिढ्यान्पिढ्या हे वार झेलतो आहोत. जखमा खोल आहेत. लांब–रूंद आहेत. हे सारं नवं नाही. तेच आहे. तुम्ही आलात तेच होतं. तुम्ही गेलात तेच आहे. तेच ते. ते तेच.

आता सारं बदललय. बदलत चाललंय.

वेशीतली माणसं वेशीबाहेर यायला लागलीत. वेशीतली भूक वाढाय लागली. मध्यान्ह रातीला वेशीतली माणसं वेशीबाहेर येतात. रात तेवढी काढत्यात, उजडायला वेशीच्या आत जात्यात.

मग मी कोणती चूक केली ? कोणता अपराध केला ?

वेशीच्या आतले बाहेर येतात म्हणून मी वेशीत गेलो. वेशीतल्या पाटील मंदिराचं शिखर शोधलं. वेशीबाहेरचं घेऊन वेशीत एक शिल्प कोरावं एक शिल्पकार व्हावं. एवढंच योजलं.

बाबा, तुम्हीही एक शिल्पच घडवलं होतं. तुम्ही ते लिहून काढलं. मी ते कृतीत आणलं. कृती करण्यासाठीच असते ना ? पाटलाची पोर करून घेतली म्हणून काय बिघडलं ?

सारा म्हारवाडा पाटलाच्या वाड्यासमोर उभा होता.

'पाटील कायद्यानं लग्न झालंय, पोरीला आमच्यात नांदाय पाठवा.'

'ते जमणार नाय.'

'मग आमी कायद्यानं जाणार.'

'चारी वाटा रिकाम्या हायती, पर एक गोष्ट ध्यानात घ्या. या पाटलाच्या वाड्याच्या वाटंला आला तो जित्ता राहणार नाही.'

'मग आमी आताच वाड्यात घुसतो– पोरीला घेऊन जातो.'

पोराची आई आली.

'हे कसं घडल ? बहिणीबरोबर लगीन कवा हुतय का ?'

सारा म्हारवाडा मुक्यानं परतत होता.

–बापू जाधव

किर्लोस्करवाडी

# आपण असे जगतो

वि. ग. कानिटकर

### □ चहात्यांची निवड

पुष्कळजण असे सांगतात की सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून ते वागतात आणि असे वागताना इतराना काय वाटेल याची ते मुळीच पर्वा करीत नाहीत ! काहीजण असे वागत असतीलही, पण त्यांची संख्या आपण कल्पना करतो त्यापेक्षा अतिअल्प असते. काही श्रेष्ठ माणसांचे अपवाद वगळता बहुतेकाना वाहवा आवडते. काही मतभेद असलाच तर कोणाची वाहवा आपल्याला हवी एवढ्याबाबतीतच असतो.

सामान्य माणसाला आपल्या सहकारी मंडळीकडून आदर हवा असतो. बायको, मुले अवलंबून असणारी मंडळी याच्याकडून त्याला आदर अपेक्षित असतो. जिथे तो कामधंदा करतो, तिथले बरोबरीने काम करणाऱ्यानी त्याला कुणीही सहज बनवावा असा बावळट समजू नये, असे त्याला वाटते. आपल्या बायकोला आपण अंतर्बाह्य ठाऊक आहोत, ही गोष्ट विसरण्याचा तो प्रयत्न करतो आपली मुलेबाळे अडीअडचणीच्या वेळी आपला सल्ला विचारल्याशिवाय रहाणार नाहीत, असे तो गृहीत धरून चालत असतो सामान्य विवाहित स्त्री, ही इतर विवाहित स्त्रियावर छाप टाकण्यासाठी धडपडते. ती इतराना हे पटवून देऊ पहाते *की आपला नवरा अधिक कर्तबगार व* श्रीमंत आहे आणि आपली मुलं अधिक यशस्वी होत आहेत. ही स्त्री सुखवस्तू असेल तर शेजार पाजाऱ्याना, आपले घर आपण कसे रेखीव आणि सुशोभित ठेवले आहे, याचे प्रदर्शन करते. आता प्रत्येक विवाहित स्त्री हाच खेळ खेळत असल्याने, हे साधायला खूपच विचार करावा लागतो व कौशल्यही लागते.

नजिकच्या परिसराहून दूर असणाऱ्या परिसरातील माणसावर छाप टाकण्याची इच्छा दोन विरुद्ध प्रवृत्तीमुळे निर्माण होते. आसपासच्या माणसाना आपल्याबद्दल चागले म्हणायला लावणे, हे एक तर अति सोपे असते किंवा अति कठीणसुद्धा असते ! या दोन्ही परिस्थितीतला माणूस, जरा दूरवर असणाऱ्या समकालिनावर अथवा आपल्या मागून येणाऱ्याच्यावर आपली छाप रहावी— त्याचाही आदर प्राप्त व्हावा म्हणून प्रयत्नशील होतो. पुष्कळ यशस्वी लेखकाना त्यांच्या पुस्तकानी कीर्ती दिलेली असते, परंतु त्याचे व्यक्तिगत गुण त्यांच्या जवळपास रहाणाऱ्याना किंवा सबधात आलेल्याना फारसे सुखावह ठरत नाहीत ! लेखक चक्रम, माणूसघाणा, स्वार्थी, पैशाची हाव असलेला— असा असल्याच्या आठवणी नतर प्रसिद्ध होतात. असल्याविरुद्ध, दुष्ट चालीरितीविरुद्ध झगडणाऱ्याना कमालीची अप्रियता पत्करावी लागते. परंतु येणाऱ्या पिढ्या आपल्याला दुवा देतील हा दुर्दम्य आशावाद त्यांच्यापाशी असतो, मरणानतर मिळणारी कीर्ती त्याना धीर देते.

परंतु आता वृत्तपत्रासारख्या प्रसार माध्यमामुळे मरणानतरच्या कीर्तीचे आमिष कमी झाले असावे ! समकालीनाना मिळणारी प्रसिद्धी आता एवढी अवाढव्य असते, की मरणानतर इतिहासातून वाट्याला येणारी किरकोळ नोंद तितकीशी आकर्षक वाटणे शक्य नाही. अलेक्झांडर किंवा शिवाजीमहाराज याना त्यांच्या कर्तृत्वाच्या अत्युच्च शिखरावर जेवढी वाहवा लाभली होती, त्याच्या कितीतरीपटीने आज अमिताभ बच्चन किंवा रेखा, या सिनेमातल्या मंडळीची वाहवा होत असते आर्किमिडोज या शास्त्रज्ञाचे नाव आतापर्यंत मागे पडलेल्या अनेक शतकात मिळून जेवढ्या लोकाना ठाऊक आहे, *त्यापेक्षा अधिक लोकाना आइन्स्टाईनचे नाव* आज ठाऊक आहे या सर्वाचा परिणाम असा आहे की कौतुकासाठी पूर्वी माणसे काही शाश्वत ठरू पहाणाऱ्या गोष्टीच्या मागे लागत, त्याऐवजी आता तावडतोब यश देणारे मार्ग माणसे अनुसरतात. जास्तीत जास्त व सामान्यातल्या सामान्य बद्धीमत्तेच्या माणसालाही आपण काय करतो हे समजावे अशी सर्वांची धडपड असते.

असे असले तरी सुप्रसिद्ध झालेल्या लोकांच्या मनात, मरणोत्तर कीर्तीसबधात एक इच्छा रेंगाळत रहाते. ती म्हणजे आपल्यापुढे लिहिल्या जाणाऱ्या चरित्रग्रथात एखादी आपल्याविषयीची सर्वज्ञात घटना वाईट तर दिसणार नाही ना ? प्रसिद्धी पावलेल्या कोणाही कर्तृत्ववान माणसाचे चरित्र आपण वाचू लागलो, की लक्षात येते, आयुष्याच्या एका विशिष्ट वळणावर आपले सहजपणाचे वागणे सोडून, हा माणूस आपल्या चरित्रकाराचा धाक बाळगून वागू लागला आहे यामुळे त्याच्या वागण्या-बोलण्यात ढोंगीपणाची एक सूक्ष्म लकेर मिसळली जाते, आणि यापासून फारच थोडे ज्येष्ठ कर्तृत्वशाली पुरुष मुक्त राहिलेले आढळतील. माणसाची योग्य कारणासाठी वाहवा क्वचितच होते आणि म्हणून ते यशस्वीरीतीने स्वतःची तारीफ पदरात पाडून घेतात— जे क्वचितच त्यासाठी लायक असतात.

### □ माणसांची लेबले

शेजाऱ्यावर प्रेम करणे हे आपले कर्तव्य आहे हे सर्वांना माहीत असते, परतु कर्तव्य सहज पार पाडता येणे अवघड होते, हा सर्वांचा अनुभव आहे. या कर्तव्य पालनात ज्या अडचणी येतात त्या काही प्रमाणात कमी करणे शक्य आहे का ? शेजारी-पाजारी अनेक प्रकारे त्रासदायक असू शकतात हे खरे. परतु आपण प्रत्येकावर एक लेबल चिकटवून मोकळे होतो. हे बरोबर वाटत नाही. असे करताना आपण असे धरून चालतो की, आपल्याला त्या पुरुषाबद्दल वा स्त्रीबद्दल अतर्बाह्य माहिती आहे ! मग त्यानुसार आपण त्या व्यक्तीचे वर्गीकरण करून टाकतो. खरं म्हणजे हा दोष स्त्रीवर्गात अधिक आढळतो. अगदी हळदीकुंकवाला अगत्याने *बोलावलेल्या बायकादेखील काही त्यांच्या*दृष्टीने शिष्ठ असतात, अबोल असतात, नटव्या असतात, स्वतःला शहाण्या समजणाऱ्या असतात केवळ शिष्ठाचार सभाळला जातो, म्हणून त्याचे प्रत्यक्ष भाडण वगैरे होत नाही. अर्थात हा दोष केवळ स्त्रियाची मक्तेदारी नाही. बऱ्याच पुरुषाच्याबाबत अशीच लेबले चिकटावयाचे काम चालू असते.

ज्या व्यक्तीला एखादे लेबल लावून त्याची वर्गवारी केली जाते, त्याच्या याबाबतीतल्या भावना व जो वर्गवारी करतो त्याच्या

भावना, या मात्र परस्परविरोधी असतात. कुणालाही एखाद्या विशेषणात आपले सबंध व्यक्तिमत्त्व गुंडाळलेले आवडत नाही त्याला साहजिकच राग येतो कारण आपले व्यक्तिमत्त्व खूप गुतागुतीचे आहे, याचा त्याला अभिमान असतो. समजा श्री. पाध्ये नावाच्या लेखकाची, त्याच्या मित्र म्हणवताहेत दुसऱ्याला ओळख करून दिली–

'हे पाध्ये वाचनाची खूप आवड आहे यांना सारखे ग्रंथ वाचीत असतात!' तर श्री. पाध्ये याना रागच येतो. ते मनातल्या मनात म्हणतात– 'गृहस्था मी जेव्हा लेखक नसतो, चिंतनात मग्न नसतो, निसर्गसौंदर्यात रंगलेले नसतो, तेव्हा फक्त वाचतो– मी सारखा वाचत असतो– हे कुणी सांगितले तुला?' श्री पाध्ये याच्याप्रमाणे आपण कोणालाच आपले असे वर्गीकरण होऊ शकते हे आवडत नाही. तत्त्वज्ञ मडळींनी असे का होते याचा विचार करून निष्कर्ष काढला आहे की प्रत्येक व्यक्तीत, जो त्याचा खास विशेष असा आकर्षक भाग असतो, तो शब्दात पकडणे कठीण असते. तत्वज्ञानी नेमके हे कळण्याचा उपद्व्याप करतात आणि म्हणून त्याचे लेखन लोकप्रिय होते!

लेखक साधारणत. स्वत.ला पुरोगामी म्हणवायचे तर मानवता, मानवी जीवन, मानवाचे अस्तित्व, उदात्तता वगैरे शब्द वापरतात हे सर्व बहुधा ते व्यक्तीला आदर्श मानव समजून करत असतात. पण मानवात केवळ आपणच येतो हे विसरून, त्यानी जर हे लक्षात घेतले की यात शेजारचे जोशी, साखरदांडे, कामत, पवार, सौ. देशपांडे हे सर्व कंटाळवाणे शेजारपाजारीही अतर्भूत आहेत, तर त्याना आपला मानवविषयक दृष्टिकोन बदलावा तरी लागेल, किंवा या सर्वांबद्दल आदर तरी बाळगावा लागेल. त्यांना एका लेबलाने मग गुंडाळता येणार नाही.

ही माणसांना आपण जी लेबले लावतो, ती खरे तर त्याची गुणवर्णने करणारी असतात. एखादा स्वप्नरजनात गुंगलेला असतो. एखादा बुद्धिवादी असतो. एखादा भाविक असतो, पण असा गुणविशेष सांगूनही आपण त्याचा सन्मान करीत नाही. कारण आपण स्वत:ला मात्र अतिशय गुंतागुंतीच्या गुणविशेषाची खाण समजतो व इतराना मात्र एखादाच गुणविशेष बहाल करून आपल्याकडे मोठेपणा घेत असतो. यामुळे असा मोठेपणा स्वत कडे घेणारा माणूस, जगाकडे जेवढ्या कुतुहलाने पहायला हवे तेवढ्या कुतुहलाने पाहू शकत नाही. दुसऱ्या माणसाना समजून घेणे सोपे नाही आणि ही गोष्ट अशा माणसाना मुळीच साधत नाही, की ज्यांना हे मुळात कठीण आहे हेच समजत नाही.

जेव्हा एखाद्या इतिहासाचा, काहीच्या मैत्रीसबंधाचा वा प्रेमाचा मागोवा आपण घेतो तेव्हा त्यात हळूहळू झालेले चढउताराचा आलेख अभ्यासतानाच फक्त आपण त्या त्या व्यक्तीच्या वा कालखडाच्या जास्तीत जास्त जवळ जाऊ शकतो. स्वत:च्या उपजत ज्ञानावर विश्वासून, माणसाची झटपट वर्गवारी करून हे साधत नाही. ज्याला कसलाही आधार नाही अशा आपल्याला इतरांबद्दल वाटणाऱ्या दुस्वासातून निर्माण होणारा, अनाठायी आत्मविश्वास आपण टाळायला हवा की नको? ☐

---

अहो, येता–जाता

# तीन बस स्टॉपचा प्रवास

फिरोझ रानडे

---

जुहू भागात राहायला येऊन आम्हाला आता जवळ जवळ वर्ष होत आले आहे. त्यामुळे ह्या भागाचा इतिहास आणि भूगोलही चागलाच माहीत झाला आहे. काही दिवसापूर्वी ह्याच जुहू भागात आमचा एक पक्का मित्र रहायला आला. तो आमच्याकडे दोनदा येऊन गेला होता. ह्या टिवीवारी सकाळी त्याचेकडे जायचे मी कबूल केले होते व त्या प्रमाणे निघालो होतो.

हल्ली मी रविवारला चक्क टिवीवारच म्हणतो. कारण अगदी सकाळी नऊ वाजेपासून रात्री १२–१२॥ पर्यंत तो आपले दर्शन देत असतो. त्यामुळे आजकाल टिवीवारी कोणाकडे जायची वा कोणी आपल्याकडे यायची सोय राहिली नाही आहे. तरी पण मित्राला कबूल केले होते म्हणून निघालो होतो.

त्या मित्राचे घर म्हणजे आमच्या घरापासून तीन बस स्टॉपवरचे अंतर! पण तीन पावलं असली तरी वामनाची तीन पावलं असल्यामुळे त्यानी जस सगळं विश्व व्यापलं होत तसच ह्या तीन बस–स्टॉप्स्नी सिने–विश्व व्यापलं होतं.

आमच्या घराजवळचा स्टॉप होता त्याच्या जवळपास आजकालची नामांकित तारका श्रीदेवी रहाते. अर्थात मी त्यातली श्रीपण पाहिली नव्हती तर देवी पहाण्याचा प्रश्नच नव्हता. लोक म्हणतात म्हणून विश्वास ठेवायचा.

दुसऱ्या बस–स्टॉपच्या आसपास आपले अमोल पालेकर रहातात. अमोल पालेकर उत्तम नट असले तरी बाकी हिंदी नटासारखी त्याना चकाकी नाही. तिसरा स्टॉप मात्र अगदी चकाकीमय असलेल्या व पूर्वी नुसता अभिनेता असलेल्या पण आता नेता झालेल्या अमिताभ बच्चनचा होता. अमिताभ बच्चनचा बंगला इतका मशहूर होता की तो बस–स्टॉप तर त्याच्या नावाने ओळखला जात असेच पण आजूबाजूचे लोकही आपल्या घराचे पत्ते अमिताभ बच्चनच्या संदर्भात देत असतात.

त्या सुप्रसिद्ध बंगल्याच्या जवळपासच माझ्या मित्राने फ्लॅट घेतला होता व मला तेथेच जायचे होते.

सकाळची प्रतिमाही पाहिली व प्रतिभाही पाहिली, कावळा पद्धतीन आंघोळ केली व निघालो. टिवीवार असल्यामुळे बस यायला थोडा वेळ लागला तरी गर्दी अशी नव्हतीच.

आमची बस निघाली आणि थोड्या अंतरानंतर वळण घेतले तर रस्त्यावर लोकाचा हा मोठा थवा! त्यामुळे बस थाबली! क्या गडबड है? 'क्या लफडा है' वगैरे खास मुबईतल्या हिंदीत प्रवाश्यांत चवकशी सुरू झाली. थवा पुष्कळ मोठा होता. त्यात पुरुष होते, स्त्रिया होत्या, लहान मुलेपण होती. हातात मोठाले फलक होते व तोडाने जोरजोरात नारे दिले जात होते.

फलकावर 'समान कायदा लागू करावा' 'तलाक–बिल मागे घ्यावे' वगैरे लिहिलं होतं. व नारे होते, 'कानून चलेगा भारत

का । नही चलेगा शरियत का ।' 'अरिफ महंमद आगे बढो, हम तुम्हारे साथ है ।' 'अमिताभ बच्चन जबाब दो । वरना खुर्सी छोड दो ।' अशा तऱ्हेचे.

आज मुंबईतल्या सगळ्या खासदाराच्या घरावर तलाक-बिलाच्या विरोधात मोर्चे जाणार आहेत हे काल पेपरला वाचले होते. हा अमिताभ बच्चनच्या घरावर जाणारा मोर्चा दिसत होता.

गेले काही दिवस शहाबानो प्रकरणाबद्दलच मराठी, इंग्रजी लिखाण मी वाचत होतो. काही लोक इतिहास घडवतात तर काही लोकांच्यामुळे इतिहास घडतो. आज ह्या शहाबानोमुळे इतिहास घडत होता. एका सत्तरीच्या बाईला १३९ रुपये व काही पैसे पोटगी देण्याबाबतच्या कोर्टाच्या निकालावरून हे रान पेटले होते. तसं पहायला गेलं तर किती क्षुल्लक गोष्ट. आगपेटीतली काडी किती क्षुल्लक असते पण वेळ आली की रान पेटवतेच की नाही ? त्या पेटलेल्या रानाचाच आजचा मोर्चा म्हणजे एक भाग होता.

मोर्चामुळं बस थांबली तरी माझं मन उफाळलं होतं, ते थांबलं नाही. अशा कित्येक मोर्चात मी पूर्वी भाग घेतला होता. बेचाळीसच्या चळवळीच्या वेळी लहान होतो त्यावेळी देवानी दिलेल्या आवाजात, मिरवणुकीतून 'नही रखना, नही रखना ये जालिम सरकार नही रखना ।' वगैरे गाणी म्हणून इंग्रजी सरकारला मी भंडावून सोडले होते. ताश्यावरचे तडम् तडम् ऐकले म्हणजे पाहलवानाना जसा जोश येतो तसा मला आला होता. तरुणपणीचा टोकदारपणा राहिला नसला तरी अगदीच निमाला नव्हता. तेव्हा बसमधून तडातडी उतरलो व अगदी मोर्चात सामील झालो नाही तरी मोर्च्याच्या बाजू बाजूनी जायला लागलो.

प्रश्न तलाक-शुदा मुस्लिम स्त्रियांचा होता व त्यांच्याकरता मोर्चा निघाला होता तरी त्यात मुस्लिम स्त्रिया नव्हत्या की मुस्लिम पुरुषही नव्हते. सगळे आपले विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विद्यार्थी परिषद आणि भाजपची माणसं !

किती विरोधाभासाची गोष्ट नाही ? कुठे विश्व हिंदू परिषद, कुठे आर. एस. एस. आणि कुठे तलाक-शुदा मुस्लिम स्त्रिया ! आणि अगदी परवा परवा पर्यंत हेच लोक हिंदू समाजापलिकडे पहायला तयार नव्हते. आणि आता मोर्चे काढताहेत, मिरवणुका काढताहेत.

हे विचार येत होते तरी मनात कुठे तरी बरे वाटत होते. होतय ते चांगल्याकरता होतय असे वाटत होते. हिंदुस्थान आमचा आहे म्हटल्यावर त्यातल्या रहाणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा, त्यांच्या समूहाचं भलं-बुरं होत आहे की नाही हे पहाणं सगळ्यांचं कर्तव्यच नाही का ? ही समज काही वर्षापूर्वी आली असती तर ? मुस्लिम स्त्रिया झाल्या तरी त्यांच्यावरचा अन्याय आम्ही हिंदू लोक सहन करणार नाही ही वृत्ती व भावनाच किती योग्य होती नाही ?

मोर्चात बायका-मुली होत्या. पण त्याही विश्व हिंदू परिषदेच्या व भाजपच्या. म्हणजे हिंदू बायकांवरचे सगळे अन्याय दूर झाले ? अजुनी हुंड्याकरता सुनांचे बळी जाताहेत. अजुनी खेड्यागावातून दलितांच्या वस्त्या जाळल्या जाताहेत. त्यांच्या आया-बहिणींना विवस्त्र केले जात आहे पण त्याच्या निषेधार्थ कधी मोर्चे निघत नाहीत. त्यांच्याकरता कधी फलक फिरवल जात नाहीत त्या अन्यायाविरुद्ध कधी नारे लावले जात नाहीत. दलितांच्यावर व त्यांच्या स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची ह्यांना काही जाण नाही ?

म्हणजे हे मुस्लिम स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाबद्दल वाटणारे सगळे भाव खोटे खोटे आहेत की काय ? मुस्लिम समाजावर राग काढायला व हिशोब चुकता करायला हे तलाक-विरोधी आंदोलन बडगा म्हणून उपयोगात आणला जात आहे की काय ? मुस्लिम स्त्रिया हे फक्त साधनच म्हणून वापरण्याचा ह्यांचा विचार आहे ?

पूर्वीही राजकारणात स्त्री साधन म्हणून वापरली जायची. त्यावेळी प्रकार वेगळा होता. सलोख्याचे संबंध जोडले जावेत म्हणून राजघराण्यातून लग्न होत. राजांना खूष करण्याकरता दासी भेट म्हणून दिल्या जात. आता शहाबानो हाताशी आहे. तिचा असा उपयोग करून घेतला जात आहे का ?

आतापर्यंत अमिताभ बच्चनचा बंगला जवळ आला होता-नारे मोठ्या आवाजात दिले जाऊ लागले होते. मोर्चा सरळ जाणार होता. मला उजव्या बाजूच्या रस्त्याने जायचे होते.

□


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
**बावीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.**

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
**पंचवीस रुपये**

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.**

# सुप्रसिद्ध गोमंतकीय साहित्यिक (कै.) लक्ष्मणराव सरदेसाई

गो. वि. वैद्य, पणजी

सुप्रसिद्ध ज्येष्ठ मराठी लेखक श्री लक्ष्मणराव सरदेसाई याचे निधन ४ फेब्रुवारी रोजी झाले. गोव्यातील सर्वच साहित्यप्रेमी रसिकांना त्याच्या मृत्यूमुळे अतीव दु:ख झाले. ८२ वर्षांचे दीर्घायुष्य लाभलेल्या लक्ष्मणरावाच्या आयुष्याची दोरी बळकट असल्याची खात्री झाली होती. कारण सुमारे दीडदोन वर्षांपूर्वी त्याना एकदा हृदयविकाराचा झटका येऊन गेल्यावर ते पूर्णपणे बरे झाले असल्याचे त्याना ठाऊक होते. पण अखेर मृत्यूने त्यांना अनपेक्षितपणे गाठलेच. यमाचे मार्ग मोठे विचित्र असतात !

सावई–वेरे ह्या गोव्यातल्या एका छोटया गावी लक्ष्मणरावाचा जन्म १८ मार्च १९०४ रोजी झाला. नतर म्हापसा, फोंडा, मडगाव, पणजी, मुंबई व दिल्ली येथे अशा चढत्या श्रेणीने त्याचे वास्तव्य व शिक्षण नोकरीपरत्वे झाले. त्याच्या मृत्यूमुळे गोमतकीय साहित्यिक पोरके झाले व त्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली असल्याची विषण्ण भावना येथे निर्माण झाली आहे. कारण...

त्या पिढीतल्या तिसऱ्या साहित्यिकाचा हा मृत्यू आहे. १९८४ मध्ये कविवर्य बा. भ. बोरकर वयाच्या ७४ व्या वर्षी निवर्तले. (८–७–८४) १९८५ मध्ये दुसरे ज्येष्ठ गोमतकीय कवी श्री. दा. अ. कारे यांचा 'नंदादीप' मालवला (२३–९–८५). तेव्हा त्यांचा अमृत महोत्सव नुकताच साजरा झाला होता. आणि इजा, बिजानतर तिजाही व्हावा त्याप्रमाणे १९८६ साल उगवून २ महिने होण्यापूर्वीच लक्ष्मणरावही निवर्तले. नियतीच्या कुऱ्हाडीचे असे जबर तडाखे एका पाठोपाठ बसले !

आणि त्यातही गोमतकीय साहित्यप्रेमिकाना भावनेचे एक वेगळेच दु:ख छेडून गेले. बोरकर वारले पुण्यात अन् लक्ष्मणराव वारले मुंबईत ! दोघेही मृत्युसमयी त्यांच्या गोमत भूमीपासून दूर का बरे गेले असावेत, ह्या त्याच्या भावनिक चुटपुटीला बौद्धिक उत्तर नाही. तथापी नतर दोघाच्याही अस्थिकलशांचे विसर्जन सिंधुसागरात जाहीरपणे व समारंभाने केले गेले.

लक्ष्मणरावानी आपल्या लिखाणाच्याद्वारा तर गोमतकाच्या मुक्तीसाठी प्रयत्न केलेच; पण स्वत:ची नोकरी सोडून त्यानी स्वातंत्र्य संग्रामात प्रत्यक्ष सहभागही घेतला होता. एकूण तीन वेळा त्याना तुरुंगाची हवा खावी लागली होती.

सक्तीने धर्मांतरे घडवून आणण्याच्या सत्ताधारी पोर्तुगीजाच्या काळया धर्मांध कारवाया गोव्यात नेहमीच चाललेल्या असत. ख्रिश्चन पाद्री व धर्मोपदेशकाचा त्यात मोठा हात असे. १९४५ मध्ये कुकळी येथील फुलाई गावडे ह्या मुलीला बाटविण्याचा कट शिजत असल्याचे लक्ष्मणरावाना समजले. तिला तिच्या घरून तेवढयासाठी पळवून नेण्यात आले. ही बातमी पसरताच मडगावच्या हिंदू तरुणानी ते प्रकरण हाती घेऊन पिच्छा पुरविला ह्या सर्व प्रकरणाची माहिती देणारी एक पुस्तिका लक्ष्मणरावानी लिहिली. मराठी व पोर्तुगीजमधील ही पुस्तिका मुंबईत प्रसिद्ध करण्यात येऊन तिच्या प्रती गोव्यात व महाराष्ट्रात सर्वत्र वाटण्याची व्यवस्था करण्यात आली. तथापी अखेर त्याबद्दल त्याना पकडण्यात येऊन त्याच्यावर खटला भरण्यात आला. त्यावेळी त्याना आठ दिवस पोलीस कस्टडीत ठेवण्यात आले होते.

पुढील वर्षी, म्हणजे १८ जून १९४६ रोजी कै. डॉ. राममनोहर लोहिया यानी गोमतकाच्या स्वातंत्र्यलढयाचे रणशिंग फुकले आणि नतर दर महिन्याच्या १८ तारखेला एकेका तालुक्याच्या गावी सत्याग्रह करण्याचे लोढयाच्या सभेत ठरले. लक्ष्मणराव अर्थातच ह्या चळवळीत सामील झाले व १८ ऑक्टोबर १९४६ रोजी त्यानी पणजी येथे सत्याग्रह केला, तेव्हा त्याना पकडण्यात येऊन १ महिन्याची शिक्षा झाली. गमत म्हणजे नेरूळच्या तुरुगात हृला सर्व सत्याग्रहीचा चमनगोटा करण्यात आला !

तिसऱ्या खेपेस म्हणजे १९४७–४८ साली लक्ष्मणरावानी दोडामार्ग येथे एका सभेत एक जोरदार स्फोटक भाषण केले. त्यावर त्यांना पकडण्यात येऊन आग्वाद किल्ल्यातील तुरुंगात वर्षभर ठेवण्यात आले.

१९४९–५० मध्ये गोवा मुक्ती चळवळीसाठी एखाद्या स्थायी संघटनेची जरूरी कार्यकर्त्यांना वाटू लागली. त्याप्रमाणे गोवा नॅशनल काँग्रेसची स्थापना करण्यात आली. तिच्या ७ संस्थापक सदस्यामध्ये लक्ष्मणराव होते. ह्या काँग्रेसची वार्षिक अधिवेशने गोव्याबाहेर भरत. त्यासाठी ह्या कार्यकर्त्यांना लोहिया – जयप्रकाश व अशोक मेहता याचे सहाय्य व मार्गदर्शन असे. गोवा मुक्तीपर्यंत (१९६१) ही सघटना कार्यरत राहिली एका वर्षी लक्ष्मणराव तिच्या वार्षिक अधिवेशनाने स्वागताध्यक्ष होते, आणि डॉ लोहियांनी नियुक्त केलेल्या 'फायटिंग कमिटीचे' ते अध्यक्ष होते.

स्वातंत्र्य सैनिकाना पेन्शन देण्याचा उपक्रम १९७२ नंतर गोव्यातही सुरू झाला. तेव्हा लक्ष्मणरावाचे नाव गोवा शासनाच्या पहिल्याच यादीत प्रसिद्ध झाले. मृत्यूपर्यंत त्यांना ते उदरनिर्वाहासाठी उपयुक्त ठरले.

गोव्यातील पोर्तुगीजकालीन प्रचलित पद्धतीचे शिक्षण लिसेवपर्यंत पूर्ण केल्यावर त्याना चागल्या दर्जाची एखादी सरकारी नोकरी अगदी सहज मिळाली असती आणि उत्तरोत्तर चढत जाऊन ते अधिकाऱ्याच्या उच्च पदावर आरूढही झाले असते. तसा पारपारिक जीवनक्रम यशस्वी करण्यासाठी सामान्यत: सर्वांचीच धडपड चालू राहते; पण आपण आयुष्यात पोर्तुगीज सरकारची नोकरी करावयाची नाही असा निर्णय त्यानी स्वत:शी घेतला होता. म्हणून ते खासगी शिक्षण सस्थात अध्यापनाचे काम करू लागले. त्याप्रमाणे सुमारे २० वर्षे (१९४४ पर्यंत) केल्यावर त्यांनी गोवामुक्तीसाठी

स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतली. १९४५ ते १९५९ पर्यंत ते गोव्याच्या राजकारणात (पुष्कळदा गोव्याबाहेरून) व्यस्त होते.

१९५९ मध्ये ते दिल्लीस गेले व तेथे १९६४ पर्यंत राहिले. दिल्ली आकाशवाणी केंद्राच्या कोकणी—पोर्तुगीज वृत्त विभागात त्यांनी सुपरवायझर म्हणून काम केले. त्या नोकरीतील त्यांची दृष्टी वेगळी होती. जगातील अनेक देशांना गोव्यात पोर्तुगीज काय करीत आहेत हे भारतीय आकाशवाणीच्या द्वारा सांगत असत.

अध्यापन, राजकारण व दिल्ली आकाशवाणी हे झाले त्यांच्या जीवनातील मर्यादित कालखंडाचे उद्योग; पण वयाच्या १८ व्या वर्षापासून ते ८० च्या पलीकडे जाऊन, दृष्टी अधू झाली, हात कापू लागला तरी त्यांचा अखंडपणे चालू राहिलेला आवडता उद्योग म्हणजे लेखन.

गोव्यातील मराठी नियतकालिकांतून लक्ष्मणरावांनी स्फुट लिखाणाला प्रारंभ केला होता. तथापि पुष्कळसे लिखाण त्यांना टोपणनावानी करावे लागले. प्रथम 'सौमित्र' व नंतर 'पराशर' ही टोपणनावे त्यांनी त्या काळात धारण केली होती. तथापि त्यांच्या ललितलेखनाला, म्हणजे प्रामुख्याने लघुकथांना भर आला व जोरदार प्रसिद्धी लाभू लागली ती १९२८—२९ सालापासून, त्यातही 'यशवंत' मासिकातून.

'सासुरवासिनी' ही त्यांची 'यशवंत' मध्ये प्रसिद्ध झालेली पहिली लघुकथा. (१९२९) नंतर त्या मासिकात त्यांच्या कथा एकसारख्या प्रसिद्ध होत गेल्या. 'यशवंत'ने तेव्हा एक कथास्पर्धा आयोजित केली होती. त्या स्पर्धेत त्यांच्या 'मोहिनी' ह्या कथेला दुसरे बक्षीस मिळाले. (पहिले कै. य. गो. जोशींच्या 'शेवग्याच्या शेंगा' कथेला.) त्यानंतर रत्नाकर, मनोरंजन पारिजात, ज्योत्स्ना, लोकमान्य, नवयुग, किर्लोस्कर, लोकसत्ता, नवशक्ती, साधना इ. महाराष्ट्रातील प्रमुख नियतकालिकांतून त्यांच्या लघुकथा व प्रचारार्थ केलेले इतर लिखाण प्रसिद्ध होत राहिले. गेल्या अर्धशतकात आतापर्यंत त्यांनी सुमारे ७०० च्या वर लघुकथा लिहिल्या असून त्यांचे १३ कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत आणि त्यांच्या किती तरी कथा अजून असंग्रहित आहेत.

## प्रादेशिक कथाकार

मराठी लघुकथेच्या क्षेत्रात प्रादेशिक कथा व कथाकार यांचे वेगळे वारे जोराने वाहू



**श्री. लक्ष्मणराव सरदेसाई—कुडचडे सावर्डे येथील गोमंतक मराठी साहित्य संमेलन**

लागले ते १९३० च्या आगेमागे. श्री. वि. स. सुखठणकर व श्री. लक्ष्मणराव सरदेसाई हे प्रादेशिक कथाकार म्हणून एकदम पुढे आले. सुखठणकरांचा 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' (१९३१) व श्री. लक्ष्मणरावांचा 'कल्पवृक्षाच्या छायेत' (१९३४) हे संग्रह प्रसिद्ध होताच त्यांनी महाराष्ट्रातील वाचकांना आकृष्ठ केले. (कोकणातील पारंपारिक जनजीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा—कादंबऱ्यांचा काळ यानंतरचा.)

तथापि सुखठणकरांचे लिखाण लवकरच आटू लागले; पण लक्ष्मणराव मात्र धिमेपणाने फलंदाजी करीत राहिले. त्यांच्या लिखाणावर वाचकांच्या उडचा पडू लागाव्यात असे त्यात काय होते बरे ?

पहिली गोष्ट म्हणजे लक्ष्मणरावांनी त्यांच्या कथांत लांबी, पात्रे, वातावरण वगैरे अनेक दृष्टींनी तांत्रिक आधुनिकता आणली. हरिभाऊंच्या काळातील आता ती पाल्हाळिक गोष्ट राहिली नव्हती. महाराष्ट्रातील वाचकवर्गाला गोव्यातील चालीरीती, एकूण जनजीवन वगैरेबद्दल आधीपासूनच आकर्षण होते. लक्ष्मणरावांची निरीक्षणशक्ती, संवेदनक्षमता आणि त्यांची अंतर्मुख दृष्टी यांनी त्याला चांगले खतपाणी घातले.

गोव्याला समृद्ध निसर्गाचे वरदान लाभलेले आहे व त्याने प्रत्येक गोमंतकीय कुटुंबाला आत्मसात केलेले आहे. हव्याहव्याशा वाटणाऱ्या अशा ह्या निसर्गसंपन्न स्थितीला व तिच्या सुसंवेद्य परिणामांना सोडून एखाद्या वेगळ्या वाटेने जाणे कोणत्याही तत्कालीन गोमंतकीय ललित लेखकाला जवळ जवळ अशक्य, निदान फार अवघड तरी होते. तेव्हा गोव्याचा निसर्गही मराठी वाचकांना लक्ष्मणरावांच्या साहित्यातून ओढ लावीत होताच. हा निसर्ग हे त्यांच्या प्रादेशिक साहित्यातले जणू एक पात्रच ठरले होते.

लक्ष्मणरावांच्या प्रारंभिक कथांमध्ये प्रणयाला बरेच महत्त्व लाभलेले आहे. त्यात उत्तानतेपासून प्रणयाच्या विविध छटा चित्रित झालेल्या आहेत. गोमंतकीय वस्तुस्थितीबरोबरच फ्रेंच व पोर्तुगीज वाङ्मयाचा परिचय हेही एक त्यांच्या बाबतीतील प्रणयचित्रणाचे एक प्रेरक कारण म्हणता येईल. मात्र त्यांच्या कथासाहित्यातील ही प्रणयाभिमुखता, आकर्षण व तज्जन्य प्रशंसेबरोबरच टीकेसही पात्र ठरली. त्यांच्या 'वादळातील नौका' ह्या संग्रहातील कथा विशेषत्वाने प्रेमाच्या व प्रणयभावनेच्या विविध छटांनी भरलेल्या असून त्यात श्रृंगारिक वर्णने नटव्या व मोहक भाषेत करण्यात आलेली आहेत. ह्या लेखकावर बहिष्कार घालावा असा एक ठराव त्यावेळी होऊ घातला होता. त्याला त्यांची 'चांडाळ' ही कथाही निमित्त झाली. मी ती मुद्दाम काल पुन्हा वाचली. (आज मितीस तर) ती मला पुष्कळशी संयमित व जाणिवपूर्णतेने लिहिलेली वाटली.

तथापि लक्ष्मणरावांच्या उत्तरकालीन लेखनातून हा प्रभाव कमी होऊन त्याची जागा प्रगल्भता व चिंतनशीलता यांनी घेतलेली आढळते. गोव्याच्या स्वातंत्र्यलढ्यावर आधारलेल्या काही उत्तम संग्रामकथा त्यांनी लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणे सामाजिक दंभ, ढोंगे यांच्यावरही त्यांनी उपरोध—उपहास यांच्या सहाय्याने प्रहार केले आहेत.

१९५१ मध्ये न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून ह्या अमेरिकन दैनिकातर्फे आंतरराष्ट्रीय कथास्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी

सर्वोत्तम कथेचे पहिले बक्षीस लक्ष्मणरावाच्या 'मोहोर' ह्या लघुकथेला मिळाले. सन्मानाचे हे शिक्कामोर्तब रास्त तर होतेच पण ती तशाच भावी मानमान्यतेची नादी ठरली. यावेळी परीक्षक मंडळात कै. रा. श्री. जोग, श्रि. शीलवती केतकर, श्रीमती दुर्गा भागवत व प्रतिनिधी म्हणून दै. लोकमान्यचे सपादक श्री पा वा. गाडगीळ ही मडळी होती. हा एक लक्षणीय विशेष.

गोमतक मराठी साहित्य समेलनात दरवर्षी एका गोमंतकीय मराठी लेखकाला त्याच्या उत्कृष्ट ठरलेल्या पुस्तकासाठी सुवर्ण पदक देण्याची प्रथा १९४५ पासून सुरू झाली. १९५८ मध्ये नवव्या गोमतक मराठी साहित्य समेलनात हे पदक श्री. लक्ष्मणरावानाच त्याच्या 'लक्ष्मणरेषा' ह्या कथासग्रहाला देण्यात आले.

ह्याच सस्थेचे पुढे १५ वे वार्षिक अधिवेशन गोव्यात कुडचडे सावर्डे येथे ३१-१२-७७ व १-१-७८ रोजी भरले असता त्याचे अध्यक्षपद लक्ष्मणरावाकडे चालून आले. त्यापूर्वीच्या १४ ही समेलनाचे अध्यक्ष महाराष्ट्रीय साहित्यिक झालेले होते. त्या पदावर आरूढ होणारे लक्ष्मणराव हे पहिले गोमतकीय साहित्यिक होते आणि तेव्हापासून ही प्रथा अखडपणे चालू राहिलेली आहे.

१९८० मध्ये गोवा शासनाने ज्येष्ठ–श्रेष्ठ गोमतकीय लेखकाला 'स्टेट अवार्ड' देण्याची प्रथा सुरू केली व पहिल्याच वर्षी हा सन्मान लक्ष्मणरावाना देण्यात आला. गोवा कला अकादमीने त्याच्या २ कोकणी पुस्तकाना वार्षिक पुरस्कार (१९७८–७९ व १९८१–८२) दिले. आणि ११८२ मध्ये त्यांच्या 'खबरी काय कर्माच्यो, काय वर्माच्यो' ह्या कोकणी आत्मचरित्रात्मक ललित निबध सग्रहाला भारतीय साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला

लक्ष्मणरावाचा व माझा परिचय कारणपरत्वे झाला तो राजधानी दिल्लीत. ते १९५९ ते ६४ दिल्लीच्या आकाशवाणी केंद्रात होते आणि मी त्याआधीच, म्हणजे १९५७ मध्ये दिल्लीला दाखल झालो होतो. आमचे दोघाचे मत्रालय एकच, म्हणजे माहिती व नभोवाणी खाते मी होतो जाहिरात व दृक्–प्रसिद्ध विभागात

दिल्लीत नोकरीपरत्वे आलेली मराठी माणसे लवकरच एके ठिकाणी भेटू लागतात. असे ठिकाण म्हणजे दिल्ली मराठी साहित्य मंडळ मी दिल्लीस गेल्यावर लगेच मडळाचा सभासद झालो. १९५८ च्या अखेरीस मी मंडळाचा सहचिटणीस होतो व ५९ मध्ये चिटणीस झालो. त्यानंतर लवकरच लक्ष्मणरावही मंडळाचे सभासद व पुढे १९६०–६१ मध्ये अध्यक्ष झाले. साहजिकच मडळाच्या कामानिमित्ताने आमचा सबध येऊ लागला आणि आस्ते आस्ते परिचय वाढीस लागला

त्यावेळी तेथे ते एकटेच असत व कर्झन रोडवरील हॉस्टेलमध्ये राहात. माझी कचेरीही जवळच, कर्झनरोडवर होती. त्यावेळी त्याच्या खोलीवर माझे जाणे मडळाच्या कामानिमित्त होत असे तेव्हा हा साहित्यिक किती सभ्य व मायाळू (वयात फरक होताच) आहे ते मला प्रत्यक्षच पहावयास मिळाले व अनुभवास आले. त्याच्याकडून मला काही पुस्तकेही वाचावयास मिळत. माझ्यासारख्या तरुणाशी ते फार आपुलकीने व अगत्याने वागत–बोलत असत. लवकरच मी त्याचा एक चाहता झालो. आपण ज्याला फक्त नावाने ओळखीत होतो तो साहित्यिक आता परिचयाचा झाला ह्याचाही मला अतर्यामी आनद होताच. संथ लय व शात वृत्ती हाच एकदरीने त्याच्या वर्तणुकीचा स्थायीभाव होता. त्याच्या आगळ्या, ब्रह्मचारी आदरातिथ्याचाही मला लाभ वेळोवेळी होत असे. खोलीत स्वत: उठून ते स्टोव्ह पेटवून चहा करीत व मला देत. (हा अनुभव नंतर मला गोव्यातही आला!) त्यांच्या खोलीवर आदरातिथ्यासाठी साहजिकच फळे असत आणि हसतखेळत ते सगळे देत. वेळ कसा जाई तेच कळत नसे.

पुढे १९७० मध्ये माझी बदली गोव्यास झाली. पणजीस पोहोचल्यावर ते मडगावी असतात असे समजले. मी त्याना पत्र लिहिले उत्तर तर आलेच पण नंतर ते भेटायलाही आले. त्याना मी घरी घेऊन गेलो कुटुबियाची ओळख करून दिली पुढील वेळी घरी येताना ते खाऊचा पुडा आधी टेबलावर ठेवीत.

पुढे लवकरच म्हणजे १९७२ साली आणखी एका नव्या कामाने आम्हाला आणखी जवळ आणले. भारतीय स्वातंत्र्याला २५ वर्षे झाली होती व त्याचा रौप्य महोत्सव साजरा करण्यासाठी केंद्र सरकारने ज्या अनेक योजना आखल्या होत्या त्यापैकी एक म्हणजे निवडक स्वातत्र्य सैनिकाच्या मुलाखती घेऊन त्यांना प्रसिद्धी द्यायची हे एक होते मी निवड केली ती लक्ष्मणरावाची आणि कवी बोरकरांची. दोघेही स्वातत्र्यसैनिक होते. त्या मुलाखतीच्या कामाने मला त्या दोघाच्या आणखी जवळ व आतवर नेले.

लक्ष्मणराव गोव्यातही वेगळे व एकटे राहात असत. दिल्लीत ठीक होते पण इथे तसे का? तसे ते घरी मुलाच्याकडे जात येत. मी त्याना विचारले तेव्हा ते म्हणाले, 'ज्या काळात माझ्या पत्नी–मुलांच्या केवळ उदरनिर्वाहासाठी नव्हे, तर त्यांच्या विकासासाठी माझी गरज होती व ती माझी जबाबदारी होती, तेव्हा मी नोकरी अन् संसार सोडला आणि चळवळीत उडी घेतली. त्यांनी ते दिवस काढलेत. ती मोठी झालीत. आता त्याचा उपयोग मी माझ्यासाठी करून घेण्याची मला शरम वाटते. माझ्या त्या कृतीचे हे उत्तरदायित्व आहे.' त्याच्या उत्तराने मी अतर्मुख झालो व मनात मोठे विचारचक्र फिरू लागले.

अलिकडे स्वत च्या जीवनाबद्दल ते लिखाणातून बोलत 'तृप्त मी, फकीर मी' अशी त्यानी स्वत ची भूमिका सागितली आहे. □

### कै. लक्ष्मणरावांची साहित्यसृष्टी

**कथासंग्रह**

१. कल्पवृक्षाच्या छायेत (पहिला सग्रह १९३४; आवृत्ती २–१९७१
२. सागराच्या लाटा
३. वादळातील नौका
४. अनीतीचे दिव्य
५. ढासळलेले बुरुज
६. ससारातील अमृत
७. मधुचद्र
८ मोहोर
९. लक्ष्मणरेषा (प्रातिनिधीक कथा) (सपादन–'कृष्णद्वैपायन,' पुणे)
१०. सोनेरी ऊन
११. सुरेख सगम
१२. बीजेची कोर
१३ निवारा

**कोकणी पुस्तके**

१. कथाशिल्प (समीक्षा)
२. पापडा कवळयों (नवलिका)
} गोवा कला अकादमी पुरस्कार

३. खबरी काय कर्माच्यो, काय वर्माच्यो आत्मचरित्रात्मक ललित निबंध– साहित्य अका. पुरस्कार

**कादंबऱ्या**

१. माडवी! तू आटलीस?
२. जगावेगळा (अनुवादित)
३. ब्राह्मण ( ,, )

**इतर ग्रथ**

१. गोमंतकातील धर्मांतर प्रकरण (पुस्तिका–फुलाई गावडे)
२. ख्रिस्त धर्मगुरूंचे आक्रमण
३. गोव्याकडील माणसे (व्यक्तिचित्रे)

**आगामी**

१. आग्वादचे तट (सग्राम कथा)
२. आत्मचरित्र
३. माझ्या श्रृंगारकथा (सपादित)

# निवडणुका घेतल्या तर काँग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागेल

अभय गोखले

काँग्रेस (इ.) पक्षाने पाठिंबा काढून घेतल्यावर त्याच्या आधाराने सत्तेवर आलेले जम्मू-काश्मिरमधील जी एम्. शहा मंत्रिमंडळ बरखास्त झाले आहे रामजन्मभूमी मंदिर हिंदूसाठी खुले करण्यात आल्याच्या निषेधार्थ .काश्मीर खोऱ्यात अनंतनाग, सोपोरे, बारामुल्ला या ठिकाणी मुस्लिमाकडून हिंदूवर जे अनन्वित अत्याचार करण्यात आले, त्यावरून व पाकिस्तानवादी शक्तींनी अलिकडे काश्मिर खोऱ्यात जो धुमाकूळ घातला, त्यावरून शहा सरकारची नालायकी पुरेपूर प्रसिद्ध झाल्यावर कॉंग्रेस (इं) च्या २६ आमदारानी आपला शहा सरकारला असलेला पाठिंबा काढून घेतला, मग ज्या राज्यपाल जगमोहन यानी बेकायदेशीर व अनैतिकरित्या शहा याना मुख्यमंत्रीपदी आणण्यासाठी कॉंग्रेस (इ) शी सगनमत करून प्रयत्न केले, त्याच जगमोहन यानी शहा मंत्रिमंडळ बडतर्फ केले. अर्थात फरुकला मुख्यमंत्रीपदावरून हुसकावून लावण्याच्या बाबतीत जगमोहन यानी जो उत्साह दाखवला होता तो नंतर ओसरला व शहा याना लवकरात लवकर गचाडी देण्यासाठी गेले बरेच दिवस ते केंद्राकडे रदबदली करत होते शहा व जगमोहन याचे बरेच दिवस बिनसले होते.

फरुकला मुख्यमंत्रीपदावरून हुसकावून तेथे कॉंग्रेस (इ) च्या आधाराने जी. एम् शहा याना बसवण्याची कृती मुळातच घटनाबाह्य होती. ज्या तऱ्हेने फरुकचे आमदार फोडण्यात कॉंग्रेस (इ) ने शहा याना प्रोत्साहन दिले तो प्रकार किळसवाणा होता. विधानसभेच्या निवडणुकात फरुकने कॉंग्रेस (इ) ने मागितलेल्या जागा देण्यास नकार देऊन निवडणूक समझोता फेटाळून लावला मग फरुकचा पराभव करण्यासाठी इंदिरा गांधीनी जंगजंग पछाडले; परंतु जम्मूमधील भरघोस पाठिंब्यानेसुद्धा फरुकला धडा शिकवता आला नाही. कारण काश्मीर खोऱ्यात कॉंग्रेस (इं) ला दारुण पराभव पत्करावा लागला व शेख अब्दुल्लाच्या पश्चात त्याच्या मुलाचा सहज पराभव करता येईल, हा इंदिरा गांधीचा अंदाज चुकला मग त्या पराभवाचा अपमान जिव्हारी लागल्याने फरुकला या ना त्या कारणाने गादीवरून खाली खेचण्याच्या कारवाया सुरू झाल्या. या बाबतीत फरुकनेही देशद्रोही शक्तींना पायबंद घालण्यात आपली असमर्थता सिद्ध केल्याने व काही जातीयवादी संघटनाना हाताशी धरल्याने त्याच्याविरुद्ध आरडाओरड करणे सोपे गेले. त्यातच त्याने विरोधकाच्या ऐक्यासाठी प्रयत्न केले व आपली अखिल भारतीय पातळीवरील नेता अशी इमेज तयार करण्याचा प्रयत्न केला या सर्व गोष्टी इंदिरा गांधीना सहन करण्याच्या पलिकडच्या वाटल्या. मग फरुकला धडा शिकविण्यासाठी हुशारीने खेळी करण्यात आली. फरुकला पदच्युत करावयाचे ही काही सोपी गोष्ट नव्हती एखाद्या शेख कुटुंबाच्या बाहेरच्या व्यक्तीला फरुकच्या जागी आणले असते तर अख्खे काश्मीर खोरे पेटले असते मग शेखसाहेबानी आपल्या मुलावर कृपादृष्टी दाखवल्याने नाराज झालेल्या शेखसाहेबांच्या जावयाला जी एम् शहाला हाताशी धरण्यात आले. शेखसाहेबांच्या जावयानेच त्याच्या (शेखसाहेबांच्या) मुलाला गादीवरून दूर करण्यावरून वातावरण फारसे पेटणार नव्हते. कारण दोघेही काश्मिरी, लोकांच्या लाडक्या शेखसाहेबांच्या कुटुंबातील होते जी एम्. शहा फरुकचे हवे तेवढे आमदार फोडण्यात यशस्वी झाल्यावर फरुकला शक्ती प्रदर्शनाची कोणतीही संधी न देता बडतर्फ करण्यात आले व ज्या बारा आमदारानी पाठिंबा दिल्याने (फरुकला सोडून) शहा यानी कॉंग्रेस (इ) च्या आधाराने सत्ताग्रहण केले, त्या बाराही आमदाराना मंत्रिपद देण्यात आले ही सर्व शहा याच्या सत्ताग्रहणाची पार्श्वभूमी झाली. सत्तेवर आल्यापासून एकही दिवस शहा कॉंग्रेस (इ) वाल्याना समाधान देऊ शकले नाहीत. फरुकला घटनाबाह्यरित्या खाली खेचण्यात आल्याने तो साहजिकच सतापला व त्याने सभा, मोर्चे आयोजित करून आपले उपद्रवमूल्य सिद्ध केले जी. एम. शहा याना फरुक इतका लोकाचा पाठिंबा मिळणे शक्यच नव्हते निरनिराळी नाटके करून कॉंग्रेस (इ) वाल्याना खूष ठेवणे व आपली सत्ता टिकवणे हा एकच उद्देश होऊन बसला मधून मधून कॉंग्रेस (इ) वाल्यानी कायदा व सुव्यवस्थेबद्दल आणि देशद्रोह्याच्या वाढत्या हालचालीबद्दल तक्रार केल्यास त्याबाबत थातुरमातुर कारवाई करणे व कॉंग्रेस (इ) श्रेष्ठींनी त्याचा (शहाचा) पाठिंबा काढून घेण्याची धमकी दिल्यास, मी कॉंग्रेस (इ) ने धोका दिल्यास बेगम अब्दुल्लाच्या (फरुकची आई) पाया पडून कॉंग्रेस (इ) वाल्याची जिरवू शकतो, अशी प्रती धमकी देणे हा खेळ होऊन बसला. आतासुद्धा कॉंग्रेस (इ) ने पाठिंबा काढून घेतल्यावर बदला म्हणून शहाने अशी घोषणा केली की, डॉ. फरुक याच्या नेतृत्वाखालील नॅशनल कॉन्फरन्समध्ये आपल्या दहा आमदारानी प्रवेश केल्यामुळे मंत्रिमंडळ बनवण्यासाठी फरुक यानाच पाचारण केले जावे; परंतु राज्यपालानी त्याची विनंती मान्य केली नाही व राष्ट्रपती राजवट जारी केली. आपण पाठिंबा काढून घेतल्यावर चिडलेले शहा गप्प बसतील, असे मानण्याइतके राजीव गांधी याचे सल्लागार मूर्ख नाहीत ते आपण फरुकला मिळण्याची धमकी खरी करतील हे कॉंग्रेस (इ) श्रेष्ठींना माहीत होतेच. त्यामुळेच राज्यात राष्ट्रपती राजवट जारी करण्यात आली आहे.

## शहा–कमालीची अप्रियता

हे सर्व नाट्य केव्हातरी होणार होतेच शहा याची नालायकी केव्हाच सिद्ध झाली होती. त्याच्या मदतीने (त्याना पुढे करून) फरुकला दीर्घकाळ सत्तेच्या खुर्चीपासून दूर ठेवता येणार नाही हे कॉंग्रेस (इ) वाल्याना माहीत नव्हते असे नाही, परंतु ते सध्याच्या परिस्थितीत काहीच करू शकत नव्हते. कॉंग्रेस (इ) चा पाठिंबा घेऊन सरकार बनवण्याची विनंती फरुकला करण्यात आली व शहाचा डाव त्याच्यावरच उलटवण्याचा प्रयत्न करण्यात आला; परंतु फरुकने या गोष्टीस नकार दिल्याने त्याही बाबतीत निराशा पदरात पडली. अशा प्रकारच्या समझोत्यास फरुक तयार होणे शक्यच नव्हते

कारण कांग्रेस (इ) वाल्यांना फरुक पुरेपूर ओळखून आहे. शिवाय कांग्रेसच्या ओंजळीने शहाप्रमाणे पाणी पिण्याची फरुकला गरजच काय ? त्याला लोकांचा जबरदस्त पाठिंबा आहे. आता निवडणुका घेतल्यास तो कांग्रेसला चारीमुंड्या चीत करेल असे जम्मू-काश्मिर-मध्ये वातावरण आहे. मागे लोकसभेच्या निवडणुकीतही फरुक सत्तेवर नसताना व सहानुभूतीची लाट कांग्रेसच्या बाजूने असताना कांग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागला होता आणि नेमक्या याच भीतीने कांग्रेसवाले इतके दिवस इच्छा नसूनही शहाला पाठिंबा देत राहिले.

मग आताच शहाचा पाठिंबा कांग्रेसने काढून का घेतला ? याला दोन कारणे आहेत शहाच्या भोगळ कारभाराने व त्याच्या मुस्लीम अनुनयामुळे कांग्रेस जम्मूमधील हिंदूत कमालीची लोकप्रियता घालवून बसली आहे काश्मीर खोऱ्यात कांग्रेसला हिंदूचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला; परंतु तेथील हिंदूची संख्या मुसलमानाच्या मानाने फारच कमी असल्याने कांग्रेस विधानसभा निवडणुकीत काश्मीर खोऱ्यात चांगली कामगिरी करू शकली नाही. काश्मीर खोऱ्यात कांग्रेसला मुसलमानांची पुरेशी मते न मिळाल्याने कांग्रेस हा जम्मूमधील हिंदूंचा पक्ष आहे असा शिक्का पक्षावर बसला. कांग्रेस (इ)ची काश्मीर खोऱ्यात एवढी दयनीय अवस्था झाली की, त्यांच्या प्रदेश अध्यक्षाला मुफ्तीमोहमद सईद याना जम्मूमधील बहुसंख्य हिंदूवस्ती असलेल्या मतदार संघातून निवडून आणावे लागले. प्रदेश अध्यक्ष मुसलमान असूनसुद्धा त्याना काश्मीर खोऱ्यातून निवडून आणणे कांग्रेसला शक्य झाले नाही. काश्मीर खोऱ्यात फरुकची कांग्रेसने जबरदस्त दहशत घेतली आहे. शहा हे असाच कारभार करत राहिले तर कांग्रेसला पुढच्या निवडणुकीत २६ च्या जागी धड १० जागासुद्धा मिळवणे अवघड गेले असते. शहाना पाठिंबा कांग्रेसने चालू ठेवणे कांग्रेसच्या पाठीराख्याना सुरुवातीपासूनच मान्य नव्हते. परंतु फरुकच्या धास्तीने पाठिंबा कायम ठेवणे अपरिहार्य होऊन बसले होते.

## मुस्लिम निषेध मोर्चे

शहाबानो प्रकरणी सुप्रीम कोर्टाच्या निकालानंतर काश्मीर खोऱ्यात बराच तणाव निर्माण झाला; परंतु शहा त्याला अटकाव करू शकले नाहीत. सचिवालयाच्या परिसरात मशिद बांधणे, इतरत्र मशीदी बांधण्यास प्रोत्साहन देणे या प्रकारात ते मश्गुल झाले. पंजाबातील अतिरेकी जम्मू—काश्मीरात जाऊन उघडपणे वावरू लागले. गुन्हेगारी करून जम्मू—काश्मीरात पळून जाणे, त्याना सुरक्षितपणाचे वाटू लागले या अतिरेक्यांना शहाचे पोलीस पायबंद घालू शकले नाहीत पाकिस्तानवादी शक्ती, देशद्रोही यांचा सुळसुळाट झाला दिवसाढवळ्या भारत मुर्दाबाद, पाकिस्तान, झीया जिंदाबाद अशा घोषणा रस्त्यावर देण्यात येऊ लागल्या, परंतु शहा सरकारने अशा लोकाना दहशत बसवली नाही. जातीयवादी संघटनानी आपले जाळे सर्वत्र पसरवले. काश्मीर खोऱ्यातील हिंदूना आपण भारतात आहोत की पाकिस्तानात, असा संभ्रम निर्माण व्हावा इतकी दुय्यम दर्जाची वागणूक देण्यात आली.

सर्वात कळस झाला तो रामजन्मभूमी (अयोध्या) मंदिर हिंदूना खुले करण्याचा आदेश कोर्टाने दिल्यामुळे. हे मंदिर नसून बाबराने (मोगल बादशहा) बांधलेली मशिद आहे असा मुसलमानाचा दावा आहे. यावरून देशभर काही ठिकाणी दंगली झाल्या. मंदिर खुले करण्याच्या निषेधार्थ देशभर मुस्लिमांनी निषेध मोर्चे व सभा आयोजित केल्या. परंतु काश्मीर खोऱ्यातील मुसलमानाचा वेगळाच हेतू होता त्यानी प्रामुख्याने अनंतनाग, बारामुल्ला, सोपोरे या हिंदू अल्पसंख्य असणाऱ्या विभागात हिंदूची घरे लुटली. त्यांच्या मालमत्तेला आगी लावल्या, त्यांच्या मंदिरावर हल्ले करून त्यांची मोडतोड केली आणि हे सर्व चालू असताना शहाच्या पोलिसानी पक्षपाती धोरण वापरून असहाय्य हिंदूना फारशी मदत केली नाही. दंगल करणाऱ्या लोकांना फारसा अटकाव झाला नाही. या ठिकाणच्या हिंदूना आपली घरेदारे सोडून आश्रयासाठी इतरत्र धाव घ्यावी लागली त्यांच्यासाठी सरकारला निर्वासीत छावण्या उभाराव्या लागल्या. या गोष्टीचा सरकारने इन्कार केला असला तरी त्यावर विश्वास बसणे शक्य नाही. या हिंदूची नुसती घरेदारेच लुटली नाहीत, तर त्यांच्यावर सामाजिक बहिष्कार टाकण्यात आला. त्यांच्या घरी कोणी कामाला जाईना. त्याना दुकानातून सामान मिळणे मुष्कील होऊन बसले गेली बरीच वर्षे काश्मीर खोऱ्यातील हिंदू या ना त्या तणावाने तो भाग सोडून जम्मू व इतरत्र जात आहेत. परवाच्या दंगलीने काश्मीर खोरे सोडणाऱ्या पंडिताची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली असून, हा वेग असाच कायम राहिला तर काश्मीर खोऱ्यात हिंदू नावाला सापडणे काही वर्षानी अशक्य होऊन बसेल. याची प्रतिक्रिया म्हणून जम्मूमध्ये शिवसेनेने दंगली घडवून आणल्या. त्यामात्र पोलिसानी तावडतोब आटोक्यात आणल्या. हा सर्व प्रकार तटस्थपणे पहाणे कांग्रेसश्रेष्ठीना शक्यच नव्हते. कांग्रेसवाल्याजवळ काश्मीरी पंडितानी आपली झालेली दुर्दशा कथन केल्यावर जम्मूमधील हिंदूत आपली वेगाने घसरणारी लोकप्रियता सावरण्यासाठी शहाचा पाठिंबा काढून घेण्याचा नाईलाजास्तव निर्णय घेतला

*. काश्मीर खोऱ्यातील हिंदूची परवड थांबवण्यासाठी जम्मू-काश्मीरला घटनेने जो खास दर्जा देण्यात आला आहे, तो तावडतोब रद्द करण्यात आला पाहिजे तेथे भारताच्या इतरत्र भारतीय लोकांना जाऊन मालमत्ता करण्याची परवानगी नाही, ती तावडतोब देण्यात आली पाहिजे म्हणजे भारतातील हिंदूना तेथे जाऊन मालमत्ता करण्याचे प्रोत्साहन देण्यात येऊन त्यांची तेथील संख्या जाणीवपूर्वक वाढवण्यात आली पाहिजे. तरच हिंदूना तेथे सुरक्षितता वाटेल. ही मागणी जम्मू व काश्मीर खोऱ्यातील हिंदूनीच करावयास हवी. त्याला भारतातील इतर लोक पाठिंबा देतील व ज्या हिंदूच्या पाठिंब्याने कांग्रेस तेथे विधानसभेत २६ जागा मिळवू शकली, त्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करणे कांग्रेसला भाग पाडले पाहिजे.

आता राष्ट्रपती राजवट झाली! पुढे काय ? शहा फरूकना जाऊन मिळाल्याने त्यांचे हात खरोखरच बळकट झाले आहेत काय ? शहाला थारा देण्याची फरूकची मनापासून तयारी आहे का ? कांग्रेसतर्फे फरुकशी समझोता करण्याचे प्रयत्न पुन्हा होणार नाहीत ना ? राष्ट्रपती राजवट किती दिवस राहील ? या सर्वांची उत्तरे थोड्याच दिवसात मिळतील, पण एवढे मात्र नक्की की नजीकच्या काळात निवडणुका घेण्यात आल्या तर कांग्रेसला दारूण पराभव पत्करावा लागेल. याची कांग्रेसवाल्याना कल्पना आहे का ? ☐

# सव्वादोन महिन्यात फक्त (?) पंधरा राजीनामे

अनिल शिंदे

...आणि शेवटी महाराष्ट्राचे महनीय मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनी राजीनामा दिला; पण दिला कसला आलाय त्यांना वरनं साक्षात दिल्लीश्वराकडून आदेशच आला आणि मग त्यांनी राजीनामा दिला. उच्च न्यायालयानं मुख्यमंत्र्याच्या कन्येबाबत म्हणजे तिच्या उत्तीर्ण होण्याबाबत मुख्यमंत्र्यावर ठपका ठेवलाच. आणि मग 'नैतिक' मूल्यांची बूज राखीत मुख्यमंत्री महाशयांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

निलंगेकर यांच्या राजिनाम्यानं एक वेगळीच गोष्ट आता पुढे आली. अधिक योग्य शब्दात म्हणायचं तर स्पष्ट झाली आणि ती म्हणजे सध्याचे दिवस राजीनाम्याचे आहेत. १९८५ हे घटनांचं वर्ष होतं तर १९८६ हे वर्ष राजीनाम्याचं असं म्हणण्याची वेळ येते की काय, इतक्या वेगानं सध्या राजीनामे दिले जात आहेत. एक जानेवारी ते सात मार्च या सव्वादोन महिन्याच्या कालावधीत प्रथमश्रेणीच्या स्तरावर किमान तेरा जणांनी राजिनामे दिले असे दिसते आणि मग एक विचार सहजच येऊन जातो की, या विविध राजिनाम्यांची कारणे तपासून या राजिनाम्यात सर्वात चांगला राजीनामा कोणाचा ते तपासून पहावे

१९ जानेवारीला या राजीनामा प्रकरणाची सुरुवात होते. कांग्रेस शताब्दी सोहळा नुकताच पार पडला होता इ कॉं. चे अध्यक्ष राजीव गांधी पक्षातल्या अव्यवस्थेवर भडकून उठले होते. त्यांनी पक्ष स्वच्छ व मजबूत करण्याची घोषणा त्या उत्साहात केली या घोषणेची प्रचीती १९ जानेवारीला आली. पुन्हा एकदा विसरू पाहणाऱ्या कामराजाचे स्मरण अवघ्या देशाला या निमित्ताने झाले. इ कॉं मजबूत व्हावी म्हणून तीन केंद्रीय मंत्र्यांनी आपापल्या मंत्रीपदाचे राजिनामे दिले व पक्षकार्याला वाहून घेण्याची घोषणा केली. त्याचबरोबर राज्यसभेच्या उपाध्यक्षा नज्मा हेपतुल्ला यांनीही याच कारणासाठी राजीनामा दिला आणि येथेच राजीनामा हप्ता क्रमांक एक दिला गेला.

त्यानंतर आठ-नऊ दिवसच मधे गेले असतील नसतील तो गेल्यावर्षीपासून गाजणारे रामस्वरूप हेरगिरी प्रकरण पुन्हा एकदा 'फॉर्मात' आले. रामस्वरूपचे आरोपपत्र सादर झाले त्यात अनेकांच्या नावाप्रमाणे दोन केंद्रिय मंत्र्यांचीही नावे होती. के. पी. सिंगदेव व चंदुलाल चंद्राकार अशी त्यांची नावे. या दोघांनी २७ जानेवारीलाच राजिनामे दिले व आरोपपत्र २८ जानेवारीला प्रसिद्ध झाले. आदल्या दिवशी हे राजिनामे पक्षकार्यास्तवच आहेत असे सांगण्यात आले. प्रत्यक्ष कारण लगेचच स्पष्ट झाले आणि त्यांनी नैतिक मूल्याची बूज राखण्यासाठीच राजिनामे दिल्याचे जनतेला 'समजले.'

तिकडे कर्नाटकात गेले वर्षभर एक प्रकरण गाजत होते. हे प्रकरण उच्च न्यायालयात दाखल होते. मात्र चर्चा सतत होत होती अखेरीस त्या प्रकरणाचा निकाल लागला. त्यात कर्नाटक सरकारवर ताशेरे झाडण्यात आले; पण प्रत्यक्ष सरकार व मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांच्यावर कोणताही आरोप नव्हता. हे प्रकरण होते 'अरक' बाटल्या बंद करण्याच्या टेंडरबाबत घातल्या गेलेल्या घोळाबाबतचे उच्च न्यायालयाचा निकाल जानेवारीच्या अखेरच्या आठवड्यात लागला आणि त्यानंतर दहा दिवसांनी मुख्यमंत्री हेगडे यांनी नैतिक जबाबदारी उचलीत व नैतिकमूल्याची बूज राखण्यासाठी आपल्या पदाचा राजीनामा दिला.

तशात पंजाबही पेटलेला होताच. (आजही आहेच.) अखिल भारतीय शीख विद्यार्थी संघटना व दमदमी टाकसाळ यांनी सुवर्ण मंदिरात शस्त्रांच्या जोरावर प्रवेश केला. शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीला बासनात गुंडाळून ठेवीत त्यांनी अकाल तख्त ताब्यात घेतले. त्याची पुनर्बांधणी करण्याच्या नावाखाली ते मोडलेही. याचा 'वाईट' परिणाम प्रबंधक समितीचे अध्यक्ष गुरुचरणसिंग तोहरा यांच्यावर झाला. त्यांनीही आपल्या पदाचा राजीनामा देऊन टाकला.

भारताचे नंदनवन काश्मीर हेही सध्या पेटलेलेच होते. तेथील हिंदू अल्पसंख्यांकाचे हितसंबंध राखण्यात तेथील सरकारला पूर्णतः अपयश आले होते. काश्मिरात मंदिरावर हल्ले होत होते. हिंदू पंडे एवढे त्रस्त झाले की, लवकर काही झाले नाही, तर आम्ही सामुहिकरित्या काश्मिरचा त्याग करून बनियाल खिंडी पलिकडे जाऊ अशी त्यांनी घोषणा केली. दरम्यान या विषयावर दिल्लीत काश्मिरचे मुख्यमंत्री, केंद्रिय मंत्रिमंडळ, माजी मुख्यमंत्री यांच्यात चर्चा झडत होती. परिणामी ज्या इंदिरा कांग्रेसच्या बळावर विद्यमान शाह सरकार होते, त्यांनी पाठिंबा काढून घेतला नि सरकार गडगडले. शाह सरकारने 'राजीनामा' दिला. जम्मू-काश्मिरात राज्यपाल राजवट आली. हा बदल आठ मार्चला झाला.

आठ मार्चलाच महाराष्ट्रात मुख्यमंत्री निलंगेकर यांना राजीनामा द्यावा लागला. त्यापूर्वी त्यांना निवडून येता यावे यासाठी त्यांचे चिरंजीव दिलीप निलंगेकर यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला. कारण अर्थातच निलंगेकर यांना 'निलंगा' येथून निवडून येता यावे हे होते. कारण आता विधानसभेचे सदस्य नसताना मुख्यमंत्री झालेल्या निलंगेकर यांचे विक्रम 'त्या अर्थाने'

भरत आलेले होते; पण आता त्यानाही राजीनामा 'द्यावा लागला!'

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माधव गोरे यानी दबाव येतो यामुळे राजीनामा दिला व तो राजीनामा राज्यपाल कोना प्रभाकर राव यानी स्वीकारला शिक्षणाची कोणतीही महत्ता न वाटणाऱ्या रावानी लगेच महत्ता विशद करणारे भाषण मुंबई विद्यापिठाच्या पदविदान समारंभात ठोकले. वास्तविक त्यानीच राजीनामा द्यायला हवा होता. ते न करता त्यानी डॉ. गोरे (त्यांचे सहकारी परीक्षा विभागाचे विशेष अधिकारी अरुणाचलम् यानीही राजीनामा दिला.) याचा राजीनामा स्वीकारला आणि त्यामुळेच राजिनामा यादी १५ पर्यंत पोहोचली

दरम्यान आठ मार्चलाच हिमाचल प्रदेशचे राज्यपाल यानी राजीनामा दिल्याचे वृत्त जाहीर झाले. मात्र त्याचे कारण समजू शकले नाही

याखेरीज एका केंद्रीय स्तरावरील व्यक्तीने नुकताच राजीनामा दिला. त्याची माहिती आपण सगळ्यात शेवटी घेणार आहोत. कारण तेथेच या लेखाचा समारोप करावयाचा आहे.

## राजीनाम्यांची योग्यायोग्यता

आतापर्यंत १५ राजीनाम्याची यादी आपण तयार केली. राजीनामा हा शब्द यात सारखा सारखा येतो आहे. हा राजीनामा म्हणजे असतो तरी काय? तो का दिला जातो? कोणत्या परिस्थितीत तो चागला, योग्य ठरतो? या प्रश्नाच्या उत्तराच्या आधारेच आपल्याला या राजीनामा विषयाचे विश्लेषण करायचे आहे

एखादी व्यक्ती जेव्हा अधिकारी व्यक्ती असते, म्हणजे विशिष्ट कार्याची जबाबदारी ती घेत असते तेव्हा तिच्या अधिकारात कोणी लुडबूड करते किंवा दूरान्वयाने का होईना पण ती व्यक्ती तिच्या क्षेत्रातील घटनेबाबत जबाबदार असते (व तिची ही अंतिम जबाबदारी असते.) किंवा तिचाच एखादा निर्णय चुकतो किंवा तिच्या अधिकाराचा तिने दुरुपयोग केला हे स्पष्ट होते. तेव्हा त्या व्यक्तीला पद सोडावे लागते अथवा सोडावेसे वाटते कोणी इतर न सागता जेव्हा ती व्यक्ती पदत्याग करते तेव्हा तो राजीनामा ठरतो जेव्हा वरतून दबाव आणून निरुपाय म्हणून पदत्याग करावा लागतो तेव्हा ती हकालपट्टीच असते.

आता एक पाया तयार झाला, ज्याच्या जोरावर आपण वरील प्रत्येक प्रकारचा राजीनामा तपासून पाहू शकू. सत्तेचा मोह हा केव्हाही जबरदस्त असतो. तो मोह टाळून जो समाजकार्य वा पक्षकार्य करण्यास तयार होतो तो सामान्य माणूस खात्रीने नव्हे पण हा मोह त्याने स्वेच्छेने टाळलेला असावा. आपल्या तीन केंद्रीय मंत्र्यानी जे राजीनामे दिले, त्याचबरोबर राज्यसभेच्या उपाध्यक्षा नज्मा हेपतुल्ला यानी राजीनामा दिला याबाबत काय दिसते? याबाबत हे राजीनामे स्वखुषीने दिलेत असे छातीठोकपणे म्हणता येणार नाही. एक अर्जुनसिंग वगळता इतराचे कार्यच फारसे उज्ज्वल नव्हते. त्यामुळेच त्याना राजीनामा द्यायला लावून पदमुक्त करण्यात आले हे पुरेसे स्पष्ट झालेले आहे अर्जुनसिंगाचे महत्त्व वाढत होते त्यामुळे त्याना पक्षकार्यात जुपले हेही खूप विवाद्य होण्याचे कारण नाही. पण इतरांपेक्षा अर्जुनसिंग यानी सत्तेचा मोह टाळला हे त्यांनी गेल्या काही महिन्यात जे कार्य केलेले दिसते त्यावरून स्पष्ट होते. या तीन मंत्र्यात सिंगांचा चांगला राजीनामा म्हणता येतो पण यात पक्षस्वार्थ आहे समाजस्वार्थ नाही त्यामुळे त्या राजीनाम्याला दुय्यम स्थिती प्राप्त होते सिंग हे इ. कॉं उपाध्यक्ष झाल्यामुळे पूर्वी पक्षश्रेष्ठी म्हटले की फक्त पंतप्रधान दिसावेत ही स्थिती आता उरली नाही.

त्यानतर राजिनामे पुढे येतात ते के. पि. सिंगदेव व चंदुलाल चंद्राकार या दोन केंद्रीय मंत्र्यांचे रामस्वरूप प्रकरणात केवळ नावे आली यामुळे हे दोघे मंत्रीपदातून मुक्त झाले. अन्य ठिकाणी इं कॉं चे मुख्यमंत्री प्रत्यक्ष डाग येईपर्यंत राजीनामे देत नसताना केवळ नैतिक मूल्याची राखण करण्यासाठी या दोघानी राजीनामे दिले हे कितपत योग्य होते? कितपत पटणारे आहे? या दोघा मंत्र्यानीही आपल्या कारकिर्दीत विशेष काही केलेले नाही; पण आहे त्याची चर्चा होऊ नये यासाठीच हे राजीनामे दिलेले असतात.

राजकीय वर्तुळात एक चांगली प्रथा पाडणारे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी जो राजीनामा दिला तोही उच्च न्यायालयाने सरकारवर जो ठपका ठेवला त्यातून दिला येथे त्यानी राजीनामा द्यायला एक तर या निकालानतर दहा दिवस का घेतले याचे समर्थन पुरेसे समाधानकारक असे झालेले नाही आणि मग दुसरा प्रश्न असा की, हा राजीनामा गुप्ततेने चद्रशेखराकडे पाठविला जातो काय नि तो मध्येच फुटतो काय? या सगळ्या घटना नाटयात्मक वाटतात नैतिक जबाबदारीही त्यावरची झालर वाटते. आपण कर्नाटकचे वाली आहोत, आपल्याशिवाय दुसरे कोणी निवडून येऊच शकत नाही, या खात्रीच्या जोरावरच हेगडेसाहेबानी राजीनामा दिला हे म्हणायला खूपच वाव आहे. अन्यथा ते पुन्हा त्याच पदावर आरुढ कशाला झाले असते? त्यामुळे तो इतर राजिनाम्यांपेक्षा चागला राजीनामा असला तरी 'शंभर टक्के सोने' असं त्याचं वर्णन करता येत नाही.

गुरुद्वारा प्रबंधक समितीचे अध्यक्ष गुरुचरण सिंग याचा राजीनामा हा चांगला, 'ए वन' म्हणता येईल का? यालाही नाही असेच उत्तर द्यावे लागते, याचे प्रमुख कारण म्हणजे ज्यावेळी शिखाच्या दमदमी व विद्यार्थी महासघ या जहाल गटाविरुद्ध दंड थोपटून उभे रहाणे आवश्यक होते त्यावेळीच तोहरानी राजीनामा दिला. ही वेळ नैतिकता बाजूला ठेवून जशास तसे उभे राहण्याची. तोहरांनी राजीनामा देऊन या दमदमीची शक्ती एक प्रकारे वाढविली आहे. त्यामुळे हंगामी अध्यक्ष काबूल सिंग याच्यावर लगेचच हल्ला झाला. हे कशाचे लक्षण? म्हणजेच तोहरा याच्या राजिनाम्याची वेळ चुकली आहे.

काश्मिरचे शाह सरकार तर बरखास्तच करण्यात आले. त्यामुळे त्यानतरचा त्याचा राजीनामा ही खरं तर हकालपट्टीच आहे. हिमाचल प्रदेशाच्या राज्यपालानी आपला राजीनामा का दिला हे स्पष्ट होऊ शकलेलं नाही.

महाराष्ट्राचे मुख्यमत्री शिवाजीराव पाटील निलगेकर याचा राजीनामा काही इंदिरा काँग्रेस नेत्याना आवडला कित्येकानी हेगडेंशी तुलना केली पण वस्तुनिष्ठ विचार करणाऱ्याला हे पटावयाचे नाही. तीन वेळा नापास झालेल्या आपल्या मुलीला डॉक्टर होता यावे यासाठी वजन खर्ची घालणारे हे मुख्यमत्री. अगदी उच्च न्यायालयाने ठपका

ठेवला तरी हलायला तयार नव्हते. अखेरीस पतप्रधान राजीव गांधी याचा फोन येतो, तेव्हा कुठे महनीय मुख्यमंत्री आपल्या पदाचा नैतिक मूल्याची बूज राखण्यासाठी राजीनामा देतात त्याचे चहाते त्याच कौतुक करतात; पण ही त्याची एक प्रकारे हकालपट्टीच आहे, हे सूज्ञास सागावे लागत नाही.

याच प्रकरणात ज्या डॉ. माधव गोरे यानी राजीनामा दिला तो सर्वार्थाने खरा राजीनामा म्हणता येईल शैक्षणिक क्षेत्रावर राजकीय दबाव येतो त्याचा निषेध म्हणून करण्यात आलेला हा राजीनामा आतापर्यंत आपण पाहिलेल्या राजिनाम्यात हा सर्वार्थाने चागला राजीनामा होय त्याचेच एक सहकारी व परीक्षा विभागाचे विशेष अधिकारी अरुणाचलम् याच्याबाबतही तेच म्हणता येईल.

## सर्वोत्कृष्ट राजीनामा

राजिनाम्याची यादी तपासून पाहताना नोदविताना एक नाव नतर घेऊ असे वर म्हटले आहे त्याचा उल्लेख आता या सर्व तपशीलानतर करता येईल हा राजीनामाही आहे एका केद्रीय मत्र्याचा. ज्या व्यक्तीने आपल्या एकाच गोष्टीचा सातत्याने पाठपुरावा करून सरकार २१ व्या शतकाऐवजी १९ व्या शतकाकडे कशी वाटचाल करत आहे हे दाखविले, त्या व्यक्तीचा. हा राजीनामा आहे. या राजीनामावाल्याच नाव आहे श्री. अरिफ महमद भारताच्या उर्जाखात्याचे ते राज्यमत्री होत. त्याचा राजीनामा हा गेल्या सव्वादोन महिन्यातला एक अनन्य साधारण राजीनामा आहे असे म्हणता येईल.

हा राजीनामा सर्वोत्कृष्ट व अनन्यसाधारण का ? याची अनेक कारणे आहे. अरिफ हे गेले वर्षभर गाजत आहेत. शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानतर, पोटगीचा आदेश दिल्यानतर मुस्लिम समाजात एकच हलकल्लोळ माजला सर्व स्तरातून अनेक प्रतिगामी मुस्लिमानी त्याला विरोध केला. महंमदचा शब्द हाच प्रमाण मानणाऱ्या अनेकानी सरन्यायाधीश (आता माजी) चद्रचूडावर टीकेची झोड उठविली. महमदाच्या नियमाचा अर्थ लावणारे हे कोण ? 'अहो मी अन्यय लावला' असे सरन्यायाधीशानी स्पष्ट केले, पण टीका थाबली नाही सरकारला तर गठठा मते हवी होती, तेही मूग गिळून गप बसले.

दरम्यान अनेक प्रागतिक मुस्लिमानी या विरुद्ध आवाज उठविला. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल योग्य, शाहबानोला पोटगी मिळावीच असे अनेकानी म्हटले. पण सरकार गांगरले होते या गागरलेल्या सरकारमध्येच एक मत्री असा होता, जो स्वत. मुस्लिम होता. परतु वस्तुनिष्ठ विचार करणारा होता त्याने संसदेत झझावाती भाषण ठोकीत शाहबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत केले आणि इदिरा कॉंग्रेसच्या प्रतिमेला लहान का होईना एक चागला धक्का दिला !

मात्र सरकार गागरलेलेच होते. शाहबानो निर्णय रावविण्याऐवजी सरकार पळवाटा शोधू लागले होते मग इ कॉं. श्रेष्ठीच्या सुपिक डोक्यातून एक विधेयक बाहेर आले आणि ते तलाकपिडीत मुस्लिम महिलाना सरक्षण देणारे ! थोडक्यात शहाबानो निर्णयापासून दूर पळणारे. तो निर्णय शक्यतो न पाळता न्यायसस्थेला बासनात गुडाळण्याचा प्रयत्न करणारे. प्रथम तर पहिल्या दुसऱ्या दिवशीच हे विधेयक घाईने सरकारने ससदेत आणू पाहिले तेव्हा विरोधी पक्षानी त्याला कडाडून विरोध केला. परिणामी घाईगर्दीने ते विधेयक मजूर करून घेण्याचा एक प्रयत्न फसला.

नतर पुन्हा ते विधेयक संसदेत आले. तेव्हा हा राज्यमत्री उभा राहिला नि त्याने कडाडून विरोध केला. सरकारची घाई पाहून त्याने आपला राजीनामाच देऊन टाकला आणि पुन्हा एकदा हा आरिफ नावाचा सितारा चमकला.

आरिफ यांना तशी खात्री असलीच पाहिजे किमान कल्पना तरी असलीच पाहिजे की, आपण राजीनामा दिला तर ४०० खासदारापैकी अनेकजण मत्री होण्यास टपलेले आहेत राजीनामा दिल्यावर तो परत घ्या अशी 'हेगडे प्रकरणाची' पुनरावृत्ती इ कॉं त खात्रीने होणार नाही राजीनामा दिला की तो स्वीकारलाच जाणार; पण तरीही या बहाद्दराने राजीनामा दिला.

याखेरीज श्री आरिफ यानी आपल्या गठ्ठा मताचा विचार केलाच नाही वास्तविक पाहता हा मुस्लीम माणूस, त्यामागे मुस्लिमाची गठ्ठा मते सहजपणे उभी राहणारी अशावेळी त्यानी आपल्या पायावर 'धोडा' मारीत या विधेयकाला विरोध केला ही गठ्ठा मते आपल्याला कायमची दुखावतील याची खात्री असताही त्यानी राजीनामा दिला नि विधेयकाला तीव्र विरोध केला.

या मुस्लीम नेत्याने खऱ्या अर्थाने जाणले की, मुस्लिमानाही २१ व्या शतकात खऱ्या अर्थाने न्यावयाचे असेल तर हीच वेळ आहे. याचवेळी विरोध केला पाहिजे. सरकारच्या व मुठभर प्रतिगामी मुस्लिमाच्या मागास विचारसरणीला आत्ताच विरोध केला पाहिजे आणि त्यानी विरोध केला.

मग आता सागा समाजाच्या हितासाठी पर्यायाने समान नागरी कायद्याच्या दिशेने होणाऱ्या वाटचालीसाठी, न्यायालयाची प्रतिष्ठा राखण्यासाठी जो मत्री आपल्या पदाचा मोह त्यागतो, आपल्या पक्षश्रेष्ठीना दुखावतो, समाजाच्याच भल्यासाठी स्वतःच्याच समाजाला दुखावतो पण तत्व सोडत नाही हा राजीनामा इतर कोणत्याही राजीनाम्यापेक्षा श्रेष्ठ नाही का ? तो अतुलनीय सर्वोत्कृष्ट, निस्वार्थी असा नाही का ? गेल्या सव्वा दोन महिन्यातल्या अनेक प्रकारच्या राजिनाम्यात तो उठून दिसत नाही का ? □


मराठीतील एक सच्चे आत्मचरित्र

हंसा वाडकर

**सांगत्ये ऐका**

चौथी आवृत्ती

मूल्य : १४ रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०

# प्रतिकाराचे अंकुर

मूळ लेखक : चंडीप्रसाद भट्ट । मराठी अनुवाद : कुसुम कर्णिक

जेथे शिव आहे, कैलास आहे. यक्षकिन्नरांचे क्रिडा क्षेत्र आहे, तेथेच निसर्गाने ऊंच-ऊंच टेकड्या, हिमाच्छादित पर्वतशिखरे, खोल पाताळ गाठणाऱ्या दऱ्या, कठिण कडे-कपारी निर्मनुष्य रानेवने आणि लांब-रुंद नद्यांचा निर्विकार खळखळाट निर्माण केला आहे. इतिहास सांगतो की, कुबेराची अलका नगरी इथेच होती, दक्ष-प्रजापतीचे विशाल साम्राज्य इथेच होते. अत्री-अनुसया यांचा आश्रम, पांडवांची स्वर्गारोहिणी कण्व मुनीचा आश्रम, सारे इथेच होते. हिंदू सस्कृतीचा इतिहास या देवभूमीमध्ये देव-देवतांच्या लीलांनी नटून सुवर्णाचा बनला आहे.

नंतरच्या काळात देवांची जागा ऋषी, मुनी, तपस्वी यांनी घेतली. त्यांनी याच भूमीत वेद-पुराणे निर्माण केली. मानवांच्या जीवन दर्शनाला त्यांनी आणखी खोली प्राप्त करून दिली. यम-नियम-संयम आचरणात आणायची शपथ घेऊन त्यांनी सद्धर्माचा प्रसार केला. नंतरच्या काळात राजकीय घडामोडी होत गेल्या आणि या दुर्गम पर्वतमय प्रदेशात संसारी जनांचे आगमन झाले. विशाल वनक्षेत्रे, स्वच्छ हवापाणी, या जीवनाच्या किमान गरजा मिळाल्यामुळे अनेक लोक या प्रदेशाकडे आकृष्ट झाले.

आतापर्यंत निशब्द असलेल्या या निबीड अरण्यात मानवी जीवनाचे संगीत उमटू लागले. येथील प्रकृतीबरोबर एकतान होऊन मानवी जीवन इथे फुलले, बहरले; परंतु हळू हळू काळ बदलला. मानवी जीवनात भौतिकता वाढली. लोकसंख्येचा वाढता दबाव असह्य होऊन ही भूमी त्रस्त झाली. दैनंदिन जीवनातल्या साध्या गरजा भागवतानाही येथे दमछाक होऊ लागली.

मानवी जीवनावर भौतिक विज्ञानाचा एकांगी हमला आणि स्थानिक साधन-संपत्तीवर वाढते निर्बंध, यामुळे दमछाक फार तीव्र व्हायला लागली.

या क्षेत्रात निसर्गाशी एकरूप झालेला त्याच्याशी जवळचे नाते जमवलेला मानव व्यवस्थेच्या हातातले बाहुले बनून कसे तरी जाण्यासाठी निरुपायाने मैदानी प्रदेशाकडे ओढला गेला.

सुंदर निसर्गाने नटलेल्या या भूमीतला मानव अंत्यत कठीण परिस्थितीपुढे लाचार बनून वाकला. स्वतःला दुबळा मानून एका ठराविक चक्रात सापडल्यासारखा हा मानव उपेक्षित जीवन जगण्याचा जणू अभ्यास करू लागला.

देशाला स्वातंत्र्य मिळाले तरी गुलामीत अडकलेला येथील माणूस स्वातंत्र्य प्राप्तीच्या कोणत्याही सुखद अनुभवापासून वंचितच राहिला. नैसर्गिक साधन संपत्तीवर बाहेरच्या सत्तेचे अधिपत्य असल्यामुळे त्याला दरिद्री बादशहांची अवस्था आली. त्या एकाकी बादशहासारखा हा ही स्वतःच्या घरापासून दूर हिंडत मैदानी प्रदेशात बदुका चालविण्याच्या अभ्यासात लागला. कधी हॉटेलातली उष्टी भांडी साफ करत, तर कधी सारे शहर झोपेच्या उबदार पांघरुणात रमलेले असताना 'जागते रहो'चा पहारा देत राहिला. कधी दगड फोडून मोठ्या लोकांकरिता रस्ते बनवून आपली फाटलेली अर्थव्यवस्था कशी तरी ठिगळ जोडून नीट करत राहिला. खुद्द त्याच्या डोळ्यासमोर त्याच्या पर्वतीय क्षेत्राच्या वैभवाचे तुकडे-तुकडे होऊन मोठ्या शहरातल्या धनिकांच्या तिजोरीत सोने बनून जात होते. पहाड जर्जर होऊन कोसळत होते आणि स्वतः बरोबर या पर्वतवासियांचे अस्तित्वही नष्ट करत होते. मानवी संस्कृतीचा हा अजय ओघ मातीला मिळवण्याचा त्यांनी जणू पणच केला होता.

स्वतःच्या प्रिय भूमिची होणारी ही दुर्दशा आणि दिवसेंदिवस कठीण होणारे जीवन

उत्तराखड, छोटया-मोठया टेकडया, त्यात नागमोडी वळणं घेणाऱ्या नद्या-नाले, बर्फानी झाकलेल्या उंचउंच पर्वत रांगा, शुद्ध हवा आणि नि.स्तब्ध वनं यामुळे जमिनीवरचा स्वर्गच वाटणारा हा प्रदेश. पर्यटकांना खेचून घेणारा, पहाडांच्या कुशीत वनसंपत्तीच्या आधारानं वर्षानुवर्ष रहाणारे इथले वनवासी.

पुढे सरकारी योजना, वनवासीचा विकास या नावाखाली उत्तराखंडातली जंगलं ठेकेदारांच्या खिशात जाऊन पडायला लागली. वृक्षांनी वेढलेले पहाड उघडेबोडके झाले. पर्यावरणाचा सूर बिघडला. जीवनदायी अलकनंदा पुराच्या पाण्यात वनवासीना बेघर करायला लागली.

वनवासींचा प्राण असलेली इथली जंगलसंपत्ती. तिची बेछूट तोड थांबवायची तर जंगल ठेकेदार, सरकारी वनखातं यांच्याविरुद्ध आवाज उठवायला पाहिजे. संघटित व्हायला पाहिजे. संघर्षाची ठिणगी त्यांच्यात चेतवली गेली आणि उभं राहिलं एक वन-आंदोलन.

' प्रतिकारके अंकूर ' ही या खऱ्याखुऱ्या वनआंदोलनावरची एक छोटीशी कादंबरी. आंदोलनाच नेतृत्व करणाऱ्या नेत्यानं लिहिलेली.

उत्तराखंड, तिथला निसर्ग, तिथले असहाय्य वनवासी आणि त्यांच्यातली संघर्षाची भावना हे सगळं फार सहजपणे या छोटया कादबरीत चित्रित झालंय, हे या कादंबरीचं वैशिष्टय आहेच. शिवाय एक प्रभावी वनआंदोलन कसं आकार घेतं हेही या कादंबरीमुळे साहित्यरूपाने पुढं येतं.

या कादंबरीचा हा मराठी अनुवाद...

---

असह्य होऊन काही लोक तिचा पदर सोडून निघून जात होते. तर काही जण तिलाच धरून राहून या धरतीसकट जगण्याची आणि मरण्याची तयारी करत होते मोहनही यातला एक होता.

रीतीरिवाज साभाळत परपरापुढे नमून वागणाऱ्या कुटुबात दोन कोवळे जीव जन्माला आले शिकण्यासाठी शाळा तर नव्हतीच. स्वत.च्या अल्प जमिनीत पिकणारे अपुरे अन्न, जगलातील कदमुळे, फळे याच्या आधारावर सर्व गोष्टीच्या अभावाला तोड देत आई-बाप या दोघाना कसे तरी वाढवत होते. ओबड-धोबड, उच-सखल शेत, जमीन जलसिंचनाची शक्यताच नाही, शेतीत घालायला खतही नाही अशा परिस्थितीत खूप मेहनत केल्यावर थोडेबहुत उत्पन्न निघत असे. वर्षाला वेळच्या-वेळी पाऊस पडला आणि पिकून तयार झालेल्या शेतावर गाराचा वर्षाव झाला नाही तर त्या वर्षी पिकलेल्या धान्यावर कसाबसा गुजारा होत असे. मुल काहीशी मोठी, जाणती झाली, आई-बापाना शेतात मदत करायला लागली तेव्हा साहजिकच मोहनच्या लग्नाचा विचार करू लागले मुलाला जन्म दिला. पालन-पोषण करून मोठ केले, तर त्याचे दोनाचे चार हात करायची जबाबदारी आई-बापाची आहे ही जबाबदारी पार पाडायला पाहिजे, नाही तर मुलगा बिन लग्नाचा राहिला म्हणून भगवान स्वर्गात जागा देणार नाही.

अलकनदानदीच्या डाव्या किनाऱ्यावर हजार फूट उचीवरच्या या दुर्गम गावात कोणी आपली मुलगी द्यायला तयार होत नसे. गावात ना धड प्यायला पाणी ना शेतीला जमीन. चालायला धड रस्ताही नाही, शेतीला पाण्याची व्यवस्था नाही. अशा गावात कोणी आपली मुलगी द्यावी तरी कशी ? आपल्या पोरीला अशा घोर परिस्थितीत टाकावे तरी कसे ? नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावरून मोटार सडक गेली होती. सडकेच्या कडे-कडेने चागली सुधारलेली गावे वसली होती. या गावात सोयर-सबध जोडण्याचा आनद काही निराळाच. शेवटी मोहनच्या बापाने कर्ज काढून मोठी रक्कम उभी केली. व्याह्याचो खूप मनधरणी केली तेव्हा पैशाच्या लालचीने बापाने सोबतीला इथे दिले मोठ्या मुश्किलीने मोहनचे लग्न झाले. काही वर्षातच धाकटया भावाचे लग्न झाले.

घरात काम करणाऱ्याची सख्या वाढली. निसर्गाने चांगली साथ दिली. शेतात धान्य बर पिकायला लागले. काही दिवस चागले गेले. पहिल्या नातीचे तोड पाहून मोहनचे वडील स्वर्गवासी झाले काही दिवसातच आईही गेली मोहनच्या दुसऱ्या मुलाचा जन्म झाला, तेव्हा त्याचा भाऊही मरून गेला. त्याची बायको माहेरी गेली. जगायला.

मोहनची बायको तिसऱ्या वेळी गरोदर होती. निसर्ग काहीसा रुसला होता काम करणे कठीण झाले होते. गावानजीकचे जगल तुटले होते. त्यामुळे जमिन खचून काही शेतजमिन तुटून गेली होती. घरात खायला अन्न उरले नव्हते. मोहनला स्वत.ची नाही, तरी लहान मुलाची व गरोदर बायकोची काळजी लागली होती. त्याना खायला काय घालावे, त्यातच तो बुडला होता

शेवटी मनावर दगड ठेवून मोहनला घर सोडावे लागले. जाताना त्याने बायकोला सागितले, ' तुझे दिवस भरायच्या आठ दिवस आधीच मी परत येईन.' मनात हिशोब होता की अजून प्रसुतीला दोन महिने अवधी आहे. या पन्नास दिवसात बाहेर कुठे तरी काम करून कमीत-कमी खर्च करून शमर एक रुपये तरी घेऊन येऊ तोपर्यंत घरात दहा मापे जव आणि दोन माप राजगिरा आहे. शिवाय बियाणाकरिता ठेवलेला तीन

माप गहू तशीच वेळ आली तर वापरता येईल, यावर तो निश्चित होता. शिवाय सर्वात भरवश्याची वस्तू होती त्याची म्हैस. कामधेनूच होती ती. तीन महिन्यापूर्वी व्यायली होती एकदा पावसाला सुरुवात झाली की, ती चाराऐवजी सात मापे नक्कीच दूध देईल. निघताना त्यानें मुलाना खुणेने सागितले की तो मिठाई आणायला जातो आहे.

मोहन जवळच्या गावी गेला. तिथे कळले की बडगावच्या बाजूला एक मोठा लाब रस्ता बनणार आहे. सीमा सडक कार्यालय त्याकरिता रोजदारीने मजुराची भरती करत आहे. तो दोन दिवस जोशीमठला राहिला. तेथे दूरच्या एका नातेवाईकाच्या हॉटेलात त्याने मुक्काम टाकला. एकदा रोजगार मिळाला की तेथेच पैसे देऊन खाईन या भरवश्यावर मालकाने परवानगी दिली. काम मिळेपर्यंतच्या दिवसात तो सकाळपासून सध्याकाळपर्यंत तिथल्या नोकराबरोबर भाडी घासण्याच्या कामाला लागे. दोन वेळेला काही तरी उरलेसुरले खायला मिळत असे.

तिसऱ्या दिवशी बडगावच्या कामावर त्याला काम मिळाले. काम पुरे झाले की रोज हजेरीपत्रकाप्रमाणे त्याला चार रुपये मिळू लागले. सकाळी साडे-आठ वाजता ट्रकने तो कामावर जाई आणि सध्याकाळी पाच वाजता सुट्टी झाली की तो बडगावहून जोशीमठला चालत येई. हॉटेलवाल्याबरोबर ठरले होते, एका जेवणाचा एक रुपया. पगाराचे सारे पैसे हरवतील या भीतीने तो मालकाकडे पैसे ठेवायला देई. नाही तरी पहिले दोन दिवस त्यानेच फुकट आश्रय दिला होता ना. रविवारी कामावर सुट्टी असे. या दिवशी मजुरीचे चार रुपये तर बुडतच. शिवाय जेवणाचे दोन रुपये गेल्यामुळे सहा रुपयाचा घाटा पडे कामावर जाताना हॉटेलच्या मागल्या भितीवर खुणेसाठी तो कोळशाची एक रेघ ओढीत असे.

काही दिवस गेल्यावर त्याने रामूला बोलावले आणि दिवस मोजायला सागितले. सदतीस दिवस भरले. हॉटेल चालकाला विचारले. त्यानेही सदतीस दिवस सागितले. विश्वास बसला, काही झाले तरी नात्यातला आहे दूरचा असला म्हणून काय झाले ? बेइमानी करणार नाही. त्याने हॉटेलमालकाकडून एक रुपया मागून घेतला. बाजारात खुमानीची फळ खूप आली होती त्याने विकत घेऊन पोटभर खाल्ली.

आज श्रावणातील सक्रातीचा सण आहे. गेले पाच दिवस पावसाने सततधार धरली होती. २० जुलैच्या रात्री तर पावसाने थैमान घातले. सध्याकाळी ५ पासून मध्यरात्रीपर्यतच्या पावसाने अलकनदेच्या काठावरचे सारे दृष्यच पालटून नेले. जोशीमठ गावात एकच गोधळ उडाला होता. प्रवासी गाड्या जागोजाग थांबल्या होत्या. सर्व लोक आपल्यापरीने या महाप्रलयाचे वर्णन करत होते गोधळ, अफवा, आणि आरडा ओरडा चालू होता, पण तरीही वाटत राहिले ससाराची गती जशी काही बद पडली आहे. मोहनच्या मनात शकाचे काहूर उठले पाऊस काय दरवर्षीच पडत असतो. कधी कधी याहीपेक्षा जोरदार वर्षा होते १९५६ मध्ये अलकनदेची पातळी किती तरी चढली होती. परतु अशी बरबादी कधी झाली नव्हती, कुणी कधी पाहिली नव्हती, की ऐकली नव्हती. सगळ्याच्या तोडून बेलाकुचीचे नाव राहून राहून येत होते. सरकारी अधिकाऱ्याची धावपळ सुरू झाली होती. अदाज आणि तर्क लढवून जिवीत आणि वित्तहानीचे चढे आकडे माडले जात होते.

अखेर कुवर त्या पदयात्रेला बाहेर पडला. बरोबरीला एक जुने स्वातत्र्यसेनानी, आताही ते सार्वजनिक कामात पडलेले होते ते साथीला मिळाले होते. प्रत्यक्ष हिंडून बघायचे होते, कुठे किती नुकसान झाले आहे बेलाकुची समोरच्या पहाडावर सात हजार फूट उर्चीवर वसलेल्या त्या गावात कुवर आपल्या साथीदाराबरोबर पोचला, तेव्हा सध्याकाळचे पाच वाजले होते गावाला स्मशानकळा आली होती. सर्वत्र दुर्गंधी पसरली होती. जिकडे तिकडे बिभत्स दृष्ये दिसत होती. बहुतेक घराची फक्त मागची भित कशीबशी उभी होती मोठमोठ्या शिलाखडाखाली सापडलेल्या म्हशीच्या धडावर आणि मुडक्यांवर गिधाडे हल्ला करत होती. कळले की ६० जनावरे अशा प्रकारे मेली आहेत. ५ घरे आणि सात गोशाळा गाडल्या गेल्या आहेत. घरात पुरुष माणूस कोणीच भेटले नाही. बायाच सागत होत्या, काय काय नुकसान झाले ते. प्रत्येक जण स्वत चे नुकसान चढवून वाढवून सागत होते पण दुसऱ्याच्या नुकसानाविषयी ब्रही न काढण्याची साऱ्यानी जणू शपथच घेतली होती

या भयानक दृश्याची पहाणी करून कुवर पुढे निघणार तेवढ्यात एका वृद्धेने येऊन सागितले की, सोभतीचे नुकसान, सर्वांपेक्षा जास्त झाले होते तिचे घर पडले होते, पण त्या पडक्या घरातच अजून तिचे ब्रिन्हाड होते. कुवर आणि त्याचे साथीदार तिकडे वळले. त्यांना येत असलेले पाहून दूर अतरावर उभी असलेली ती युवती जड पावलानी त्याच्याकडे आली तिच्या नुकसानाविषयी तिला त्यानी विचारले नुसते, तर बोलण्याच्या आधी तिचा गळा भरून आला. दुःख डोळ्यावाटे वाहू लागले. तिची परिस्थिती न सागताच लक्षात आली. १०-१५ मिनिटे तिला समजवण्यात, धीर देण्यात गेली, तेव्हा कुठे तिचे अश्रू थाबले. ती कशीबशी सागू लागली—

'माझा सारा आधारच नष्ट झाला आहे. दोन बैल, नुकतीच व्यालेली एक म्हैस याच्या आधारावर मी कसवस माझं आणि पोरांच भागवत होते ते सार त्या रात्री काळाने खाऊन टाकलं. घर होत, त्याची तर आता नावनिशाणीही राहिली नाहीये. तिथेच ही जनावरे बाधलेली होती माझी प्रसूती होऊन आठच दिवस झाले, म्हणून मी आणि मुले सोयरात म्हणून गोशाळेत होतो, नाहीतर आम्ही त्या घरातच असतो. अस वाटतय की आम्हीही त्या घराबरोबर गाडलो गेलो असतो तर सुटलो असतो रात्री दहाचा सुमार होता पहिल्यादा एक भयकर आवाज झाला. गावात गोधळ उडाला होता धावपळ चालली होती. अस वाटल की चोहीकडून प्रलय आला आहे. बारक्या मुलाना कोणावर सोडायचे, म्हणून मी बाहेरही येऊ शकले नाही. थोड्या वेळाने गोशाळेची पुढची भित कोसळली बाहेरचे पाणी आणि चिखल आत घुसले. नाईलाजाने मी उठून बाहेर आले. दरवाजा उघडला. बाहेर कडे कोसळल्याचे भयकर आवाज, मुसळधार पावसाचा धोधार, किट्ट काळोख, त्यातच लोकाच्या रडण्याचा आवाज, काही सुचत नव्हते. आत येऊन पाहते तो चूलही विझली होती चिखलराड चुलीपर्यंत पसरली होती आठ दिवसाच्या

पोरीला मांडीवर घेतले, धाकटचा मुलाला पाठीशी बांधले आणि तशीच बसून रात्र काढली. सकाळी उजाडले तेव्हा पाऊस थांबला. बारकीला टोपलीत ठेवून मी घराकडे बघायला गेले, तर त्याची नावनिशाणीही उरली नव्हती. किती तरी लोकांची घरे आणि गोशाळा नष्ट झाल्या होत्या. पण लोकांनी एकमेकांच्या मदतीने थोडी फार तरी जनावरे वाचवली. पण माझे सर्वस्वच गेले आहे.'

सोभतीच्या डोळ्यातून परत अश्रुधारा सुरू झाल्या. तिला हुंदके अनावर झाले. तिने कुंवर आणि त्याच्या साथीदारांना घरात नेले. घरात सर्वत्र दलदल झाली होती. चिखलात मिसळलेले जवाचे दाणे टिपून–वेचून ते धुवून दळून गेले चार दिवस ती कसेबसे पोट भरत होती.

गावात त्याच दिवशी सकाळी सरकारी लोक आले. त्यांनी गावात किती नुकसान झाले त्याची आकडेवारी गोळा केली. काही लोकाना पैशांची मदतही मिळाली. कोणाला २० रु. तर कोणाला १०० रु. पर्यंत मिळाले. सोभतीने खूप सांगून पाहिले; पण मुखियाची इच्छाच नव्हती की सोभतीला काही मिळावं. तिला काहीच मिळाले नाही. गावातील मुखिया सांगेल तेच खरं. त्याने आधीपासून अट घालून ठेवली होती. जेवढी मदत मिळेल त्यातली निम्मी त्याला आणि सरकारी अधिकाऱ्यांना मिळून दिली पाहिजे. आणि तीही मदत मिळायच्या अगोदर आगाव. दुसरे कारण सांगताना सोभतीचा पारा चढला.

'हा मुखिया नाही, हा व्यभिचारी आहे. याने दोनदा मला छेडले आहे. माझ्याशी अनैतिक संबंध ठेवण्याचा प्रयत्न होता याचा. मी जेव्हा माझा विळा त्याला दाखवला तेव्हा हा जरा ठिकाणावर आला. पण मिशांवर ताव मारत तेव्हाच त्याने मला बजावले, 'बघतो किती दिवस तुझा नकार टिकतो तो,' तेव्हापासून मी समजून आहे या हलकटाजवळ मदतीची याचना करायची म्हणजे अब्रू विकायला काढायची. खरा विचार केला तर याच्या पदरचे काय आहे? सर्व मदत सरकार देणार आहे. पण माझी विचारपूसही कोणी केली नाही.' परत तिला रडू फुटले. ती हमसाहमशी रडू लागली. परत सांगू लागली. 'दादांनो आता तो दुष्ट



गावात असता तर मी तुम्हाला हे सांगूही शकले नसते, आणि तुम्हालाही माझ्यावर कोसळलेल्या संकटाविषयी समजले नसते.

अंधार पडायला लागला होता. बारीक पाऊसही झाला होता. मुखिया दुसऱ्या गावावरून मदत मिळवून आला होता. बाहेरचे लोक गावात आल्याचे त्याला लगेच कळले आणि तोही तातडीने त्यांना शोधत आला. त्यांना आपल्या घरी घेऊन गेला. त्याला संकटग्रस्तांची यादी मागितल्यावर जी यादी त्याने दिली त्यात सोभतीचे नाव नव्हते. विचारल्यावर त्याने उत्तर दिले, 'तो तसलीच बाई आहे. नवरा आहे तिला. पण त्याचा कुठे पत्ताच नाही.'

रात्री जेवण वाढले तर कुंवर आणि त्याचे साथीदार जेवायला तयार नाहीत. मुखियाने विचारले तेव्हा उत्तर मिळाले की ज्या गावात आठ दिवसाच्या मुलाच्या आईला संकटकाळात रहायला थोडी जागा देण्याइतकी दयाबुद्धी कोणाच्या मनात नाही, तिथे आम्ही जेवू शकत नाही.

पावसाला जोर चढला. राहून राहून सोभतीच्या घरातला चिखल राडा त्यांच्या डोळ्यासमोर येत होता. त्यांचे म्हणणे ऐकून तिथे बसलेले काही लोक गपचित झाले होते. शेवटी एका म्हातारीने तोंड उघडले, 'मी तिला माझ्याकडे घेऊनच येते.' ती मुखियाकडे बघून तणतणली, 'मुखिया, तू आम्हाला आमचे पैसे देऊ नकोस. हे म्हणतायत ते बरोबरच आहे. आम्ही निर्दयांपेक्षाही कठोर आहोत नाहीतर काय म्हणायचे?'

म्हातारीची आणि मुखियाची तोंडातोंडी सुरू झाली. म्हातारीने त्याची सारी कर्तुक उघडी पाडली. कुंवर आणि त्याचे साथीदार यांच्या उपस्थितीमुळे आतापर्यंत मनात साठलेले दुःख आणि घृणा प्रकट व्हायला योग्य

अवसरच मिळाला. ती गरजली, 'काय ? त्या दिवसापासून रोज तू आम्हाला धमकी देतो आहेस की नाही की,जो सोभतीला सहारा देईल त्याला मी बघून घेईन.'

या गरमागरमीत तिने हेही सांगून टाकले की गावाला काही न विचारता गावाच्या वरच्या बाजूला असलेले बांजचे वृक्ष कोळसा बनवण्यासाठी याने कापून टाकले. नेमके त्याच जागेवरून हे भयानक भूस्खलन सुरू झाले. त्यामुळे साऱ्या गावाची बरबादी झालीय.

'सांग आता. मोहनने ही झाडे तोडताना तुला विरोध केला होता. तलाठ्याकडे तुझ्या-विरुद्ध तक्रारही केली होती, तेव्हापासून मोहनवर तुझा राग आहे की नाही ?' थोडे थांबून ती पुढे म्हणाली 'त्या वेळेला पैसे भरून तू तलाठ्याचे आणि सर्कलचे तोंड बंद केलेस. ते पैसे आता तू आम्हाला मिळालेल्या मदती-तून वसूल करून घेतो आहेस. जशी काही मदत तुझ्या उपकारातून आम्हाला मिळते आहे.'

मुखिया किंकर्तव्यमूढ होऊन बघत राहिला होता. म्हातारी पुढे बोलतच राहिली—

'चला माझ्या घरी. सोभतीला आणून मी एक खोली तिला देते.' म्हातारी तडक बाहेर पडली. तिच्या मागोमाग तिथे बसलेले लोकही बाहेर आले.

मग म्हातारीच्या घरी सारा बेत जमला. कुंवरजवळ तांदूळ होते. ते शिजवले गेले. सोभतीसहित आणखी पाच बाया त्यांच्या-बरोबर त्या दिवशी जेवल्या.

सकाळी लवकरच सर्वजण तयार झाले. सर्व जिल्ह्यात नुकसान झाले होते. गावा-तल्या जवळजवळ सर्व बाया त्यांना काही अंतरापर्यंत सोडायला आल्या. सर्वांच्याच डोळ्यात पाणी आले होते. सोभती हुंदके देत होती. 'दादा माझे दिवस कसे कंठायचे?'

सर्वांच्या तोंडात शब्द होते, 'तुम्ही तर आमच्या माहेरची लोकं आहात.' कुंवरच्या साथीदारांचे डोळे डबडबून आले. ते स्वतःला सावरू शकले नाहीत. ते विचार करत होते १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात आम्ही तुरुंग-वास भोगला तो याच साठी की......

मोहनला शोधत शोधत हे सारे जोशी-मठात त्याच्या दिलेल्या पत्त्यावर पोचले, तेव्हा त्याच्या पायावर दगड पडून जखम झाल्याने तो हॉटेलमध्ये पडून असल्याचे आढळले. बिचारा वेदनांनी कण्हत होता. गेले बारा दिवस तो असाच पडून होता. त्याला कल्पनाही नव्हती की बेलाकुचीला पूर आला त्या दिवशी त्याच्या गावी काय भयानक परिस्थिती ओढवली होती. एकदा त्याच्या कानावर थोडीशी कुणकुण आली; पण त्याने मजा समजून हसून ते टाळले. विश्वास तरी कसा बसावा ? त्याच्या गावाजवळ नदी नव्हती की वरच्या बाजूला कडाही नव्हता. त्याला कल्पनाच नव्हती की पूर आणि भूस्खलन कधीकधी सात हजार फूट उंचीवरही होऊ शकते.

मोहनला आश्चर्य वाटलं की, कुंवर आणि त्याचे साथीदार त्याला मदत करण्यासाठी कसे काय आले आहेत. मोहनला सर्व परि-स्थिती सांगणे त्यांना उचित वाटले नाही, म्हणून ते त्याविषयी मौन धरून होते. दुखा-वलेल्या पायाने मोटार सडकेपासून पाच मैलांचा चढ तो कसा चढणार होता; पण कोणी सांगितले काय की, आणि त्याचा विश्वास तरी कसा बसला; पण कदाचित त्याला ती बांजची झाडं आठवली असतील. ती तोडू नयेत म्हणून मुखियाला विरोध त्यानेच केला होता.

गायी राहून राहून घरी परतायला बघत होत्या. गुराखी पोरे त्रासून गेली होती. दोन बैल डोळ्यादेखत वाहून गेले होते. ओढ्याचे पाणी सतत वाढतच होते. पाऊस तर थांब-ण्याचे नाव घेत नव्हता. सर्वांच्या मनावर संकटाचे सावट पडले होते. पहाता पहाता ही रोजची परिचयाची नदी फुगत चालली होती. पाण्याला भयानक वेग आला. प्रथम काही स्लीपर्स वहात आले. नंतर चिखल, राडेरोडे याबरोबर झाडांचे खुंटही यायला लागले. एका तासात भोवतालचं चित्र झपा-ट्याने बदलत गेले. जणु काही महाप्रलय येऊन ठेपला होता. साठ एक जनावरे बरोबर घेऊन निघालेले गुराखी गुरांसारखेच अस्वस्थ व्हायला लागले. त्यांना सुरक्षित वाटेना, तेव्हा त्यांनी वरचा शिखरावरचा रस्ता पक-डला. ते वरती शिखरावर पोचले तोपर्यंत खालच्या जंगलात पाणी भरले. मोठमोठी फरची झाडे दुबळ्या केळीच्या झाडागत उन्मळून पडत होती.समोर गावात आरोळ्या-किंकाळ्या उठत होत्या. दुरून दोन जनावरे वहात येताना त्यांना दिसली. गावातून या पोरांना हाक घालत वीस-पंचवीस स्त्री-पुरु-षांचा घोळका जंगलाकडे निघालेला दिसला. पुढे आले तर त्यांचा नेहमीचा ओढा मृत्यूचे रूप धारण करून त्यांना आडवा आला होता. मुलांच्या काळजीने सर्वजण एकदमच आक्रोश करत होते. हळूहळू धुकट साठत गेले आणि २० जुलैची ती काळरात्र निकट येऊ लागली. लोक उंचावर एका शेतात बसून विलाप करत होते. दुसरे करणार तरी काय ? रात्र



त्यांनी तिथेच काढली. ज्याची पोरं (गुराबरोबर रानात गेली होती,ते पोराच्या नावाने रडत रात्रभर तसेच तिथे बसले. खरं तर अतर फक्त ५०० मिटरच होते; पण कधी तुटणारच नाही अस अतर वाटत होतं ते.

जनावरं मरून गेली, शेत वाहून गेली. अशात पलिकडे जाण्याचे धाडस तरी कोण करणार? जिकडे तिकडे भूस्खलन झालेले दिसत होते. सरकारी नोकर तिकडे पोचू शकत नव्हते. त्यामुळे सरकारी मदत वरून कागदोपत्री सुटली होती; परतु लोकापर्यंत ती पोचत नव्हती.

भोलूने कुवरला सागितले होते त्या दिवशी साठ जनावरे आणि सहा सवंगडी याच्यासह ती रात्र संकटाचा सामना करत त्याने हिमतीने कशीतरी घालवली होती. वर्णन करता करता त्याच्या चेहऱ्यावर भय दाटून येई. मोठा श्वास घेऊन तो सांगत होता–

'आमच्या गावच्या आजुबाजूचा सारा भाग कच्चा आहे. पाढरी मऊ माती आहे. थोडयाशा हालचालीनेही ती घसायला लागते आणि मग भूस्खलन सुरू होते. एकदा पैरा (भूस्खलन) सुरू झाला की, थाबण्याचे नाव नाही, भयानक स्वरूप येते त्याला! थोडे थाबून तो पुन्हा सांगू लागला. गेल्या दोन वर्षापासून या भागात वनखात्याचे काम सुरू झाले, मोठ्या प्रमाणात झाडे तोडली गेली. इतकी झाडे एकाच वेळी या भागात कधीच तुटली नव्हती. या कापलेल्या झाडाच्या ढलप्यांनी आणि उरलेल्या बुध्यांनी फार अनर्थ केला. जोराच्या पावसाच्या माऱ्याने ती सहज उखडून निघाली आणि मग पाण्याबरोबर उतारावरून वहात जाताना त्यांनी आधीच अस्थिर असलेली ही भूमी ओरबाडून काढली.

'वनखात्याच्या कामाला तुम्ही विरोध नाही केलात?'

'सुरुवातीला हे जंगल राखीव जगल होत. ४।५ वर्षापासून हे जगल खात्याच्या ताब्यात आले. त्यावेळी गावकऱ्यानी त्या गोष्टीचा विरोध केला, पण आमचे कोणी ऐकले नाही!' भोलूने निराशेने सागितले.

तो पुढे सागू लागला 'वनरक्षक झाडावर नबर टाकायला आले' तेव्हा मी मजूर म्हणून गेलो होतो. आम्हाला त्यानी सागितले की, इथे लाखो रुपयाचे काम निघेल, पण नतर कळले की, हे जगल एका ठेकेदाराने लाखो रुपयात लिलावात उचलले आहे. आम्ही त्या ठेकेदाराला भेटून काम मिळवायच्या लालचेने प्रयत्न करू लागलो. त्याच्याकडून लाखो रुपये मजुरीच्या रूपाने गावात आले असते; परंतु नतर कानावर आले की, जंगलात काम सुरू झाले आहे आणि तीनशे पश्चिमी मजूर त्याने आणले आहेत. आम्हाला काम तर कधी मिळाले नाही, फक्त नदीच्या तीरावर आम्ही कल्पलेले स्लीपर्स (रेल्वेला लागणारे स्लीपर्स) बघितले. अगोदर या झाडाला आम्ही शेतीसाठी एखादे लाकूड पाहिजे म्हणून हात लावला, तर वनरक्षक दड करत असत. तीच झाडे हे पश्चिमी मजूर अमर्यादपणे तोडत होते

वेळ होती रात्री एकची बाहेर मुसळधार पाऊस सुरू आहे कुवरला मध्येच जाग आली. खोलीत कोणीतरी हमसाहमशी रडते आहे. चादरीतून डोके बाहेर काढून कुंवरने इकडे तिकडे बघितले. त्याचा साथी बिछान्यात माडी घालून बसला आहे. हुंदक्याने तो गदगदत आहे. समोर भिंतीला टेकून एक मुलगी उभी राहून ऊर फुटून रडते आहे. काजळी धरलेल्या दिव्याच्या मद प्रकाशात फारसं काही स्पष्ट दिसत नाहीये. त्या प्रकाशात ती एखाद्या सावलीसारखी वाटते आहे. रडण्याच्या आवाजात तिचे शब्द अस्पष्ट ऐकू येत होते. सासरी होणारा छळ ती वडलाना सागत होती.

त्याच उत्तर ही हुदक्यातूनच उमटले. 'नको रडू पोरी मी त्याना समजावून सागेन'

कुवरचा गळा भरून आला. त्याच्या डोळ्यातून पाणी वाहतच राहिले. त्यातच केव्हा तरी त्याला झोप लागली. पहाटे त्याला जाग आली. शेजारी त्याचा साथी झोपेच्या आधीन झाला होता बाहेर गुडगुडीचा आवाज येत होता. कुवरने बाहेर डोकावून पाहिले भोलू तबाखू ओढत होता. मधून–मधून त्याची बडबड चालली होती.

पण कुंवरला तो काय बोलतो आहे, ते समजले नाही. अगणातून जंगलाकडे निघालेली कळाहीन लाठी नजरेला पडली. तिच्या हातात दोरी आणि दराती (कोयता) होता. प्रत्येक पावलाला ती मागे वळून बघत होती. ती दूर–दूर जात होती तस–तसा भोळूचा आवाज चढत होता. कुवर त्या उदासिनीकडे एक–टक बघत राहिला. शेवटी ती दृष्टिआड झाली.

गावा–गावातून मोठ्या प्रमाणावर पडझड झाली होती. लोक बेघर झाले होते. याचा रिपोर्ट देण्याकरिता, प्रदेश सरकारच्या मत्र्याना भेटण्याकरिता कुवरने जावे असा सर्व सरपंचाचा आग्रह चालला होता कुवरलाही एक तातडीचे काम होते. प्रदेश सरकारचे एक वरिष्ठ मत्री दिल्लीच्या वाटेवर होते असे कळल्यावरून कुवरनेही अगोदर दिल्लीचा बेत केला. गावो–गावातील पुढाऱ्याना दोन–तीन दिवसानी दिल्लीला येण्याचा निरोप देऊन त्याने दिल्लीला प्रयाण केले.

दिल्लीमध्ये एक घर आहे. जिथे कुवरसारखे कार्यकर्ते स्वत.चे घर समजून राहू शकतात. तिथे राहायची सोय होते. जेवणही स्वस्त मिळते आणि थोडीशी आपुलकीही मिळते. दूर पहाडी प्रदेशातून आलेला माणूस येथे इतक्या दूर राजधानीत आला, तरी त्याला हरवल्यासारखे वाटत नाही. या ठिकाणी त्याला लागणाऱ्या अल्पशा सुविधा सहजपणे मिळतात आणि म्हणून त्यात राजधानीतले रहाणे सुसह्य होते.

तीन दिवसानी एक टागा विश्रामगृहासमोर येऊन थाबला. स्टेशनपासून भाडे नऊ रुपये ठरले होते. ते देऊन टाग्यातून एका गावचे सरपच आणि एक तरुण पुढारी खाली उतरले. दिल्लीसारख्या ठिकाणी इतकी सोयीची जागा आणि तिथे स्वत.च्या मुलखातले इतके परिचित चेहरे बघून ते आश्चर्यचकित झाले होते. कुवरबरोबर या लोकाची घसट बघून त्याना वाटायला लागले की कुवरही मोठा पुढारी असला पाहिजे.

दुसऱ्या दिवशी तिघानी आपापली निवेदने वऱ्याच वेळा घोकली. मत्र्याच्यासमोर ती

**पण नंतर कळले, जंगल एका ठेकेदाराने लाखो रुपयात लिलावात उचलले आहे**

कथन करायची होती. अर्ज–विनत्या आणि पत्रव्यवहार सारे साभाळून बरोबर आणले होते. टॅक्सी घेऊन सरळ मंत्र्याना भेटायला ते डाक बंगल्यावर पोहचले. तर समजले की मत्रीजी तीन तासानतर एक सभा सपवून परत येतील. एका सेवकाने त्याना बैठकीच्या खोलीत बसविले.

तीन तासानी मत्रीजी बगल्यावर आले. आपल्या नेत्याच्या वक्तशीरपणामुळे तिघेही आश्चर्यचकित झाले होते. अचानक मत्रीजी बैठकीच्या खोलीतच आले. कुवर व इतरानी गडबडीने उठून प्रणाम केला. त्याना काही तरी चमत्कारीक वाटत होते. मंत्र्यानी सागितल्यावर त्यानी स्वतःची ओळख करून द्यायला सुरुवात केली. तर मध्येच मत्रीजी म्हणाले,

'अरे हो, पण तुम्हा लोकाना माहीत नाही का?'

'आम्हाला माहीत आहे म्हणून तर आपल्याला भेटायला आलो आहोत. आम्ही पूरग्रस्त भागातून आलो आहोत. तेथे तीन गावातून शभराहून अधिक कुटुंबं बेघर झाली आहेत. त्यांच्या पुनर्वसनासाठी जमिन मिळायला पाहिजे.'

मत्र्यानी ताडकन उत्तर दिले. मला सर्व माहीत आहे. पण तुम्हाला माहिती आहे का बेलाकुचीच्या पुरानतर लगेच मी हेलीकॉप्टरने तो सारा भाग हिंडलो. जोशीमठला मी उतरलो होतो. बरेच लोक भेटले, तुम्हाला समजायला हव की हेलीकॉप्टरने यायचे म्हणजे किती खर्चिक बाब आहे. तुमचा विश्वास बसणार नाही. आठ हजार रुपयाच्या हिशोबाने सरकारने सहा तासाचे अठ्ठेचाळीस हजार रुपये लष्कराला भाडे म्हणून दिले. बघा किती खर्चिक काम आहे हे! त्याच दिवशी मी धारचुलाला पण गेलो होतो. हे तर सारे करायलाच हवे म्हणा. राज्याच्या सीमेवरचे क्षेत्र आहे हे. आपल्या मुख्यमत्र्यांनी फार उदार आहेत ते, मला या प्रदेशाचा दौरा करायला ताबडतोब पाठविले. आता पुढे आणखी काय करायला हवे?'

एवढ्यात मत्रीजीना फोन आला, नतर खूप विनती करूनही परत त्याची गाठ पडलीच नाही.

कुंवर आणि इतरजण त्यांच्या प्रादेशिक राजधानीला गेले तर तिथे सागितले गेले की सरकारने बरेच काही केले आहे. शेवटी निराश होऊन सर्वजण परतले. गावात येऊन वृद्ध सभापतीना कुवरने दिल्ली आणि लखनऊची सारी हकिकत सागितली आणि हे ही सागितले की, सरकार सागते आहे की त्यानी आपल्या गावासाठी बरेच काही केले आहे.

'हे तर सर्वांनाच स्पष्ट दिसते. गावच्या वरच्या बाजूच्या घनदाट जगलाचा लिलाव सरकारने केला. रागाचिलू, कैलचे हजारो वृक्ष कापायचे ठरले. त्याच्यावरती नंबर टाकले गेले आणि नबर टाकले. त्याच्या दुप्पट झाडे ठेकेदाराश्री प्रत्यक्षात तोडली. फार हुशार ठेकेदार होता तो. जंगलातच त्याने कापण्याची मशिनरी बसवली आणि उतारावरून स्लीपर्स आणि ओडके घसरवून खाली आणविले. गावाच्या जवळच एके ठिकाणी स्लीपर्स व ओडके रचून ठेवलेले होते.

तेथून अलकनदेपर्यंत एक गरारी (पुली) लावली होती. कापण्या–तोडण्याच्या कामाकरिता २००० च्या आसपास पश्चिमी मजूर आले होते. जगल गावापासून थोड्याच अतरावर आले; पण ठेकेदार व त्यांच्या मजुरानी गावच्या लोकांना फाटी आणण्यासाठीसुद्धा जगलात पाय ठेऊ दिला नाही. स्लीपर्स व ओडके बनविताना पडलेल्या ढलप्यासुद्धा आम्हाला मिळाल्या नाहीत. रस्त्यावर काम करणाऱ्या बाहेरगावच्या मजुराना त्या विकल्या जात. इथे जंगल विभागाचे काम सुरू झाल्यापासून हा नविनच प्रकार झाला की, आम्हा गावकऱ्याना लाकूडफाटाही मिळायचा बद झाला. पूर्वापार चालत आलेला आमचा हक्क नाहीसा झाला. आमचे लोकप्रिय सरकार यापेक्षा आणखी काय करू शकणार, परतु तरीही आम्ही दुःखी झालो नाही. आमच्या जीवनमरणाचा सघर्ष सुरू झाला. २० जुलैच्या रात्रीपासून त्या रात्री एकसारखा मुसळधार पाऊस कोसळत राहिला आणि मग गावाच्या वरच्या जगलातून तोडलेल्या झाडाचे खुट आणि ढलप्या आजुबाजुची माती घेऊन खाली आले. त्याच्या रेट्याने गावाजवळ रचून ठेवलेले हजारो स्लीपर्सचा ढीग एका क्षणात चिखलाबरोबर वाहून गेला. त्याने जाताना सुक्या ओढ्यावरचा पुल तर वाहून नेलाच, पण खाली अलकनदेवरचा मोटर सडकेवरचा लोखडी पूलही तोडून टाकला. इथे आता तर वरचा सारा प्रदेश खचायला लागला आहे. घर कोसळायला लागली आहेत. ती सारी रात्र आम्ही सकटात कशी काढली असेल हे कोणीही मनुष्य समजू शकेल; पण आमचा मत्री समजू शकणार नाही. सभापती चिडून बोलत होते आमच्या पूर्वजानी मोठी घोडचूक केली. या देवदार, सुराई, रागाची झाडे याचे लहान मुलांसारखे लालन पालन त्यानी केले. पिढ्यान्‌पिढ्या त्यांचे जतन केले; पण हीच झाडे आज आमच्या जीवावर उठली आहेत. आमचे सर्वात मोठे शत्रू बनले आहेत. याच्यामुळे आम्हाला आमचे गाव सोडावे लागणार आहे सभापतीचा स्वर कपित झाला.

जोशीमठावरून पुढे नीति घाटीतून जाताना कुवर आश्चर्यचकित होऊन बघत राहिला. हिरव्यागार शेताची कुठे नाव–निशाणी दिसत नव्हती. इथे चौकोनी खाचरातून हिरवीगार शेते डोलत असत यावर आता कोणी विश्वास ठेवू शकणार नाही. सारे दृश्य एका क्षणात पालटून गेले होते. वरचे घनदाट जंगलही एका फटक्यात नष्ट झाले होते. शेकडो झाडे जमीनदोस्त झाली होती. एका भयानक मोठ्या आवाजासरशी हे घडले होते. इथल्या गावप्रमुखानी सागितले की, ती जमीन जाख देवतेची होती. ती अपवित्र झाली त्यामुळे देवता कोपली. तिने हा सर्व प्रलय घडवून आणला. कुतूहलाने कुवरने चर्चा चालूच ठेवली. इतक्या दूर जगलात देवीला अपवित्र करायला कोण गेले होते.

'माझ्यावर विश्वास नसला तर प्रत्यक्ष चला मी दाखवतो. आजही तिथे रिकामी फेकलेली शेकडो डबडी पडली आहेत. कशावर मासाचे चित्र तर कशावर फळाचे चित्र, तर कशावर दुधाचे. अग्रेजीमध्ये काय लिहिले आहे काय माहिती? दर वर्षी गरमीच्या दिवसात दररोज शेकडो लोक टोळ्याने इकडे येतात. त्याच्या ट्रेनिंगकरिता येतात.' तोड वेडावून तो म्हणाला.

'मग काय बिघडले? लोक तर पहिल्यापासून येत–जात असतील' कुवर म्हणाला.

प्रमुख बडबडला 'तुम्हाला नाही माहीत. गेल्या चार-पाच वर्षातच हे सुरू झाले आहे. आम्ही लोक आजही या भागात देवराई म्हणून तेथे गेलो तरी खरकटे होऊ नये म्हणून साधे पीठ भिजवत नाही.

'भैय्या, या लोकांना त्याच्या कामाकरिता तिथे जायचे असेल तर जाऊ द्या. पण अशा प्रकारे सर्व जगल अपवित्र करणे काय ठीक आहे का? कुंवरच्या डोळ्यात पहात त्याने विचारले. ठीक आहे, आमच्या देवतेच्या विटाळण्याविषयी सोडून देऊ. पण आमचं तर इथे सर्वस्व बरबाद झालंय. नुसती घरं आणि गोशाळा घेऊन काय करू? शेतीतर काही कामाची उरली नाहीये. ते तर तुम्ही बघितलेच आहे. जागोजागी फूटतूट, पडझड झाली आहे. हे तर आता कावळयाचे राज्य बनले आहे. जगल तुटून पडले आहे. रस्त्याचे काम करणारे ठेकेदार पडलेली झाड ५-५ रुपये देऊन खरेदी करतायत. जी झाडे अजून उभी आहेत तीही पाडून टाकतायत आमच्यातले दोघे-तिघे तरुण त्या ठेकेदाराकडे मजूर म्हणून काम करत होते. उभी झाडे तोडायला त्यांनी विरोध केला, तर ठेकेदाराने त्याना कामावरून कमी केले. वनरक्षकाकडे आम्ही तक्रार केली की, हे लोक उभी झाडे पण तोडून नेतायत. पण तो काय आमचं ऐकणार. त्याचा डेरा पडला होता ठेकेदाराकडे.'

धौलीगगा नदीवरून पुढे जाण्यासाठी असलेला पूल खरा बऱ्याच उचीवर होता. तो २० जुलैला वाहून गेला आहे, याचे कुवरला फारच आश्चर्य वाटले. तो अजूनही बनवला नाहीये. लोक अनेक वेळेला अधिकाऱ्याकडे तक्रार घेऊन गेले. दर वेळी त्याना एकच उत्तर मिळाले, पूल बाधण्यासाठी योग्य जागा नाहीये. मग गावकरी एकत्र आले. त्यानी रस्सीचा झुलता पूल बनवला. या झुलत्या पुलावरून जाणे धोक्याचे असते. त्यावर जाताना दोन मुली खाली पडून मेल्या. मुखिया हलक्या आवाजात सांगत होता. समोर बसलेल्या गवरूकडे त्याने नुसता इशारा केला. मेलेल्यातली एक मुलगी गवरूची भाच्ची होती.

धौलीगगेपासून बऱ्याच उंचीवर मोटर सडक बनवलेली होती तेथे ५ वर्षापूर्वी देवदार आणि सुरईचं घनदाट जंगल होते. लोक अभिमानाने सागत नीतीघाटीला जा आणि तिथलं घनदाट देवराईचं जगल बघा. तेथे एकटे दुकटे जाण्याचे धाडस कोणी करत नसे. पण आजची तिथली स्थिती पाहून कुवर हैराण झाला होता स्वतःच्या डोळयावर त्याचा विश्वास बसत नव्हता. मोटार सडकेच्या दोन्ही बाजूला दूरपर्यंत ओसाड प्रदेश दिसत होता. वरच्या अगाला तोडलेल्या झाडांचे थोटे खुट दिसत होते. रस्त्याच्या खालचा प्रदेश केशवपन केल्यासारखा दिसत होता. जणू काही धरतीची हजामत केली होती.

धौलीगगा आणि ऋषिगगेच्या सगमाच्या वरच्या बाजूवेही सर्व दृश्य पालटून गेले होते. काही वर्षापूर्वी जुन्यापुलाजवळ वरच्या पर्वताचा एक मोठा कडा कोसळून नदीला बांध बसला होता. आणि तिथे १ कि. मि. लाबीचा तलाव बनला होता. लोकांनी त्याला नारायण सागर असे नावही दिले होते. मोटाररस्ताही त्यामुळे दुसरीकडून नव्याने बनवायला लागला होता. २० जुलैच्या काळरात्री भयानक संहार झाला. त्या शिवाच्या ताडव नृत्यात ऋषिगगेच्या वरच्या पहाडीनी चढाओढीने भाग घेतला. वरल्या अंगाला सोणा, फुलादी इथपासून विध्वमाला, भूस्खलनाला सुरुवात झाली होती. कैलचे हिरवेगार मजबूत वृक्ष, फर, भोज, अगू ह्या वृक्षाचे घनदाट जंगल केवळ एका तासात होत्याचे नव्हते झाले. या विध्वसातच नारायण सागरही फुटला. जुना पूल, एक कि मि रस्ता सारे वाहून गेले. कुवर ऋषिगगेच्या वरच्या बाजूला मुहान्याला गेला. ५ वर्षापूर्वी तो आला होता तेव्हा इथल्या जंगलातून एक ओढा बारा महिने वहात असे त्यावर जागोजाग पाणचक्क्या काम करत असत (हिमालयात अशा पाणचक्क्या पूर्वीपासून आहेत. या पाण्याच्या शक्तीवर जाती चालवून दळण्याचे सारे काम केले जाते. थोडे पीठ प्रत्येकजण ठेवून जाते त्यातून चक्की दुरुस्ती वगैरेचा खर्च निभतो) पण त्या रात्रीपासून कसे कोण जाणे ते पाणी कायमचे लुप्त झाले.

तेथला मुखिया सागत होता, मोठ्या उत्साहाने 'भैय्या यदाच्या वर्षापासून आमच्याकडे जगलखात्याचे काम सुरू व्हायचे आहे. आमची उखळ आता पाढरी होतील.' ते पुढे सागत राहिले, 'मोठी उलाढाल व्हायची आहे. ज्या दिवशी झाडावर छाप मारण्याचे काम सुरू झाले, त्या दिवशी बारा लोकाना रोजगार मिळाला. दहा हजारावर झाडावर नंबर पडले आहेत. काही आणखी झाडावर वनरक्षकाने आम्हाला नंबर टाकायला सांगितले, ती आम्ही मोजलीही नाही. आम्हाला नक्की कळत नाहीये पण आमच्या भागात बऱ्याच लोकांना काम मिळेल असे त्यानी आम्हाला सागितले.'

'इथल्या लोकाना बराच रोजगार भेटेल' कुंवरच्या मनात हे शब्द सारखे घोळत राहिले. स्थानिक लोकाना किती काम मिळते हे त्याने चागलेच पाहिले होते. तो सारखा विचार करत होता की, इथला बारमाही वहाणारा ओढा आणि ऋषिगगेच्या वरच्या अगाच्या जगलाची एकाएकी वाताहात कशी काय झाली?

जोशीमठ आणि आजूबाजूच्या भागातले लोक सागत होते. त्या दिवशी पुन्या पेनखडच्या पर्वतावर अतोनात पाऊस झाला होता. या साऱ्या पहाडाची माळ शेवटी एकत्र जुळून आलेली आहे. गावातली वृद्ध माणसे म्हणत होती की, नदादेवी कोपली आहे, कलियुग आले आहे, जिकडे तिकडे गारांचा पाऊस पडला होता. एका गावात एक बाई म्हणत होती, 'आमच्या जंगलात पहिल्यादा ऋषिमुनी रहात होते. आता ते कुठे अतर्धान पावले कोण जाणे? कुठे नजर पडत नाहीत. त्यामुळेच हा प्रलय आला आहे'

हे सारे कुवरच्या मनात फेर धरत होते. एका साप्ताहिकात 'हिमालयन इकोलाजी' लेख त्याने वाचला होता. 'माणसाचा निसर्गाशी असंतुलित व्यवहार दिवसेंदिवस वाढतो आहे हिमालयात सैन्य, प्रवासी, रस्त्यावरील काम करणारे लोक याची आवक जावक आणि त्यांची बेपर्वाई वाढते आहे.

**रस्त्याच्या खालचा प्रदेश केशवपन केल्यासारखा दिसत होता**

रिकामी पाकिटे, तेलकट पदार्थ, फळे यांचे रिकामे डबे इतक्या प्रचड प्रमाणावर फेकले जात आहेत की त्यामुळे प्रदूषणाची समस्या निर्माण झाली आहे वैज्ञानिकानी अदाज बाधला आहे की, हे असेच चालू राहिले तर काही हजार वर्षात त्याच्या प्रभावाने साग राची पातळी त्याच्या आजच्या ठिकाणापासून चारशे फूट एवढी वाढेल'

कुवरच्या मनात मुबई, कलकत्ता, मद्रास यासारख्या समुद्राकाठच्या मोठ्या शहरातील लोकाचा विचार आला. जगात आणखी किती तरी मोठीमोठी शहरे समुद्राकाठी वसलेली आहेत या विचाराने तो आणखीच हैराण झाला.

निरहीच्या' आसपासच्या गावातल्या लोकांनी सागितले की, २० जुलैच्या रात्री त्यानी दुरून पाहिले की अलकनंदाने भयाण काळदैत्याचे रूप धारण केले होते. एक फार विलक्षण हकिकत ते परत परत सागत होते, 'त्या दिवशी अलकनदा आग ओकत होती. पुढे पुढे अग्निचा पुज होता, आणि त्यामागे भयंकर गर्जना करणारी पाण्याची धारा.' बिरही, छिनकाबगड, मैठाणाबगड, देवली-बगड आणि कालदूबगडची शेकडो घरे दुकाने याची वाताहात करत दोन्ही काठ सपाट करत सुसाट वेगाने अनकनदा श्रीनगर (गढ-वालमधील) कडे निघाली होती.

कुवर जवळच्या गोशाळेत गेला. तेथे उम्दू स्वत.चे शिवणयत्र कसेबसे बचावून असहाय्य-पणे जगत होता. त्याने सागितले की, त्याचे घर, गोशाळा, सर्व सामान, एक बैलजोडी, म्हैस सारे एका क्षणात बिरहीगंगा आणि अलकनदेच्या पुराच्या सपाट्यात वाहून गेले. बिरहीगगेत साठसत्तर कच्ची-पक्की घरे त्या पुरात वाहून गेली एका कुटुबाचे एक लाखा-वर नुकसान झाले. उम्दूच्या वाडवडिलानी जमवलेली सारी सपत्ती नष्ट झाली. फक्त हे शिवणयत्र तो वाचवू शकला बायकामुलाना त्याने जरा दूरवरच्या बाजूला जायला सागितले. अधार तर इतका होता की काही दिसत नव्हते.

तो पुढे सागू लागला, 'समोरच्या सैन्याच्या कपनीचे पन्नाससाठ लोक गेली पाच-सहा महिने कॅप ठोकून राहिले होते. त्या रात्री ते निश्चित झोपले होते. त्यांना कल्पनाही नव्हती की अलकनदा पातळी सोडून इतकी वर येईल. पण जेव्हा पाणी ५-६ फूट चढले तेव्हा त्याचा जमादार टॉर्च घेऊन बघायला गेला. नदीचे अक्राळविक्राळ रूप बघून तो घाबरून गेला. साऱ्यांना त्याने उठवून कल्पना दिली, तेव्हा साऱ्या सैनिकात धावपळ उडाली. अधारात ते एकमेकावर आदळायला लागले. काही दिसेना, काही कळेना. तेव्हा कोणाला तरी कल्पना सुचली, त्याच्या स्टॉकमधल्या सात पेट्रोलच्या पिपाना त्यानी आग लावून दिली. त्या प्रकाशात त्याना मग स्पष्ट दिसायला लागले. त्याचा फायदा आम्हालाही झाला. मी मशीन त्यामुळेच वाचवू शकलो त्यानतर वीस-पचवीस मिनिटातच अलकनदा वरपर्यंत पोचली. घोंघावणाऱ्या पाण्याने ते पेटलेले ड्रमही आपल्याबरोबर ओढले. दूरपर्यंत नदीत पाणी दिसतच नव्हते. नुसती वाहाणारी झाडेच दिसत होती. माती, चिखल, राडे-रोडे आणि झाडे फार भयानक दृष्य होते ते. आता स्वतःचाच विश्वास बसत नाही की या डोळ्यानी ते दृष्य खरोखर बघितले आहे.

उम्दूचे कुटुब मोठे आहे. त्याची बायको मेहनती आहे. म्हातारी आई आहे. बारकी मुले आहेत. शेजारच्या गावात लोकानी त्याला रहायला एक गोशाळा दिली आहे. त्याच्या डोळ्यासमोर दोन प्रश्न आ वासून उभे आहेत. रहायचे कुठे आणि खर्च कसा चालवायचा? दुसऱ्याच्या गोशाळेत किती दिवस रहायचे? त्याचा कुवरविषयी काय समज झाला कोण जाणे, त्याने कुवरजवळ मदतीची याचना केली. कुवरने धीर देऊन त्याला समजावले, की जेव्हा मदतकार्य सुरू होईल तेव्हा त्याला जरूर मदत मिळेल.

नतर मात्र कुवरला चिंता पडली, उम्दूला मदत कोठून मिळवून द्यायची? काही सुचले नाही तेव्हा त्याने ठरवले की, स्वतच्या मिळकतीतली अर्धी मिळकत त्याला पाठवून द्यायची, आणि त्याने तात्काळ पाठवायला सुरवातही केली. पाच महिन्यानतर उम्दू त्याला शोधत त्याच्या गावी आला. त्याच्या डोळ्यातून कृतज्ञता ओसडत होती: त्याने दोन खोल्याचे एक छोटे घर बाधले होते. पावसाळ्याच्या अगोदर तो वरती नीती-घाटीमध्ये रहाण्यासाठी जाणार होता. सर्व कुटुबासह. कुवरने त्याला सुचवले की प्रथम घराच छप्पर चागल पक्क बनवून टाक.मी एका हप्त्यात पैशाची व्यवस्था करतो. पण उम्दूने मानले नाही. गवताच्या छपरावर तो समा-धानी होता. नीतीघाटीहून परत आला की नतर तो छप्पर पक्के करणार होता. उम्दूने ब्राह्मणाला विचारून चागला दिवस ठरवला. आणि प्रवासाला प्रस्थान ठेवले. चार दिव-सानी बातमी आली की पिपलकोटीच्याजवळ एक कुटुब रात्री दोनच्या सुमाराला चिखला-खालती दबल गेल बातमी कळताच कुवर पिपलकोटीला गेला. तेथे कळले त्या रात्री पिपलकोटीजवळ रस्त्याच्या कडेला उम्दूने मुक्काम केला होता रात्री पावसाला सुरवात झाली, आणि वरून चिखल वाहू लागला. गडबडीने उम्दू उठला. मुलाना आणि बाय-कोला त्याने प्रथम तीराला आणून पोचवले आणि परत येऊन म्हाताऱ्या आईला हात धरून तो नेत होता, पण त्याचा तोल गेला, पाय घसरून तो चिखलाच्याखाली दबला गेला. आई किंचाळत तेथेच उभी राहिली. उम्दूचे प्रेतही हाताला लागले नाही. दुर्दैवी कुटुबीय परत गावी आले. परत त्या गवती छपराखाली त्यानी आश्रय घेतला. हे सार ऐकून कुवर हतबलतेच्या प्रचड ओझ्याखाली दबून गेला. शेवटी एवढी धडपड करूनही उम्दूच्या नशिबात काय आले, तर चिखला-खाली दबून मृत्यू.

या भागात कुवर १९५६-५७ मध्ये नोकरीकरिता राहिला होता. ज्या घरात तो दोन वर्षे राहिला होता त्या घराची आज नावनिशाणीही नाहीये. घराच्या जागी मोठ-मोठ्या शिळा पडल्या आहेत बिरही घाटात सिमेंट कॉंक्रीटमध्ये बाधलेले एवढे मोठे असे हे एकच घर होते त्यातल्या दोन खोल्या भाड्याने घेऊन तो रहात होता हे घर बिरही गगेच्या तटावर नदीपासून ५० फूट उंच एका मोठ्या खडकावर उभे होते. तेथे घराच्या पुढच्या अगणात उभा राहून तो वेगाने वाहणाऱ्या पाण्याची सी-ई-ई-ई असा आवाज ऐकत असे. उन्हाळ्याच्या दिवसात तिच्या निर्मळ पाण्यात आघोळ केल्याशिवाय त्याचा दिवस गेला नाही. पावसाच्या दिव सातही बिरहीगंगा रौद्र स्वरूप धारण करत नसे. ५-७ फूट पाणी वाढत असे एवढेच. त्या दोन वर्षात बिरहीची छाती चिरत जाणारे स्लीपर्स त्याने अनेक वेळा पाहिले होते.

२० जुलैच्या रात्री घरमालकाने रात्रीचे जेवण आवरले, तेव्हाच बिरही गंगेने रौद्र स्वरूप धारण केले होते. घराच्या भिंतीवर पाणी सपकारे मारायला लागले होते. घरमालक घाबरून मुलीला घेऊन उंच ठिकाणी आश्रयाला गेले. आयुष्यभर साठवलेली संपत्ती, घर सारे बिरहीने एका सपाट्यात त्यांच्या डोळ्यासमोरून नष्ट केले. आज त्यांच्यासमोर भविष्याबद्दल फक्त अंधारच पसरला आहे. बिरही गंगेने त्या दिवशी आपला वेगही इतका वाढवला होता की, लाखो रुपये खर्च करून बांधलेला मोटर सडकेचा पूल त्याने निकामी करून टाकला, कारण त्याच्या खाली खोल खड्डा पडला.

बिरहीने घातलेला धुमाकूळ बघून कुंवर आश्चर्यात बुडून गेला होता. सर्व भागाची माहिती घेण्याकरिता तो आणखी आत बिरहीच्या उगमाकडे गेला. गौणा गावात गेला. तेथे त्याला चार हरिजन कुटुंबांनी घेरले. त्यांना वाटले की हा कोणी तरी सरकारी पुढारी असेल. त्यांच्याजवळ आता वावभर जमीनही राहिली नव्हती. ते सांगू लागले, त्या दिवशी संध्याकाळीच अंधारून आले आपल्या बायका–पोरांना आत घेऊन जो तो आपल्या झोपडीत चुपचाप बसला होता. पाऊस जोरात सुरू झाला. एवढ्या मोठ्या पावसाला बाहेर थोपवण्याइतक्या भक्कम झोपड्या नव्हत्या आमच्या. पाऊस जसा बाहेर तसा आत अशी अवस्था होऊन गेली. सर्व चिरगुटं भिजून चिंब झाली होती. त्या रात्री चुलीवर काही शिजवायच्या आतच पावसाची झोड उठली होती. रोजचा कापुला (ताक,पीठ आणि त्यात पावसाळ्यात घनदाट उगवणारा राजगिऱ्याचा पाला घालून शिजवतात.) बनवताच आला नाही. वरून पाणी गळून चुलीत तळं झालं होतं. नदीतून चिखल वहात होता. त्यामुळे पिण्याचे पाणीही मुष्कील झाले होते. पावसाला सुरुवात झाली तेव्हा, आपल्या लेकराबाळांवर काही तरी चिरगुट झाकून बाया घरात चुपचाप झाल्या होत्या. एकाएकी नदीने एक हुंकार भरला. त्याच्या आधी एक भयानक आवाज झाला होता. असा आवाज या पूर्वी कोणी ऐकलाही नव्हता. चारी बाजूला अंधार भरला होता. यातच झोपडी उजेडाने उजळली, टॉर्चचा प्रकाश आत घुसला होता. 'बाहेर पडा, बाहेर पडा' ओरडत त्यांना घराबाहेर काढले. बाया जवळजवळ निर्वस्त्र होत्या. काय होते आहे, त्यांना कळेना. त्यांच्या मदतीला जवळच्या शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षक धावून आले होते. मुलांचा कालवा, पावसाचा धडाका यात कोणाला काही कळतच नव्हते. पर्वताच्या वरच्या अंगाला सर्व निघाले. वर पोचल्यावर शिक्षकांनी सांगितले की, त्यांच्या झोपड्यांच्या थोड्याच खालच्या बाजूला बिरहीच्या पुराचे पाणी जे मिळेल ते ओढून नेत होते. ढगांचा कडकडाट चालू होता. विजा लखलखून खाली झेपावत होत्या. पर्वतराजीतले ते दृश्य उरात धडकी भरवत होते. दुसऱ्यांदा वीज चमकली तोपर्यंत बिरहीने चारी झोपड्या प्रवाहात खेचून नेल्या होत्या.

दुसऱ्या दिवशी दिवसाउजेडी त्या दृश्यावर कोणाचा विश्वास बसेना. बिरहीच्या काठावर कालच्या महाप्रलयाने सर्व नष्ट झाले होते. इथून दोन मैलावर वरच्या अंगाला बिरही नदीवर गौनाताल ( गौना तलाव ) होता. ७५ वर्षांपूर्वी बनलेला हा ताल १ मैल लांब, ½ मैल रुंद आणि तीनशे फूट खोल होता. आता मात्र त्याच्या नितळ सुंदर जलाशयाच्या जागी चिखल, दलदल, झाडाची खोडे आणि खुंट भरले होते. लोकाचा स्वतःच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. पण हे सारं घडले होते.

दलदलीत कावळे आणि घारी मासे टिपत होते. घाटातले पुरे रस्ते बंद झाले होते. तलावाच्या बरबादीबरोबरच भूस्खलनाने रस्ते बंद होऊन बाहेरच्या जगाशी संबंधच तुटला होता. गौणा गावच्या लोकांना पाच दिवस अन्नाचा कण तर मिळालाच नाही. पण त्यांच्या संकटांना सीमाच उरली नाही. कुंवरला सारे हाल सांगताना गावकऱ्यांना हुंदके आवरत नव्हते. ज्यांच्या झोपड्या कच्च्या घरात जमा होत्या, त्यांना सरकारी मदत मिळणार नव्हती. कारण ती मालमत्ता या व्याख्येत बसत नव्हती. त्यांच्या घरात कोणतीही किमती अशी वस्तु नव्हती की तिच्या नावाने त्यांना काही नुकसान भरपाई मिळण्यासारखी होती. त्यांची घरे पडल्याने त्यांचा पुरा आधारच नष्ट झाला होता. ते सांगत होते की काही दिवसांपूर्वी एक जण येऊन त्यांना २० किलो तांदूळ देऊन गेला होता. त्यांनी ते तांदूळ आपल्या कुलदेवतेचा प्रसाद मानले होते. कुंवर बोललाच नाही की तो त्याचाच साथीदार होता.

( अपूर्ण )




## सशस्त्र क्रांतीचा अदृष्य सारथी–टिळक

**भा**रताच्या सशस्त्र संग्रामाच्या इतिहासात लोकमान्य टिळकांचे स्थान अनेकार्थांनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. टिळक हे क्रांतीकारी तरुणांचे मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक ! त्यांच्या अनेक ज्ञात अज्ञात पैलूंचे मोठे मनोहारी दर्शन 'लोकमान्य टिळक आणि क्रांतीकारक' ह्या पुस्तकात घडविले आहे. महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासाचे व्यासंगी संशोधक–श्री. य. दि. फडक्यांनी टिळकांना केंद्रीभूत मानून महाराष्ट्रातील सशस्त्र क्रांतीकारक चळवळीचा चिकित्सापूर्वक घेतलेला हा आढावा म्हणजे हा छोटेखानी ग्रंथ.

श्री. अ. ज. करंदीकर ह्यांनी ह्याच विषयावर 'क्रांतीकारक टिळक नि त्यांचा काळ' नावाचे पुस्तक मागे लिहिलेले आहे. त्याच विषयावर श्री. य. दि. फडक्यांनी जरी हे पुस्तक लिहिलेले असले तरी पुस्तकाची रचना, मांडणी, त्यातील सिद्धांत आणि मुख्यत्वेकरून त्यातील संशोधन सर्वथैव नवे आहे.

हिंसा–अहिंसेच्या सैद्धांतिक जंजाळात न सापडता लो. टिळकांनी स्वातंत्र्य हे परतंत्र भारताचे लक्ष्य मानले. 'साधनानाम अनेकता' ही टिळकांची प्रवृत्ती ! देश स्वतंत्र करण्यासाठी सर्व प्रकारचे नैतिक–अनैतिक मार्ग त्यांना मान्य होते. 'उपासतापास करून जर देशाला स्वातंत्र्य मिळत असेल तर मी उपवास करेन, तपश्चर्या करून हा देश जर स्वतंत्र होत असेल तर मी हिमालयात जाऊन कठोर तपश्चर्या करावयास तयार आहे.

संस्थानिकाची मदत घेऊन किंवा जागतिक राजकारणात एखाद्या देशाशी सधान बाधून जर येथील ब्रिटिशसत्ता नष्ट करता आली, तर माझी त्यासाठीही तयारी आहे.' लोकमान्याची धोरणे ही अशी लवचिक होती. त्यानी भारताच्या स्वातन्त्र्यासाठी सर्व गटांचा, विचारसरणीचा, देशातील-परदेशातील सबंधित सर्व सघटनांची मदत घेण्याचा प्रयत्न केला. लोकमान्याच्या श्रेष्ठत्वाचे रहस्य हे त्याच्या व्यावहारिक धोरणात आहे.

लोकमान्यानी पुण्यामध्ये रँडच्या वधात पडद्यामागे राहून सूत्रे हलविली. विशेष म्हणजे ह्या कटाची प्रेरणा लोकमान्यानी दिली आहे, हे माहीत असूनही ब्रिटिश सरकारचे पोलीस खाते काहीच करू शकले नाही. त्याच्यावर रीतसर आरोप ठेवता येईल, एवढा पुरावा इग्रज सरकार गोळा करू शकले नाही. लोकमान्यानीच नाशिकमधील 'अभिनव भारताच्या' सभासदाना काही मोलाचे सल्ले दिले. सावरकराना इग्लडला पाठविण्यासाठी त्याचीच शिफारस आणि प्रयत्न कारणीभूत ठरले. पुण्यात शिक्षणासाठी आल्यानतर टिळक आणि सावरकर हे दोन 'समधर्मा' एकमेकाच्या जवळ आले, हे देशाचे भाग्य समजावे लागेल.

बडोद्यामध्ये अरविंद घोष, बारिंद्रकुमार घोष ह्याच्या मदतीने त्यांनी पश्चिम भारतात क्रातीकारक चळवळीचे षडयंत्र रचले. नेपाळमध्ये नाटककार कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर ह्याना पाठवून तेथे क्रप्स ह्या जर्मन कपनीच्या मदतीने शस्त्राचा कारखाना उभारण्याचा त्यानी प्रयत्न केला. सेनापती बापट, शामजी कृष्ण वर्मा ह्या क्रातीकारकाना परदेशात पाठविण्यासाठी पुन्हा लोकमान्यांनीच प्रयत्न केले. परदेशात अनेक क्रातीकारकाना बाँबविद्येचे शिक्षण देण्याची व्यवस्था त्यानीच केली. देशातील सर्व महत्त्वाच्या क्रातीकारक गटाचा लोकमान्य हा केंद्रबिंदू होता. जसे जमेल, जेव्हढे शक्य होईल तशी मदत गरजू क्रातीकारकाना पुरविण्याची त्याची नेहमीच धडपड असे.

## अज्ञात पर्व

लोकमान्यांच्या प्रकट राजकीय कार्याची कल्पना तशी सर्वांना आहे; पण सशस्त्र राजकारणाचे त्यानी जे हिकमती राजकारण लढविले, त्याची माहिती महाराष्ट्रात अनेकाना नाही. हे सबंध राजकारण जेवढे लढाऊ आहे, जेवढे रोमहर्षक आहे, तेवढेच ते गुप्ततेच्या धुक्यात गुरफटलेले आहे ह्या विषयावर अधिकृत पुरावे गोळा करण्याची नितांत आवश्यकता आहे. डावपेचाचा एक भाग म्हणून सशस्त्र क्रातीच्या सर्वच लहानथोर योद्धयानी आपल्या सर्व योजना सरकार आणि जनतेपासून दडवून ठेवल्या. आज स्वातंत्र्योत्तर भारतातही ह्या सशस्त्र आंदोलनाच्या पर्वावर फारसे संशोधन झालेले नाही जे थोडेबहुत झाले आहे, त्याला लोकमान्यता नाही आणि सरकार-दरबारी प्रतिष्ठा नाही.

उपेक्षेच्या अंधारगृहात लपलेला हा तेजस्वी इतिहास, प्रयत्नपूर्वक कोणीतरी शोधला पाहिजे. त्यासाठी जनता, शैक्षणिक संस्था-संघटना आणि मुख्य म्हणजे. सरकार ह्यानी पुढाकार घेतला पाहिजे. लोकमान्याच्या जीवनातील ह्या अज्ञात पर्वाचे धागेदोरे गोळा करताना य. दि. फडक्यासारख्या संशोधकांना अनेक अडचणी येतात. संशोधकासाठी हा रक्ताने लिहिलेला (पण गुप्त आज्ञात असलेला) इतिहास म्हणजे एक आव्हान आहे.

लोकमान्याचे 'केसरी' कार्यालय तर क्रातीकारकाचे अभयारण्य (?) होते. ज्याला कोठे निवारा नाही, ज्या क्रातीकारक तरुणापुढे उपजिविकेचा प्रश्न आहे, तो 'केसरीत' येऊन दाखल व्हायचा. लोकमान्यांना दोन वेळेला जो तुरुगवास भोगावा लागला तोही सशस्त्र क्राती आणि बाँबस्फोटाचे त्यांनी केसरीत केलेल्या समर्थनामुळे! सनदशीर चळवळीसाठी किंवा काँग्रेस पक्षामधील या कामगिरीमुळे त्याना कधी अटक झाली नाही. गमतीची गोष्ट म्हणजे ज्या अग्रलेखामुळे त्यांना तुरुंगवास घडला ते अग्रलेख खाडिलकराच्या लेखणीतून उतरलेले आहेत, ते लोकमान्यांचे नाहीत, हे ब्रिटिश गुप्तहेराना माहीत होते; पण सरकार खाडिलकराविरुद्ध कारवाई करू शकत नव्हते, सपादक म्हणून लोकमान्याचे नाव 'केसरी' वर असल्यामुळे टिळकांना तुरुगात जावे लागले. विशेष म्हणजे असे ज्वालाग्रही लेखन करण्यासाठी लोकमान्यानी खाडिलकराना कधी दोष तर दिला नाहीच, उलट सारखे उत्तेजन दिले.

लोकमान्याचे (अदृष्य) हात नेपाळ, कलकत्ता, मद्रास, इदूर, बडोदा, वाराणशी, मिरत, पाटणा, हैद्राबाद, बीड, कोल्हापूर, नाशिक येथवर कसे पोहोचले होते, हे श्री. य दि. फडक्यानी सप्रमाण सिद्ध केले आहे. लोकमान्याच्या चरित्रातील अनेक अज्ञात पैलूचे ह्या पुस्तकात घडणारे दर्शन थक्क करणारे आहे.

'लोकमान्य टिळक आणि क्रातिकारक' ह्या पुस्तकाच्या निमित्ताने एक उणिव, एक व्यथा येथे बोलून दाखविल्याशिवाय रहावत नाही. भारतातील बहुतेक सर्व घटकराज्यानी आपापल्या राज्याच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास प्रसिद्ध केला आहे. काही राज्यात तर जिल्हावार इतिहासाचे खड प्रसिद्ध झाले आहेत महाराष्ट्रातील जनतेने विशेषत सरकारने ह्या बाबतीत अक्षम्य बेपर्वाई दाखविली आहे. महाराष्ट्रातील (म्हणजेच जुन्या मुबई प्रातातील) स्वातत्र्य चळवळीची जी पुस्तके उपलब्ध आहेत, ती केवळ जत्रीवजा आहेत. इग्रजी भाषेत काही ऐतिहासिक साधने प्रसिद्ध झाली आहेत, पण महाराष्ट्रातील सशस्त्र आणि अहिंसक चळवळीचा साद्यत आणि चिकित्सक इतिहास अजून उपलब्ध नाही. महाराष्ट्रातील विद्वत सस्था आणि विद्यापीठानाही त्याचे फारसे महत्त्व जाणवलेले नाही. महाराष्ट्राचा राजकीय इतिहास लिहिण्याचा संकल्प सोडलेल्या श्री. य. दि. फडक्याचा प्रस्तुतचा हा प्रयत्न म्हणूनच प्रशसनीय आहे, पण हे प्रचड कार्य एकट्यादुकट्याच्या परिश्रमाने होण्यासारखे नाही. महाराष्ट्र सरकारने तशा प्रकारचा प्रकल्प उभारला आणि काही इतिहासकारांना आणि विद्वानांना पाचारण करून त्याच्यावर ही कामगिरी सोपविल्याशिवाय हे कार्य पूर्ण होणार नाही. तूर्तास तरी आपल्याला शोध सावरकराचा आणि लोकमान्य टिळक आणि क्रान्तिकारक अशा फडक्याच्या पुस्तकावरच समाधान मानावे लागेल.

—प्रा. डॉ. ह. म. घोडके

लोकमान्य टिळक आणि क्रातिकारक
य. दि. फडके
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठ : १७५, मूल्य : ५० रुपये.

# सांस्कृतिक डोंबवली

पृष्ठ ४ वरून

आंब्याची वा इतर झाडे अजूनही तुरळक का होईना दिसत आहेत त्यामुळे अगदीच हे गाव निरस्त पादप्रदेशात–वृक्ष नसलेला देश–गणले जात नाही. अशा आम्रवृक्षावर मोहोर फुलून आलेला आहे. अजून कोकिळेची साद कानावर पडली नाही, तरी वसताचे आगमन दूर नाही असेही जाणवते आहे. ऐन परीक्षाचे दिवस म्हणजे आयांच्या कटकटीचे आणि नोकरी करणाऱ्या माताच्या रजेचे दिवस. अशा ह्या ऐन धुमश्चक्रीच्या काळात डोंबिवलीचे सास्कृतिक वातावरण मे महिन्याच्या वादळी कार्यक्रमाअगोदरच्या शातेचे असेल असे वाटत होते; पण तसे घडत नाही हे येणाऱ्या, मिळणाऱ्या निमत्रण पत्रिकावरून आणि ठिकठिकाणी लागणाऱ्या कार्यक्रमाच्या फलकावरून दिसते आहे.

डोंबिवलीत जाहीर कार्यक्रम करणेही हल्ली खूप खर्चाचे झाले आहे. आणि अजून आपल्याला नाटक, सिनेमा इ. सारख्या कार्यक्रमांव्यतिरिक्त होणाऱ्या व्याख्यान, चर्चा मुलाखती अशासारख्या कार्यक्रमाना तिकिटे काढून, पैसे देऊन जाण्याची सवय व्हायवयाची आहे हौशी, उत्साही, धडपडे आणि लटपटे कार्यकर्ते मित्राना, धनिकाना गळ घालून निधी जमवतात, सभासद करून वर्गणी जमवतात आणि कार्यक्रम आखतात, यशस्वी करतात कधी कधी विविध मार्गांनी भरपूर पैसा मिळविणाऱ्या माणसाला मिरविण्यासाठी, प्रतिष्ठा प्राप्त करून घेण्यासाठी अशा कार्यक्रमांना उदारहस्ते मदत करण्याची इच्छा होते. मग त्याने दिलेल्या देणगीतून एखाद-दुसरा कार्यक्रम उभा राहतो. कार्यकर्ते खूष, लोक खूष आणि म्हणून दाताही खूष होतो. दूरदर्शनचे जवळ जवळ आता सर्वच कार्यक्रम आता प्रायोजित होतात. मी वाट पाहतो आहे बातम्या, समाचार, दि न्यूज हे केव्हा प्रायोजित होतील त्याची ! पण असे ऐकतो की जे कार्यक्रम असंख्य प्रेक्षक पाहतात, त्यांनाच फक्त जाहिरातदार मिळतात. खरे खोटे तो विठ्ठलच जाणे. आपण आता आपले सारे दूरदर्शनवर अवलबून ठेवले आहे. त्या माध्यमाचे अनुकरण करण्यात आपण मागे पडणार नाही ह्याची काळजी घेत आहोत. त्यामुळेच की काय, आता काही सांस्कृतिक कार्यक्रमही प्रायोजित होऊ लागले आहेत. असाच एक प्रायोजित कार्यक्रम डोंबिवलीतही झाला. अर्थात दूरदर्शनवर कार्यक्रम रगात आला की 'ह्या कार्यक्रमाचा भाग अमूक तमूक तर्फे होता' असा आपला 'इडियट' पणा ह्या कार्यक्रमात नव्हता. हा गमतीचा भाग सोडून देऊ. पण असे जर चांगले कार्यक्रम एखादी व्यापारी, व्यावसायिक संस्था, सहकारी बँक आयोजित करणार असेल तर तिला हरकत घेण्याचे तूर्त तरी कारण नाही.

□

श्री. मिलिंद समेळ हे डोंबिवलीत 'संसार भाडार' नावाचे दुकान चालवितात. त्यानी 'एम. के. ट्रॅव्हल्स' ही एक प्रवासी संस्था सुरू केली आहे मुबईत अशा तऱ्हेच्या अनेक सस्था आहेत. त्या नावाजलेल्या लेखकासमवेत आपल्या सहली काढतात. त्याचप्रमाणे महिन्यातून एकदा 'साहित्यिक संध्या' साजऱ्या करणाऱ्याही काही संस्था आहेत. श्री. समेळ ह्यानी ह्या दोहोचा मिलाफ करण्याचे ठरविले आहे असे दिसते. त्यांनी आपल्या सहलीच्या उपक्रमाला सुरुवात केली आहे, आणि 'चदेरी सध्याकाळ' दि आठ मार्च रोजी साजरी केली. अशी सध्याकाळ दर महिन्याला आयोजित करण्याचा त्यांचा विचार आहे. ह्या अशा कार्यक्रमामागे असणारा हेतू जर साध्य होत असेल तरच त्यात सातत्य राहील. बघू या डोंबिवलीकर ह्या उपक्रमाला किती साथ देतात ते.

हृया चदेरी सध्याकाळची सुरुवात सहा वाजता होणार होती पण फक्त एक तास उशीराने झाली. अशा उशीराची आपल्याला सवयच झाली आहे. नाहीतरी वेळ घालवायचा कसा असाही प्रश्न काही जणांसमोर असतोच. त्यात दूरदर्शनवर एकदा पाहिलेलाच मराठी चित्रपट दाखविला जात होता, त्यामुळे बाहेर पडायला कोणतीच आडकाठी नव्हती. त्यात महाशिवरात्रीची सुटी आणि उपवासही होता. हृया सध्याकाळची सुरुवात 'पारिजात' हृया कल्याणच्या सस्थेच्या बालकलाकारांच्या महाराष्ट्र गीताने झाली. हृया लहान मुलानी–दहा मुली, चार मुलगे–मराठी-हिंदी गीते सादर केली त्यात जशी कव्वाली होती तसेच रविवार हवा असे सागणारे गीतही होते. त्याचप्रमाणे यमन, धृपद तराणाही त्या मुलानी आळविला. विविध रागदारीतील; पण आटोपशीर गीते हृया लहान मुलानी सराईतपणे गायली. शेवट अर्थातच भैरवीने झाला. हृया बालकलाकाराचा हा पहिलाच जाहीर कार्यक्रम होता पण त्या मुलाची धिटाई, तयारी दाद देण्यासारखी होती. सौ. प्राची देवस्थळी हृयांनी घेतलेली मेहनत सार्थकी लागली. ही मुले जर हा सराव असाच ठेवतील, त्यात प्रयत्नाने भर घालतील तर एक चांगला वाद्यवृद साथीला घेऊन संगीत कार्यक्रम सादर करण्यात त्याना चांगले यश मिळेल.

हृया कार्यक्रमाचे खरे आकर्षण होते श्री. प्रमोद नवलकर हृयाचे 'व्यथाकथन' हृया स्वानुभवकथनाचे. दूरदर्शनवरील 'किलबिल' हृया लहान मुलाच्या कार्यक्रमाचे निर्माते श्री. मुकुद नाईक हृयाचे नाव अगोदर जाहीर केले नव्हते; पण ते आले आणि मोजकेच बोलले. श्री. मधुकर शेरेकर हृयाच्याकडे ध्वनिमुद्रिकाचा अफाट सग्रह आहे अगदी पंचाहत्तर वर्षापूर्वीच्याही काही ध्वनिमुद्रिका त्याच्याकडे आहेत. त्यानाही बोलावले होते. तेही व्यासपीठावर हजर होते. त्याच्या हातात कागदही होते; पण ते का बोलले नाहीत हे कळले नाही. कार्यक्रम उशीरा सुरू झाला आणि 'स्टार' होते श्री. नवलकर. म्हणूनही त्याना बोलण्याची विनंती केली नसावी. किंवा सग्राहक हा वक्ता असतोच असे नाही असेही घडले असावे.

श्री. नवलकर सा. मार्मिकमधून अनेक आठवणी लिहित आहेत. त्यात हे व्यथाकथन आहेच. पण लिखित शब्द वेगळे आणि नवलकरांसारख्या व्यासपीठ गाजविणाऱ्या खंद्या वक्त्याच्या तोडून ते शब्द ऐकणे वेगळे. हृया सर्व वक्त्याची एक गमत असते. ज्याना व्याख्यानासाठी खूप ठिकाणी बोलवले जाते त्याना ध्वनिक्षेपकाचे, ओळख करून देणाऱ्याचे, आभार मानणाऱ्याचे आणि ऐकणाऱ्या किंवा न ऐकणाऱ्या श्रोत्याचे खूप चागले आणि वाईट अनुभव येतात मग हे अनुभव हेच त्याच्या व्याख्यानाचे विषय होतात तरी हे पठ्ठे व्याख्यानाला जाण्याचे बद करीत नाहीत. नवलकरांच्या व्यथा हृया गमतीदार होत्या. त्याना श्रोत्यानी हशा आणि टाळ्यानी दादही दिली. श्रोत्यानी, त्यातल्या त्यात

लहान मुलांनी आपल्याला व्याख्यान देणे कसे नकोसे केले, हे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे एका पुस्तकप्रकाशन प्रसंगी हजार माणसे बसू शकतील अशा सभागृहात व्यासपिठावरची फक्त चारच माणसे कशी हजर होती आणि तरीही तो कार्यक्रम दणक्यात कसा पार पडला हे त्यांनी सांगितले. नवलकरांना हासू आणि आसू कसे काढावेत हे फार छान जमते. त्यांच्याजवळ सांगण्यासारखेही खूप, विविध क्षेत्रातील अनुभव आहेत आणि ते खुलवून परिणामकारक सांगण्याची शैलीही आहे. श्रोत्यांना काय आवडते ते त्यांना पूर्णपणे ठाऊक आहे. त्यांच्या वक्तृत्वात हळवेपणा आहे, नाटच आहे, श्रोत्यांना सद्‌गदित करण्याची हातोटी आहे. त्याचप्रमाणे त्यांना अंतर्मुख करण्याची, विचार करायला लावण्याची ताकदही आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे आपले आयुष्य कसे घसरणीला लागले आहे. आपण महापुरुषांच्या जयंत्या आणि पुण्यतिथ्या (कोणीतरी त्यांना 'मयंत्या' हा सार्थ शब्द वापरला आहे) कशा औपचारिकरीत्या साजऱ्या करतो हे त्यांनी अनेकांची उदाहरणे देऊन स्पष्ट केले. महाराष्ट्रातील क्रांतिकारकांचा, स्वातंत्र्यासाठी बलिदान करणाऱ्यांचा विषय निघाला की, आपल्या सर्वांना हुतात्मा भाई कोतवालांची आठवण येते. पण त्या कोतवाल यांच्या वडिलांना मुलाच्या निधनानंतर उपजीविकेसाठी, नातवाला वाढविण्यासाठी माथेरानच्या रस्त्यावर भीक मागण्याव्यतिरिक्त त्यांना दुसरा कोणताच मार्ग नव्हता हे त्यांनी सांगितले. भाईच्या मुलाने आत्महत्या कशी केली हे आपले व्यथाकथन करून उपस्थितांना त्यांनी हेलावून सोडले. आपला विधानसभेतील आणि विधानपरिषदेतील अनुभव सांगताना ते कष्टीच झाले. 'जेव्हा सांगण्यासारखं खूप असताना सभागृहात उपस्थिती असायची दहा किंवा पंधरा सदस्यांची' हे ऐकताना आपले आमदार कसे आहेत ह्याचे स्पष्ट चित्रच त्यांनी उभे केले. ते आपल्या व्याख्यानात सांगत होते आपले स्वतःचे व्यथापुराण, पण राहून राहून वाटत होते की, ह्या तर आपल्या समाजाच्या व्यथा आहेत. ही शोकांतिका ह्या समाजपुरुषाचीच आहे आणि त्याला हा समाजच जबाबदार आहे. अशा व्यथाकथनांनी आपण आपल्याच ख्यालीखुशालीतून जरासे बाहेर पडू लागलो, पडण्याचा विचार करू लागलो तरच काही उपयोग झाला असे वाटेल. नाहीतर चार घटका हसण्यात आणि हळहळण्यात गेल्या, वेळ छान गेला असे व्हावयास नको. आज अशा अंजनाची खरी गरज आहे की त्याहून तीव्र अशा दणक्याची गरज असा विचार करीत कोणकोण घरी गेले हे सांगणे कठीण आहे.

ह्या चंदेरी संध्याकाळचे आयोजन करणाऱ्यांचा नक्की हेतू—व्यवसायाबरोबरचा-अजून स्पष्ट झाला नाही. असेच कार्यक्रम आखले गेले तरी खूप आहे. ह्या चंदेरी संध्याकाळच्या कार्यक्रमाचे संचालन सौ. प्राची देवस्थळी व श्री. अशोक शेवडे ह्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन हा एक वेगळाच वार्तालेखाचा विषय आहे. त्याविषयी केव्हातरी सवडीने लिहावयाचा विचार आहे.

—चंद्रशेखर राजे

## रंगभूमी

# एक अभिनव प्रयोग....' द सिटी '

वि. भा. देशपांडे

गेल्या डिसेंबर महिन्यात पुण्यामध्ये एक नाटचशिक्षण शिबिर घेण्यात आले. वास्तविक पुण्यात असे शिबिर होणे यात नवलाईचे काहीच नाही; पण या शिबिराचे वेगळेपण होते. ते असे की, लंडन येथून काही नाटचधर्मी मंडळी मुंबईला आविष्कार संस्थेने आमंत्रित केली. त्यांनी तिथे शिबिर घेतल्यावर तसेच पुण्यातही घ्यावे असे संबंधितांनी ठरविले. पहिले शिबिर चार दिवसांचे होते. त्याला उत्तम प्रतिसाद लाभला. केवळ संख्येने नव्हे तर कार्याच्या हिशेबातही तो प्रतिसाद महत्त्वपूर्ण होता. त्यातूनच एक निर्णय झाला की, फेब्रुवारीच्या अखेरचा आठवडा आणि मार्चचा पहिला आठवडा असे पंधरा दिवसाचे स्वतंत्र शिबिर घेऊन त्या मुलांचे साह्य घेऊन एक प्रयोग पेश करायचा.

त्यातून 'द सिटी ऑफ द सेव्हन डेडली सिन्स' या नाटकाचा प्रयोग उभा राहिला. या नाटकाचे रूप नेहमीपेक्षा वेगळे आहे. त्याचे कथासूत्र थोडक्यात असे— एक भाऊ आणि एक बहीण आपल्या आईच्या मृत्यूनंतर एका शहराच्या दिशेने जातात. या अजाण बालकांना कल्पना नसते की, आपण ज्या शहराची वाट चालत आहोत, त्या वाटेवर आपल्या सोबतीला सात शत्रू आहेत. हे शत्रू माणसाच्या जीवनाला पोखरून काढतात. त्याला संपवून टाकतात. आपल्याकडे षड्रिपूंची कल्पना आहे, तीच इथे नाटकात वापरली आहे. परिस्थितीनुरूप त्या भावा–बहिणीला आपल्या आयुष्याचा पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी भिन्न मार्गांना जावे लागते. बहीण एका चित्रपटाच्या स्टुडिओमध्ये काम मिळवते. तिथे सफाई कामगार म्हणून तिला काही पैसे मिळू लागतात; पण त्याच वातावरणात राहून, एका प्रेमप्रकरणाच्या आधारे नायिकेचे काम मिळवते. त्या संदर्भात तिला एक अट घातलेली असते की, तू तुझे वजन कमी करायचेस; पण जीवनातला 'मोह' आडवा येतो आणि तिला चित्रपटजग सोडावे लागते. तिथून तिचा संपर्क येतो एका भिकाऱ्यांच्या जगाशी. राजाशी तिचा विवाह होतो आणि ती त्या जगाची राणी बनते. तिचा भाऊ असाच भटकत जात आपल्या आयुष्याची

वाट चालत राहतो; पण त्याच्या अंगात भरपूर आळस भरला असल्याने त्याला हाती काहीच लागत नाही. उलट भिकाऱ्याचे एक पोर यानेच मारले असा यावर आरोप येतो. सारे भिकारी त्याचा सूड घेण्याच्या अवस्थेत असतात. अशावेळी भिकाऱ्याची राणी आपल्या भावाला सोडवण्याचा यत्न करते. या निमित्ताने आपल्या भावाला अद्दल घडावी, खरे तर त्याचा आळशी स्वभाव नाहीसा व्हावा ही त्यामागची कल्पना.

हा भाऊ बाजारामध्ये दिवास्वप्न पाहतो. त्यामध्ये त्याला दिसते की, यंत्रमय राजवाड्यात अन्नाबरोबर सत्ता, संपत्तीही आपल्याला मिळणार आहे. राजवाड्यात वासनेचे आणि हेवा-मत्सर याचे सर्वत्र प्रभावी अस्तित्व असते. या आधारे गरिबाना आकर्षित करून त्याना उध्वस्त करतात, त्याचे चेहरे हिसकावून घेऊन त्यांना नि:सत्त्व निरुप करून टाकतात ज्या राजवाड्यात एकदा गेल्यावर परतीचा मार्ग नसतो अशा राजवाड्यात हा भाऊ जातो आणि तिथल्या भिकाऱ्याशी युद्ध पुकारतो.

या युद्धात सारीच होरपळ होते. परिणामी त्याची बहीण त्यामध्ये मेली आहे असे लक्षात येते. शहर बेचिराख होते; पण सप्तरिपु मात्र असतात. ते आपला खेळ पुन: पुन्हा चालूच ठेवतात...

या कथेच्या निमित्ताने मानवी जीवन आणि त्या जीवनाला ग्रासणारे अनेक शत्रू याच्यातून घडणारे नाट्य महत्त्वाचे होते. विषयाच्या नाविन्यापेक्षा प्रयोगाचे सादरीकरण अधिक लक्षवेधी ठरले. प्रथमदर्शनी ध्यानात येणारी गोष्ट म्हणजे नाटक सादर करण्याची नेहमीची पद्धती नव्हती. हे एक नृत्य-मूकनाट्य होते. यामध्ये मुखवट्याचा वापर होता. निवेदकाचा वापर होता. मूकनाट्य असल्याने कोणत्याही पात्राच्या तोंडी कोणत्याच प्रकारचे सवाद नव्हते. सर्व भाव नृत्यातून आणि अन्य हालचालीतून व्यक्त होत होते. मुखवट्याचा जरी आवश्यक तो वापर होता तरी सारा भर शारीर माध्यमातून भावाभिव्यक्ती करण्यावर अधिकतेने होता. दिग्दर्शकाने पात्राकरवी केलेल्या विरचना आणि आकृतीबंध हे एका विशिष्ट लयकारीत असल्याने सपूर्ण प्रयोगाचा घाटच तसा बनत गेला. तसाच तो अभिप्रेत होता. साथीला अर्थातच आवश्यक त्या गतीचे सगीत आणि प्रकाशयोजन होते.

नृत्यमय शैलीतली किंवा सामूहिक पद्धतीने केवळ शारीर माध्यमातून व्यक्त होणारी नाटके आपण काही प्रमाणात केलेली पाहिली आहेत. परंतु या प्रयोगाच्या धर्तीवरचे प्रयोग फारच क्वचित होताना दिसतात. एक तर आपल्याकडच्या नाटकाचा भर आणि भार शब्दसवादावर आधारीत असतो. पण पूर्णत: मूकनाट्य करण्याचे प्रमाण अपवादात्मक. त्यातही नृत्य-मूकाभिनित नाट्य-सगीत आणि मुखवटे असे एकत्रितपणाने अभिव्यक्त होणारा प्रयोग दुर्मिळच. म्हणून या प्रयोगाचे महत्त्व.

या नाटकाचे लेखक-दिग्दर्शक आणि सकल्पनात्मक आकृतीबधात्मक गोष्टीचे नियोजक होते श्री. डेव्हिड ग्रीव्हज. त्याच्या साथीला लंडनहून आलेली हेलेन मॅसी होती. वेशभूषा, मुखवटे आदी गोष्टीही डेव्हिडनेच केलेल्या होत्या. नेपथ्यरचना होती शाम भुतकर याची. प्रकाशयोजक होते बाळ मोघे. रगभूषा होती प्रभाकर भावे याची. दिग्दर्शक डेव्हिड हा नाट्याचे उत्तम शिक्षण घेतलेला गुणी कलाकार आहे. लंडनच्या 'रॉयल अॅकेडेमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्ट' या सस्थेत त्याने नाट्याचे शिक्षण घेऊन 'हेअर' 'जिझज ख्राइस्ट सुपरस्टार' 'द रॉकी हॉरर शो' या प्रयोगनिर्मितीत तो सहभागी झाला. शेक्सपीअरच्या 'रिचर्ड थर्ड' नाटकात रिचर्डच्या भूमिकेसाठी त्याला एका पारितोषकाचा सन्मान लाभला. मुख्यत: मूकाभिनयाचे शिक्षण विविध ठिकाणी घेऊन त्याचा प्रयोगासाठी त्याने वापरही केला. त्यावर प्रभुत्वही मिळवले. ह्या सगळ्या शिक्षणाचा, नाट्यानुभावाचा उपयोग देशोदेशी जाऊन तिथल्या तरुण कलाकाराना ते शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य तो करत आहे.

डेव्हिडने या नाटकाचे तीन प्रयोग पुण्यात केले. आणखीही प्रयोग होण्याची शक्यता आहेच. प्रयोगाच्या सख्येपेक्षा त्याने एक अपूर्व गोष्ट पुण्याच्या रंगभूमी कलाकाराच्या सदर्भात घडवली आहे, ती म्हणजे पुण्यातील सर्व मान्यवर आणि अनाम अशा नाट्यसंस्थांतील तरुण कलाकार मडळी एकत्रित झाली. जे लोक नाट्यवर्तुळाशी सबधित आहेत, त्याना पुण्यातील हौशी नाट्यसंस्थातील तटबदीची आणि डावपेचाची कल्पना नक्कीच असेल. ती तटबदी फोडणे आणि त्या सर्व मडळीना एकत्रित आणून असा काही नवा प्रयोग घडवणे हे दिव्यच होते. ते डेव्हिडने केले अनेकाना त्यातून नव्याने खूप शिकायला मिळाले यात शका नाही.

ही सधी मुबईच्या आविष्कार नाट्यसस्थेचे अरविंद देशपांडे, अरुण काकडे याच्यामुळे मिळाली. पण त्याचबरोबर प्रयोग उभारणीच्या कार्यात पुण्यातील कलाकाराबरोबरच सर्वतोपरी श्रमाने उभे राहिले ते गजानन परांजपे, रघुप्रसाद पावगी, अतुल पेठे, राणी पारसनीस, माधव वझे इत्यादी मडळी. ज्यांनी हे नाट्यशिबिर, त्यातले रोजचे कामकाज आणि प्रत्यक्ष प्रयोगनिर्मितीची प्रक्रिया पाहिली आहे, त्यांना खचितच डेव्हिडचे परिश्रम किती मोलाचे होते, याची साक्ष पटेल. असे वारवार घडावे असे सतत वाटत राहील. □

चित्रपट

# चमेली की शादी

## बासू चटर्जी पुन्हा एकदा फॉर्मात

दूरदर्शनवर 'रजनी' सारखा रोजच्या समस्यावरचा कार्यक्रम सादर करत असले तरी बासू चटर्जींचा मूळ पिंड हलकेफुलके करमणूकप्रधान चित्रपट देण्याचाच. 'रजनीगधा', 'चितचोर', 'शौकीन' सारखे चित्रपट पेश करणाऱ्या बासूचा 'स्वामी' हा एक सुखद अपवाद. बासू चटर्जींचे चित्रपट म्हणणे तीन तास निखळ (आणि निर्मळही) करमणुकीची निश्चिती. गेल्या 'पसंद अपनी अपनी' त हा बासूदा टच थोडासा हरवल्यासारखा झाला होता. पण ताज्या 'चमेली की शादी' मध्ये ते पुन्हा फॉर्मात आले आहेत.

'चमेली की शादी' ही तसं म्हटलं तर वेगवेगळ्या जातीतल्या प्रेमिकाची नेहमीचीच कथा आहे. त्याना घरातून होणारा प्रखर विरोधही यापूर्वी चित्रपटात अनेकदा येऊन

गेलेला. पण या चित्रपटाचं खरं वैशिष्टच त्याच्या हाताळणीत आहे. बासू चटर्जींनी ते इतक्या सुरळीतपणे हाताळलाय की दाद दिल्याशिवाय रहावत नाही.

चरणदास ( अनिल कपूर ) हा पैलवानकीचं वेड असलेला तरुण. गावातल्या मस्तराम (ओमप्रकाश) या तालीम चालवणाऱ्या पैलवानाचं शिष्यत्व तो पत्करतो. मस्तरामनं दाखल करून घेताना व्यसनं करायची नाहीत, याचबरोबर चाळीस वर्षांपर्यंत लग्न करायचं नाही अशी अट घातलेली असते. चरणदास ती अट मान्य करतो. पण चमेलीची ( अमृता सिंग ) गाठ पडेपर्यंतच. तिला पहाताच तो तिच्या प्रेमात पडतो.

चमेलीही त्याला प्रतिसाद देते. दोघंही लग्न करायचं ठरवतात. चमेलीचे वडील कल्लूमल ( पंकज कपूर ) हे कोळशाचे व्यापारी आणि आपल्या जातीचे अभिमानी. तिची आई चंपाही ( भारती आचरेकर ) तशीच. आपली मुलगी काहीही कामधंदा न करणाऱ्या आणि मुख्यतः दुसऱ्या जातीचा असणाऱ्या चरणदासला चोरून भेटते हे समजल्यावर ते दोघंही तातडीनं तिचं लग्न ठरवतात. चमेली त्याला दाद देत नाही म्हटल्यावर चंपा आपल्या गुंड भावाला, छद्मीला (अन्नू कपूर) आपल्या मदतीसाठी बोलावून घेते.

आता मैदानातले नव्हेत तर डोक्याचे डावपेच वापरायला पाहिजेत हे ओळखून चरणदास हरीश ( अमजद खान ) या वकिलाची मदत घेतो. हरीश चमेलीचं ज्याच्याशी लग्न ठरलेलं असतं त्याला या ना त्या गोष्टी सांगून त्याच्यापासून परावृत्त करतो. दुसऱ्या बाजूला चरणदास चमेलीला पळवून आणतो आणि तिच्याशी लग्न लावतो. या लग्नामुळे आपलं नुकसान नाही, उलट फायदाच होतोय हे लक्षात आल्यावर दोघांच्या घरातले लोकही या लग्नाला मान्यता देतात.

'चमेली की शादी'ची पटकथा आणि संवाद बासू चटर्जी आणि प्रकाश मेहराचे आहेत. चित्रपटाची हाताळणी हलक्याफुलक्या रीतीने दिग्दर्शकाने केली आहे. त्याला संवादाची चांगली साथ दिली आहे. मुख्य म्हणजे यातली पात्रं एकदम जमिनीवरची आहेत. प्रेमिक किती पैसे मिळवतो, मिळवू शकतो याचा विचार करून प्रेम करणारी, चित्रपटातली गाणी ऐकायला मिळत नाहीत म्हणून अस्वस्थ होणारी आणि हो, परीक्षेत चारचारदा नापास होणारीही आहे. त्यादृष्टीनं हा 'वास्तववादी' चित्रपट ठरावा.

या चित्रपटात इंदिरा गांधी, नानी पालखीवाला, राम जेठमलानी यांचा उल्लेख केल्यानं सेन्सॉरनं हा चित्रपट बरेच दिवस अडकवून ठेवला होता. वास्तविक या तिघांचाही उल्लेख चांगल्या पद्धतीनेच करण्यात आला आहे. इतर वेळेस हवे तसे चित्रपट मंजूर करणाऱ्या सेन्सॉरनं या चित्रपटातल्या या तिघांच्या नावाला आक्षेप घ्यावा हा एकप्रकारचा विनोदच आहे.

बासू चटर्जी पुन्हा एकदा या चित्रपटात फॉर्मात आले आहेत. छोटया प्रसंगातून, संवादातून, हालचालीतून त्यांनी प्रेक्षकांना सतत हसवत ठेवलं आहे. चमेली आणि चरणदासची हॉटेलातली पहिली भेट, चरणदासला आपल्याला सलीम असल्याचा होणार भास, चमेलीला कोंडलेली–तो सोडवून आणतो तो प्रसंग, हे सगळे प्रसंग त्यांनी छान टिपले आहेत. चित्रपटाचा शेवट थोडासा लांबल्यासारखा वाटतो. पण तेवढं सोडलं तर एकूण चित्रपट प्रेक्षणीयच आहे.

चित्रपटाचं संगीत कल्याणजी आनंदजींचं आहे. कुठलंही गाणं चांगलं म्हणण्यासारखं नसलं तरी सगळी गाणी थोडीफार लक्षात रहाण्यासारखी आहेतच. विशेषत: 'तू जहाँ भी चलेगा, चलूंगी' आणि 'मुहब्बत के दुश्मन जरा होशमें आ' ही दोन गाणी.

बासू चटर्जींना कलाकारांच्या निवडीसाठी दाद दिलीच पाहिजे. अनिल कपूर–अमृता सिंग ही 'साहेब'ची लोकप्रिय जोडी इथ आहे. दोघं एकत्र मस्त शोभतात. कामही त्यांनी छान केलं आहे. अनिल कपूरनं विनोदी पद्धतीचं काम पूर्वीही केलं आहे. पण अमृताची अशा प्रकारची ही पहिलीच भूमिका पण दोघांनीही संवादफेक, हालचाल, मुद्राभिनय या सगळ्याच्या आधारानं आपल्या भूमिका छान खुलवल्या आहेत. विशेषत: अनिल कपूरची चालण्याची आणि अमृताची बोलण्याची विशिष्ट पद्धत अफलातूनच. या दोघांना चांगली साथ दिलीय पंकज कपूर, भारती आचरेकर आणि अर्थातच अमजद खानने. भारती आचरेकरची चंपा जरा लाऊड वाटते, पण तिच्या भूमिकेत ते खपून जातं. इतर भूमिकात कोमल महुवाकर, सत्येन कप्पू, तबस्सुम, अन्नू कपूर आहेत.

बासू चटर्जींचं दिग्दर्शन, संवाद आणि कलाकारांचा चांगला अभिनय यासाठी 'चमेली की शादी' आवर्जून पहाण्यासारखा.

–सीमा कुलकर्णी

ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

डॉ.
आयडा स्कडर
सौ. वीणा गवाणकर
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

एक होता
कार्व्हर
सौ. वीणा गवाणकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

नव्या अबकारी कर धोरणामुळे
पुण्यातले २००० लघुउद्योजक अडचणीत
–दैनिक सकाळ, मंगळवार दि. ११मार्च १९८६

व्यावसायिकांसाठी उपयुक्त पुस्तकांच्या ‘राजहंस’ मालिकेतलं
ताजं प्रकाशन लवकरच प्रकाशित होत आहे.

# सेंट्रल एक्साईज आणि लघुउद्योग

लेखक : शिरीष सहस्रबुद्धे
तज्ज्ञ सल्लागार : एम्. के. जगताप

लघुउद्योजकांना नव्यानं लागू झालेल्या
अबकारी कराविषयी व्यावहारिक मार्गदर्शन
ताज्या अंदाजपत्रकातल्या तरतुदी
सेंट्रल एक्साईज टॅरिफ अॅक्ट १९८५ ची वैशिष्टये
[उत्पादनाच्या वर्गीकरणाची व परवाना घेण्याच्या पद्धती
अर्ज, चलन व गेटपासचे नमुने व ते भरण्यासाठी सूचना
पीएलए अकाऊंटचे संचालन
पुढील वर्षातली करदात्याची कर्तव्ये व अधिकार
मासिक / त्रैमासिक तपासणी
रेकॉर्डस् व रजिस्टर्स
वार्षिक ऑडिट
अबकारी कर अधिकाऱ्यांचे हक्क व मर्यादा
अपील करण्याच्या पद्धती
अशा अनेक महत्त्वाच्या मुद्यांची
ताजी नि अचूक माहिती.

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई : ४०० ०२८ ※ फोन : ४२२ ५४५५, ४२२ ३९०१